संदर्भ

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.

[सू]चना :—खाली दिलेल्या तारखेपर्यंत पुस्तक/मासिक परत करावे, [अ]सि न केल्यास घटना नियम क्र. ५ [८] नुसार प्रतिदिनी ५ पैसे जादा [आ]र्णी भरावी लागेल.

22 FEB 1981
25 FEB 1981
15 APR 1981
22 APR 1981
12 JUL 1981
14 MAR 1990

( क्र. मा. प. )
५०००-४-८०

# पु.लं.चा नाट्यप्रवास

मुकुंद टेकाडे

REFBK-0023078

मूल्य रुपये दहा

मनोरंजन प्रकाशन, मुंबई ४०० ००७

प्र का श क /
सौ. मंदाकिनी टेकाडे
मनोरंजन प्रकाशन
अभ्यंकर बिल्डिग, स्लेटर रोड,
मुंबई ४०० ००७

पहिली आवृत्ती : नोव्हेंबर १९८०

सर्व हक्क सुरक्षित

चित्रकार : श्याम जोशी

मु द्र क /
यशवंत गोविंद म्हात्रे
नरेश मुद्रणालय
चेंढरे–अलिबाग.

संदर्भ शाखा
23068
२०।९।६९
[वाङ्मय समीक्षा] निबंध
२८३८

पु.लं.चा नाटचप्रवास

# ऋण निर्देश

'पु.लं.चा नाट्यप्रवास' हे माझे तिसरे पुस्तक. प्रस्तुत पुस्तकात पु.लं.च्या नाटकांच्या विवेचनाबरोबर त्यांच्या नाट्यमय जीवनपटाचेही चित्रण आहे. मी काही प्रोफेसर किंवा जाणकार समीक्षक नाही. माझ्यासारख्या एका सामान्य व्यक्तिने पु.लं.सारख्या प्रतिभावान व थोर नाटककाराच्या नाटकांचे विवेचन करण्यास प्रवृत्त व्हावे हे एखाद्या टिटवीने सागराचा शोध घेण्याचा प्रयत्न करण्यासारखे आहे. तथापि गतवर्षी पु.लं.च्या एकसष्टी समारंभाच्या निमित्ताने मराठी नियतकालिकांनी त्यांचे गुण-गौरव विशेषांक प्रसिद्ध केले. या साऱ्यांची हे पुस्तक तयार करण्यात मला बहुमोल मदत झाली हे मी कृतज्ञतापूर्वक इथे नमूद करतो.

'जीवन' म्हणजे एक प्रवासच आहे. या अर्थाने 'नाट्य-प्रवास' हे नांव मी या पुस्तकाला दिले. तसे हें पुस्तक समीक्षात्मक नाही किंवा या पुस्तकात पु.लं.चे संपूर्ण चरित्र समाविष्ट केले आहे असेहि म्हणता येणार नाही. त्यांच्या बालपणाचे ओझरते दर्शन, व्यावसायिक रंगभूमीवर पदार्पण केल्यापासून तें तीन पैशाचा तमाशा या नाटकापर्यंत त्यांच्या झालेल्या नाट्यमय प्रवासाचे हे चित्रण आहे. यांत कांही ठिकाणी त्यांचे विनोदी किस्से येणे अपरिहार्य होते.

सुप्रसिध्द चित्रकार श्री. श्याम जोशी यांची देखणी सजावट व आगळे मुखपृष्ठ यामुळे पुस्तकाचे बहिरंग आकर्षक झाले आहे. बहिरंगाप्रमाणेच अंतरंगही वाचकांच्या पसंतीला उतरेल अशी मी आशा करू कां ?

अभ्यंकर बिल्डींग
स्लेटर रोड
मुंबई ४०० ००७.
दूरध्वनी ३८०६९२

—मुकुंद टेकाडे

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
2636
23066
विषय 2417
ग्रं. शाखा (स्थळ प्रत)

---

# एक भ्रमर

एका भ्रमराला ' ललित कलाकुंजा 'चे आकर्षण वाटले व तो तिथे धावून गेला. या आकर्षक तरुणाचे वय वीस–बावीस वर्षांचे असावे. हा तरुण कविकल्पनेतला भ्रमर नव्हता. खरोखरच तो ललित कलांचा आस्वाद मधुकर वृत्तीने घेत होता. कलेच्या विविध क्षेत्रांतील रसपान मनमुराद





एक भ्रमर

करता यावे म्हणून त्याची अविरत धडपड, भ्रमण सारखे सुरू होते. नट, नाट्यदिग्दर्शक, नाटककार, तमाशातील सोंगाड्या, मास्तर, प्राध्यापक, विनोदी लेखक, कवि, या साऱ्या क्षेत्रात त्याचे गुंजारव चालू होते. हे सर्व करताना त्याची संयमाच्या तारेच्या स्वरावर सर्व रागांची आळवणी चालू होती. हा बेभान रसिक व मधुकर वृत्तीचा तरुण कोण होता बरे ?

ओळखलत ना आपण ? या तरुणाचे नांव आपल्या चांगल्या परिचयाचे आहे पुरुषोत्तम लक्ष्मण देशपांडे !

श्री. चिंतामणराव कोल्हटकरांच्या 'ललित कलाकुंज' या नाटक कंपनीत १९४३ साली पु.लं.नी व्यावसायिक नट म्हणून प्रवेश केला. पु.लं.च्या नाट्यप्रवासाची सुरवात 'ललित कलाकुंजा'पासून झाली असे म्हणावयास हरकत नाही. त्यांचा 'ललित कलाकुंजा'मध्ये कसा प्रवेश झाला याचा उल्लेख 'गणगोत'मध्ये आढळतो. पु. ल. त्यावेळीं पुण्याला फर्ग्युसन कॉलेजमध्ये शिकत होते. मुंबईला 'एकच प्याला' या नाटकात काम करण्यासाठी पु. ल. काही हौशी मंडळींबरोबर पुण्याहून मुंबईला चालले होते. कर्जत स्टेशनवर खास मराठी पेहराव केलेले एक गृहस्थ पु.लं.च्या डब्यात शिरले व त्यांच्या समोरच्या बाकावर बसले. त्या मंडळींपैकी कुणीतरी त्यांना 'चिंतामणराव' म्हणून ओळखले. नंतर पु.लं.ची व त्यांची ओळख झाली. या दोघानाही गडकऱ्यांबद्दल विलक्षण प्रेम असल्यामुळे दादर स्टेशन येईपर्यंत 'गडकरी' या विषयावर त्यांच्या गप्पा रंगल्या. दादरला उतरताना कोल्हटकरांनी पु.लं.ना त्यांच्या कंपनीत येण्यास सांगितले. पुलंनीही होकार दिला.

पु. ल. 'एकच प्याला' आटोपून पुण्याला गेले तरी चिंतामणरावांना ते भेटले नाहीत. याचे कारण तो काल पु.लं.ना अनुकूल नसल्यामुळे चिंतामणरावांना भेटून नाटक कंपनीत प्रवेश मिळेल हे त्यांना असंभवनीय वाटले. एके दिवशी पु.लं.चा पत्ता शोधीत एक गृहस्थ आले व चिंतामणराव कोल्हटकरांनी त्यांना बोलावले आहे असा निरोप दिला. हा निरोप ऐकून पु.लं.ना फार आश्चर्य वाटले. तरीपण ते त्या गृहस्थांबरोबर कोल्हटकरांच्याकडे जाण्यास निघाले. बाहेर पु.लं. साठी टांगा थांबला होता. आपल्यासाठी टांगा बोलावण्यात आला याचेही पु.लं.ना आश्चर्य वाटले. टांग्यातून नाटक कंपनीच्या बिऱ्हाडी आल्यावर पु.ल. चिंतामणरावांना भेटले. ते पु.लं.ना म्हणाले, 'वा मिष्टर, आपण येतो म्हणून सांगितलं आणि आला नाही. आमच्या तालमी खोळंबल्या आहेत.' यानंतर चिंतामणरावांनी त्या बैठकीत असलेल्या सर्वांशी 'हे आमचे हीरो' अशी पु.लं.ची ओळख करून दिली. अशा तऱ्हेने 'ललित कलाकुंजात' पु.लं.चा प्रवेश झाला.

श्री. चिंतामणरावांनी लिहिलेल्या ‘बहुरूपी’ या आत्मकथेत नाट्य व्यवसायातील आपले अनोखे अनुभव ग्रथित केले आहेत. त्यांच्यासारख्या एका कसलेल्या नटाच्या, श्रेष्ठ दिग्दर्शकाच्या व अनुभववृद्ध नाट्यव्यावसिकाच्या ‘बहुरुपी’ या आत्मकथेने मराठीतील आत्मचरित्रपर वाङमयात मानाचे स्थान मिळवले आहे. त्यांच्या प्रगल्भ व्यक्तिमत्त्वाबरोबरच मराठी रंगभूमी, नाट्यकला, नाट्य वाङमय यांचे मनोज्ञ दर्शन ‘बहुरूपीं’त घडते. १९५८ साली या ग्रंथाला भारत सरकारच्या साहित्य अकादमीने पाच सहस्र रुपयांचे पारितोषिक देऊन चिंतामणरावांचा गौरव केला. ‘बहुरूपी’ची पहिली आवृत्ती ऑक्टोबर १९५७ मध्ये ह. वि. मोटे प्रकाशनातर्फे प्रसिद्ध झाली व ती अल्पावधीतच संपली. दुसरी आवृत्ती जुलै १९६३ मध्ये मुंबईच्या मौज प्रकाशन गृहातर्फे प्रसिद्ध झाली.

पु.लं.नी व्यावसायिक नट व नाटककार म्हणून आपल्या ध्येय साधनेच्या पूर्ततेसाठी केलेली उग्र तपस्या व धडपड याचे अचूक चित्रण ‘बहुरूपी’ने केले आहे. चिंतामणराव लिहितात, ‘पुरुषोत्तम लक्ष्मण देशपांडे ‘ललित कलाकुंजा’त जवळजवळ एक वर्ष माझ्या सहवासात होते. रंगभूमीची साज-सजावट, नाटकांच्या तालमी किंवा माझ्या भूमिका या एखाद्या निष्ठावंत विद्यार्थ्याप्रमाणे त्यांनी डोळे उघडे ठेवून पाहिल्या. शंका समाधानासाठी चर्चा केल्या, पण कधी वितंडवाद घातला नाही. माझ्या अडचणींच्या वेळी त्यांनी मला साथच दिली. वास्तविक माझ्या दृष्टीने विद्वान माणूस, पण साथीदाराची भूमिका कधी सोडली नाही. ‘ललित कलाकुंज’ या माझ्या नेतृत्वाखाली निघालेल्या नाट्यसंस्थेने पु.लं.सारखा बहुरंगी, बहुढंगी कलावंत नाट्य व्यवसायाच्या नावे जमा केला.’

‘ललित कलाकुंजा’ने वि. वि. बोकीलकृत ‘मीना–नीना’ या नाटकाचा पहिला प्रयोग ३ सप्टेंबर १९४३ रोजी मुंबईत केला. या नाटकात खोडकर विनायकाची भूमिका पु.लं.नी केली होती. व्यावसायिक नट म्हणून पु.लं.नी रंगभूमीवर केलेली ही पहिलीच भूमिका होय.

या जुन्या नाट्यसंस्था जणू काही नाट्यशिक्षणाच्या शाळाच होत्या. या संस्थात नट, नाटककार होण्याचे शिक्षण आपोआप मिळत असे. मात्र विद्यार्थी मेहनत घेणारा व जिज्ञासु हवा. चिंतामणरावांसारख्या एका कसलेल्या नटाच्या व श्रेष्ठ दिग्दर्शकाच्या कडक शिस्तीत राहून पु.लं.नी नाट्यकलेत प्रावीण्य मिळवलं.

तसं म्हणायला गेलं तर पु.लं.ना नाटकात काम करण्याची लहानपणापासूनच हौस होती. त्यांच्या घरचं वातावरण खूपच मोकळं असायचं. घरात गप्पागोष्टी, विनोद भरपूर चालायचा. पु.लं.ची आजी विनोदी किस्से,

गंमती जमती सांगून हसवायची. ती टोपण नावंही छान ठेवायची. पु.लं.चे आजोबा शाकाहारी असल्यामुळे त्यांचा स्वयंपाक वेगळा व्हायचा. घरातील इतर मंडळींना मत्स्यआहार वर्ज नसायचा. पु.लं.ची आजी घरात माशांबद्दल बोलताना अचूक टोपण नांवे घेऊन बोलत असे. ' मोरी ' नावाच्या माशाला ' मोरोपंत ' तर ' बांगडया 'ला ' काकणे ' व ' खेकडे– कुर्ल्यांना ' ' घाटकोपर ' असे म्हणे.

पु.लं.च्या आजोबांचा मित्रपरिवार मोठा होता. ते रात्रीच्या जेवणाला किती पाहुणे घेऊन येतील याचा नेम नसे. एकदा पार्ल्याला पहिलवानांची परिषद होती. पु.लं.च्या आजोबांनी या साऱ्या पहिलवानांना आपल्या घरी जेवायचे आमंत्रण दिले होते. ही सारी मंडळी जेवून गेल्यावर पु.लं.ची आजी म्हणाली, ' घरातली कोळशाची पोती त्यांच्याकडून वर ठेवून घ्यायची, असं सारखं मनात येत होतं.'

पु.लं.ची आजी कथाकीर्तनाला जाऊन घरी आल्यावर त्या कथेकऱ्याची नक्कल करीत असे. अशा तऱ्हेनं पु.लं.ना विनोदाचा वारसा त्यांच्या मातुल घराण्यातून मिळाला व मोठेपणी निष्ठेने व व्यासंगाने त्यांनी विनोदाचे दालन अधिक समृद्ध करून महाराष्ट्राला निर्मळपणे हंसविले.

' तिच्या विनोदाचं माझ्या मनावर एक अप्रतिम चित्र उमटलं आहे.' असं पु.ल. सांगतात.

पु.लं.च्या वडिलांना गाण्याची भारी हौस होती. ते पहाटे उठून बागेतील फुले तोडताना ' सौभद्र– शारदा ' या नाटकांतील गाणी म्हणत. त्यांना बालगंधर्वांची गाणी फार आवडायची. मुंबईत बालगंधर्वांचे नाटक आले की सारे कुटुंब नाटकाला जाई. रोज संध्याकाळी पु.लं.च्या घरात गाण्याची मैफल बसे. पु.लं.ची पेटी, उमाकांत– पु.लं.चा धाकटा भाऊ– तबल्यावर व गायलाही कोणीतरी असे. दर रविवारी मोठी संगीत बैठक असे.

' परीक्षा दर वर्षीच येते म्हणून काय गाणं चुकवायचं की काय ?' असं पु.लं.चे वडील म्हणत. यामुळे गाण्याच्या कार्यक्रमाला जाऊ का ?' अशी परवानगी त्यांना कधीही मागायला लागली नाही. एकदा एका नाटकात पु.लं.नी स्टेजवर सिगारेट ओढली होती. वडिलही अर्थात मुलाचे कौतुक पाहाण्यास प्रयोगाला हजर होते. घरी आल्यावर पु.लं.नी वडिलांना विचारलं, ' नाटक कसं झालं ?'

' चांगलंच झालं !' वडील म्हणाले, ' शिवाय तुला सिगारेटचा ठसका लागला नाही.'

पु.लं.ची आजी पद फारच गोड म्हणायची. हा गाण्याचा वारसा पु.लं.च्या




मातोश्रींकडे आला व त्यांच्याकडून त्यांच्या सुपुत्राकडे. याबाबत पु. ल. लिहितात. 'एक माझे आजोबा सोडले तर सारे आजोळ आणि घर गात होते. वयाच्या अठरा–एकोणीस वर्षांपर्यंत मी सुरांच्या साथीनं वाढलो.'

पु. ल. पार्ल्यात राहात असताना दत्तोपंत राजोपाध्यांकडे पेटी शिकायला जात. आधी ते पेटीच्या क्लासला जायला तयार नव्हते. पण त्यांच्या मातोश्रींनी दोन–तीन धपाटे मारून त्यांना पाठवले. त्यानंतर ते पेटीवादनात चांगलेच रमले. वयाच्या दहाव्या वर्षी त्यांनी बालगंधर्वांकडून पेटीवादनाबद्दल शाबासकी मिळवली. पु.लं.नी पेटीवादनात मिळवलेल्या प्रावीण्याबद्दल त्यांच्या मातोश्रींनी एका मुलाखतीत अलीकडेच सांगितलं, 'तसा

गंमती जमती सांगून हसवायची. ती टोपण नावंही छान ठेवायची. पु.लं.चे आजोबा शाकाहारी असल्यामुळे त्यांचा स्वयंपाक वेगळा व्हायचा. घरातील इतर मंडळींना मत्स्यआहार वर्ज नसायचा. पु.लं.ची आजी घरात माशां-बद्दल बोलताना अचूक टोपण नांवे घेऊन बोलत असे. ‘ मोरी ’ नावाच्या माशाला ‘ मोरोपंत ’ तर ‘ बांगड्या ’ला ‘ काकणे ’ व ‘ खेकडे– कुल्यांना ’ ‘ घाटकोपर ’ असे म्हणे.

पु.लं.च्या आजोबांचा मित्रपरिवार मोठा होता. ते रात्रीच्या जेवणाला किती पाहुणे घेऊन येतील याचा नेम नसे. एकदा पार्ल्याला पहिलवानांची परिषद होती. पु.लं.च्या आजोबांनी या साऱ्या पहिलवानांना आपल्या घरी जेवायचे आमंत्रण दिले होते. ही सारी मंडळी जेवून गेल्यावर पु.लं.ची आजी म्हणाली, ‘ घरातली कोळशाची पोती त्यांच्याकडून वर ठेवून घ्यायची, असं सारखं मनात येत होतं.’

पु.लं.ची आजी कथाकीर्तनाला जाऊन घरी आल्यावर त्या कथेकऱ्याची नक्कल करीत असे. अशा तऱ्हेनं पु.लं.ना विनोदाचा वारसा त्यांच्या मातुल घराण्यातून मिळाला व मोठेपणी निष्ठेने व व्यासंगाने त्यांनी विनोदाचे दालन अधिक समृद्ध करून महाराष्ट्राला निर्मळपणे हंसविले.

‘ तिच्या विनोदाचं माझ्या मनावर एक अप्रतिम चित्र उमटलं आहे.’ असं पु.ल. सांगतात.

पु.लं.च्या वडिलांना गाण्याची भारी हौस होती. ते पहाटे उठून बागेतील फुले तोडताना ‘ सौभद्र– शारदा ’ या नाटकांतील गाणी म्हणत. त्यांना बालगंधर्वांची गाणी फार आवडायची. मुंबईत बालगंधर्वांचे नाटक आले की सारे कुटुंब नाटकाला जाई. रोज संध्याकाळी पु.लं.च्या घरात गाण्याची मैफल बसे. पु.लं.ची पेटी, उमाकांत– पु.लं.चा धाकटा भाऊ– तबल्यावर व गायलाही कोणीतरी असे. दर रविवारी मोठी संगीत बैठक असे.

‘ परीक्षा दर वर्षीच येते म्हणून काय गाणं चुकवायचं की काय ?’ असं पु.लं.चे वडील म्हणत. यामुळे गाण्याच्या कार्यक्रमाला जाऊ का ?’ अशी परवानगी त्यांना कधीही मागायला लागली नाही. एकदा एका नाटकात पु.लं.नी स्टेजवर सिगारेट ओढली होती. वडिलही अर्थात मुलाचे कौतुक पाहाण्यास प्रयोगाला हजर होते. घरी आल्यावर पु.लं.नी वडिलांना विचारलं, ‘ नाटक कसं झालं ?’

‘ चांगलंच झालं !’ वडील म्हणाले, ‘ शिवाय तुला सिगारेटचा ठसका लागला नाही.’

पु.लं.ची आजी पद फारच गोड म्हणायची. हा गाण्याचा वारसा पु लं.च्या




मातोश्रींकडे आला व त्यांच्याकडून त्यांच्या सुपुत्राकडे. याबाबत पु. ल. लिहितात. ' एक माझे आजोबा सोडले तर सारे आजोळ आणि घर गात होते. वयाच्या अठरा-एकोणीस वर्षांपर्यंत मी सुरांच्या साथीनं वाढलो.'

पु. ल. पार्ल्यात राहात असताना दत्तोपंत राजोपाध्यांकडे पेटी शिकायला जात. आधी ते पेटीच्या क्लासला जायला तयार नव्हते. पण त्यांच्या मातोश्रींनी दोन-तीन धपाटे मारून त्यांना पाठवले. त्यानंतर ते पेटीवादनात चांगलेच रमले. वयाच्या दहाव्या वर्षी त्यांनी बालगंधर्वांकडून पेटीवादनाबद्दल शाबासकी मिळवली. पु.लं.नी पेटीवादनात मिळवलेल्या प्रावीण्याबद्दल त्यांच्या मातोश्रींनी एका मुलाखतीत अलीकडेच सांगितलं, ' तसा



त्याचा हात मूळचाच गोड आहे. आता सुद्धा जेवायला बसला तरी टेबला-वर बोटांनी सरगम करतच असतो.'

पु.लं.नी विद्येसाठी बरेच कष्ट घेतले. अगोदर अभ्यास नंतर कला हा एक त्यांचा गुणविशेष. त्यामुळे शाळेत ते शिक्षकांना फार प्रिय होते. पु. ल. वक्तृत्वात प्राथमिक शाळेपासून भाग घेत असत. पु.लं.चे आजोबा वामन मंगेश दुभाषी यांना साहित्याच फार प्रेम. त्यांनी पु.लं.ना भाषणाच्या दहा-पंधरा ओळी लिहून दिल्या होत्या. पु.लं.चे वय त्यावेळी अवघे पांच वर्षांच होते. त्यांना एका टेबलावर उभं करण्यात आलं व त्यांनी ते भाषण हावभावासकट खणखणीत आवाजात म्हणून दाखवलं. हा त्यांचा पहिला पराक्रम. मग पुढे आजोबांनी लिहून द्यायच नि पु.लं.नी खड्या आवाजात म्हणून दाखवायच, शाबासकी मिळवायची असं बरेच दिवस चाललं होतं. नंतर पार्ल्याच्या शाळेतील मास्तरांनी सुचविल्यावरून पु. ल. आजोबांच्या मदतीशिवाय स्वतःच भाषण लिहून काढत असत. त्यावेळी त्यांचं वय अवघं दहा-बारा वर्षांच असेल. नंतर ते इतरांनाही भाषणं, संवाद लिहून देत असत.

पु.लं.चे आजोबा वामनराव दुभाषी हे उत्तम लेखक होते. त्यांनी 'ऋग्वेदी' हे टोपण नाव घेतले होते. त्यांनी जिवापाड श्रम करून लिहिलेले

'आर्यांच्या सणांचा इतिहास' हे पुस्तक खूप गाजले. संस्कृत, मराठी, गुजराती, बंगाली, इंग्लिश, कानडी, कोकणी, ह्या सर्व भाषांवर त्यांचे प्रभुत्व होते. 'समाजोन्नति' या नांवाचे नाटकही त्यांनी लिहिले. तसेच ते प्रवचनकारही होते. प्रवचन, सभा-कीर्तन, व्याख्यानं, हा त्यांच्या घराण्याचा कुळाचार होता. पु. ल. आजोबांच्या कीर्तनात मागे पेटीची साथ करीत असत. कीर्तनात आजोबांकडे गद्यभाग व नातवाकडे पद्यभाग अशी विभागणी होती. परिणामी पु.लं सभाधीट झाले.

पु.लं.च्या आजोबांनी रवींद्रनाथ टागोरांना 'गीतांजली' बद्दल नोबेल प्राईज मिळाल्यानंतर बंगाली शिकायला सुरुवात केली. त्यानंतर त्यांनी 'गीतांजली'चे मराठी भाषांतर 'अभंग-गीतांजली' या नावाने लिहून प्रसिद्ध केले.

याबाबत स्वतःच्या बंगाली भाषेच्या व्यासंगाबद्दल पु.लं.नी अलिकडेच एका भाषणातून सांगितले, 'मी पन्नासाव्या वर्षी ज्यावेळी बंगाली शिकायला निघालो, त्यावेळी माझ्या आईने सांगितले की माझ्या आजोबांनीही पन्नासाव्या वर्षीच बंगाली शिकायला सुरवात केली. तेव्हा मला वाटते की हा एक आनुवंशिक रोग आहे की काय?'

एक प्रकारे पु.लं.ना लहानपणीच नाटयाचे शिक्षण मिळाले व याचा लाभ त्यांना मोठेपणी मिळाला. रंगमंचावर येणाऱ्या कुठल्याही नट-नटीला मंचभय हा रोग नसावा. पु.लं.नी लहानपणापासून नाटकातून कामे केली असल्यामुळे व्यावसायिक रंगभूमीवर पदार्पण करताना मंचभयाने त्यांना कधीच पछाडले नाही.

पु.लं.नी नटाचा व्यवसाय संभाळून बी. ए. ची परीक्षा दिली. नाटकातून कामे करताना त्यांनी अभ्यासाकडे कधीच दुर्लक्ष केलं नाही. नाटक कंपनीच्या ट्रकमध्ये बसून त्यांनी काही वेळा प्रवासात कॉलेजचा अभ्यास केला.

चिंतामणराव कोल्हटकरांना नवा नाटककार शोधण्याचा छंद होता. त्यामुळे पु. ल. परीक्षेच्या खटाटोपातून मुक्त झाल्यावर कोल्हटकरांनी त्यांना नाटक लिहिण्याची गळ घातली. त्याप्रमाणे पु.लं.नी बुद्ध चरित्रावर एक सुंदर नृत्य-नाटक लिहून तयार केले. त्या सुमारास 'ललित कलाकुंजा'ची परिस्थिती हलाखीची असल्यामुळे हे नाटक रंगमंचावर आणण्यासाठी त्यांना दुसऱ्या एका व्यक्तीवर अवलंबून राहावे लागले. पण नियतीने वेगळेच योजले होते. ज्याने सहकार्य देण्याचे कबूल केले होते त्याने ऐनवेळी माघार घेतल्यामुळे पु.लं.चे हे नृत्यनाटक रंगभूमीवर येऊ शकले नाही.

यानंतर रंगभूमीवर आलेले पु.लं.चे पहिले नाटक 'तुका म्हणे आता.' ८ नोव्हेंबर १९४८ रोजी या नाटकाचा पहिला प्रयोग पुण्याला भानुविलास थिएटरमध्ये झाला. त्यावेळी भानुविलास हे केवळ नाटकांचे थिएटर होते.

पु.लं.चा वाढदिवस ८ नोव्हेंबरला येतो. स्वतः नाटककाराच्या वाढदिवसाच्या शुभ दिवशी त्याच्या पहिल्या नाटकाचा पहिला प्रयोग रंगभूमीवर येण्याचा अपूर्व योग पु.लं.ना लाभला होता. प्रयोगाला प्रेक्षकांनी गर्दी केली होती. दुर्दैवाने नाटक पडले.

'तुका म्हणे आता' हे नाटक रंगभूमीवर आले त्यासुमारास नाटय व्यवसायाचे आसन डळमळीत झाले होते. मो. ग. रांगणेकरांची 'नाटय निकेतन' ही नाटयसंस्था सोडली तर इतर नाटक कंपन्या एक तर बंद पडल्या होत्या किंवा बंद होण्याच्या मार्गावर होत्या. चिंतामणराव कोल्हटकरांची 'ललित कलाकुंज' ही नाटयसंस्था १९४५ सालीच बंद पडली. एकूण नाटय व्यवसायाला ओहोटी लागली होती.

प्रस्तुत नाटक 'मंगल नाटयमंदिर' या नाटयसंस्थेतर्फे रंगभूमीवर आले. ही नाटयसंस्था 'मंगल पिक्चर्स' या एका चित्रपट संस्थेने स्थापन केली होती. 'जय मल्हार' व 'जिवाचा सखा' हे 'मंगल पिक्चर्स'चे दोन चित्रपट लोकप्रिय झाल्यामुळे या संस्थेने 'मोठी माणसे' हा तिसरा चित्रपट हाती घेतला. 'मोठी माणसे'चे संगीत दिग्दर्शन पु.लं.च्याकडे होते, तर कथा व गीते ग. दि. माडगूळकरांची.

'मंगल पिक्चर्स'चे वामनराव कुलकर्णी व विष्णुपंत चव्हाण हे दोन भागीदार होते. ग. दि. माडगूळकरांनी त्यांना एक नाटयशाखा काढावी असे सुचविले. 'मंगल पिक्चर्स'च्या यशात ग. दि. माडगूळकरांचा सिंहाचा वाटा होता, त्यामुळे मालकद्वयांनी नाटयशाखा काढण्यास लगेच मान्यता दिली. अशा तऱ्हेने 'मंगल नाटय मंदिर' ही संस्था स्थापन झाली. या संस्थेतर्फे पु.लं.चे पहिले नाटक 'तुका म्हणे आता' रंगभूमीवर आणण्याचे ठरले.

पु.लं.नी हे नाटक ग. दि. माडगूळकर, नाना जोग व म. वि. राजाध्यक्ष यांना वाचून दाखवले व या सर्वांना ते आवडले. पु.लं.चे नाटयगुरु श्री. चिंतामणराव कोल्हटकर यांनी ते प्रयोगक्षम करण्यासाठी कितीतरी बहुमोल सूचना केल्या. नाटक कंपनीतील इतर गुणी कलावंत अनंत धुमाळ, वसंतराव शिंदे, वसंतराव देशपांडे, गोपाळ बकरे, श्रीपाद जोशी ही सारी जुन्या कंपन्यांच्या शिस्तीतील मंडळी मदतीला होती.

त्यावेळी आजचे सुप्रसिद्ध विनोदी लेखक श्री. वसंत सबनीस हे पुण्याला 'लोकशक्ती' या वृत्तपत्रात उपसंपादक म्हणून काम करीत होते. ते डेक्कन जिमखान्यावर पु.लं.च्या समोरच्या बंगल्यात राहात असत. पु.लं.ची व सबनीसांची जानी दोस्ती होती व रोज त्या दोघांच्या भेटीगाठी होत. 'तुका म्हणे आता' या नाटकाचे लेखन चालू होते. अंक पुरा झाल्यावर

पु. ल. मित्रांच्या सहवासात नाटकाचे वाचन करीत. त्यावेळी वसंत सबनीस, राम गबाले, वसंतराव देशपांडे व इतर मित्रमंडळी हजर असत. या संबंधात श्री. वसंत सबनीस, नाट्यदर्पणच्या डिसेंबर १९७९ च्या अंकात लिहिलेल्या एका लेखात म्हणतात,

'पु.लं.चे वाचन म्हणजे थेट रंगमंचावर नाटक पाहिल्याचा आनंद. मला सारखं वाटायचं ह्या सबंध नाटकात पु. ल. फक्त तुकारामाशी अधिक एकरुप झालेले असावेत. साधारणपणे नाटककार जेव्हा नाटकाचं वाचन करतो तेव्हा तो कुठच्या पात्रात अधिक रमला आहे ते चटकन कळते. त्यामुळे पु. ल. तुकारामाच्या पात्रात किती एकरुप झाले आहेत ते कळायचं. मला एक नवल वाटायच, देवधर्माबद्दल फारशी आस्था नसलेले पु. ल. तुकारामाच्या पात्राच्या रूपानं इतके श्रद्धापूर्ण भासायचे की हा मनुष्य मुळीच अश्रद्ध नाही अशी खात्री पटायची.'

लेखकाचा जीवनाकडे पाहाण्याचा जो दृष्टीकोन असतो, त्याचे प्रतिबिंब त्याच्या साहित्यातून उमटते. कदाचित पु.लं च्या तुकारामावरील प्रेमातूनच ' तुका म्हणे आता ' हे नाटक साकार झाले असावे.

अलीकडेच पु.लं.नी एका भाषणातून सांगितलं होतं, ' मला तुकाराम आवडतो. कारण तो देवाजवळ स्वतःसाठी मोक्ष, धनसंपदा, काहीही मागत नाही. भक्तीचा आणि संतसंगाचा आनंदच मागतो.'

पूना गेस्ट हाऊसमध्ये निमंत्रितांसमोर या नाटकाचे वाचन झाले. वाचनाला आलेली मंडळी नाटकावर खूष होऊन परत गेली. त्यामुळे सर्वांनी मोठ्या उत्साहाने नाटकाची पूर्वतयारी सुरू केली. पात्रांची जमवाजमव सुरू झाली. वसंतराव देशपांडे,– संतू तेली, ग्यानू चांभार– वसंत शिंदे, मंबाजी– अनंत धुमाळ, रामेश्वर शास्त्री– गोपाळ बकरे, सिद्धेश्वर शास्त्री– श्रीपाद जोशी, जिजाई– शकुंतला जाधव, जानकी– सरोज बोरकर, शिवाजी– वसंत सबनीस, अशा भूमिका होत्या. शिवाय वसंतराव देशपाडयांनी संगीताची जबाबदारी उचलली होती. वसंत शिंदे हे पु.लं.च्या बरोबर चिंतामणराव कोल्हटकरांच्या 'ललित कलाकुंज'मध्ये होते. श्रीपाद जोशी मो. ग. रांगणेकरांच्या नाट्यनिकेतनमध्ये होते. शकुंतलाबाई जाधव व सरोज बोरकर या दोघी मंगल पिक्चर्सच्याच कलाकार. जाधवबाईंनी मूकपटाच्या जमान्यात अपूर्व यश मिळवले होते. असा एकूण कुशल नटसंच होता.

तसेच या नाटकात एकूण तीन वसंत होते. वसंत देशपांडे, वसंत शिंदे, आणि वसंत सबनीस. शिवाजी महाराजांची भूमिका वसंत सबनीसांकडे होती. धंदेवाईक नाटकात ते प्रथमच काम करत होते. धंदेवाईक नाटकात येण्याची त्यांची ' विच्छा ' अशा तऱ्हेने पुरी झाली.

बुधवार पेठेतल्या एका जुनाट वाड्यात तालमी सुरू झाल्या. वसंत सबनीस वर्तमानपत्रात उपसंपादक होते, तर वसंतराव देशपांडे मिलिटरी अकौंटस्मध्ये. हे दोघेजण संध्याकाळी तालमीला हजर होत. पु. ल. दुपारपासून बाकीच्या पात्रांच्या तालमी घेत. पु. ल. तसे अभिनयाच्या बाबतीत चोखंदळ होते. तालमीच्या बाबतीत आळस चालत नसे. पाठांतर चोख असावे लागे. ते स्वतः तालमीच्या बाबतीत चिंतामणराव कोल्हटकर व मो. ग. रांगणेकर यांच्या हाताखालून तयार होऊन आले होते. पु. ल. पात्रांचे संवाद कसे फेकायचे, कुठं थांबायचं हे स्वतः करून दाखवीत असत. प्रत्येक पात्राचा अभिनय शिकवताना ते स्वतः त्या भूमिकेशी संपूर्णपणे एकरुप होत असत. सारेजण आपल्या घरचे कार्य आहे या भावनेने तालमींना हजर राहून सहकार्य करीत. अशा तऱ्हेने सुमारे दीड महिना तालमी झाल्या व प्रयोगाची तारीख जाहीर झाली.

वसंतराव देशपांड्यांनी अभंगाना व पदांना सुंदर चाली दिल्या होत्या. मंगल पिक्चर्सच्या नाट्यशाखेतर्फे नाटक रंगभूमीवर येत असल्यामुळे, सेटस्. देखावे, यांची कमतरता नव्हती. एक दोन पात्रांचे अपवाद सोडले तर सर्व नट व नटी अनुभवी होत्या. नाटकातील नांदी व कांही गीते ग. दि. माडगूळकरांची होती. इतकी सारी अनुकुलता असताना नाटक पहिल्याच प्रयोगाला का कोसळले ?

स्वतः पु.लं.नी याची कारणमीमांसा ' नाट्यभूमी 'च्या जून १९६८ च्या अंकातून लिहिलेल्या एका लेखात केली आहे. त्याचा थोडक्यात सारांश असा:–

तुकारामाची महत्त्वाची भूमिका शांताराम पाटील या नवख्या नटाकडे आली होती. या गोड गळ्याच्या नटाला मंचभयाने पछाडले होते व त्याची स्मरणशक्ती सुद्धा क्षीण होती. ऑर्गन वाजवणारे बाबुराव क्षीरसागरांना सुद्धा मंचभय होता. एरवी ते सुंदर वाजवत. पण संगीत नाटकात लागणारी ऑर्गनवाल्यांची तत्परता त्यांच्यात नव्हती.

धूपदीप झाले. तिसरी घंटा झाल्यावर ' सुंदर ते ध्यान उभे विटेवरी। कर कटावरी ठेवोनिया ।। या अभंगाने नाटकाची सुरुवात झाली. मध्यभागी असलेल्या पिंपळाच्या पारावर तुकाराम महाराज भजन करीत आहेत, खाली दगडांच्या उंचवट्यावर संतू तेली बसून अभंग लिहून घेत आहे, सोबतीला ग्यानू चांभार, व इतर टाळकरी आहेत असं दृश्य होतं. सीन चांगला होता, पण सुरुवातीलाच ऑर्गनवाल्यांनी धोका दिला. पण वसंतराव देशपांड्यांनी सावरून घेतले. प्रथम प्रयोगाच्या यशापयशाबद्दल नाटककाराला जी साशंक

भीती भेडसावीत असते, तशीच पु.लं.ची अवस्था झाली. त्यातून पु. ल. लेखक व दिग्दर्शकही होते.

पु. ल. विंगमध्ये उभे होते. वसंतराव देशपांड्यांनी सुरुवातीलाच टाळी मिळवली होती. नाटकात तसा रंग भरत होता. पण काहीतरी खटकल्यासारखे वाटत होते. प्रेक्षक आणि रंगमंच यांचा सुसंवाद मात्र साधत नव्हता एवढे मात्र नाटककाराच्या लक्षात आले होते. आता शिवाजी महाराजांचा प्रवेश सुरू झाला. वसंत सबनीस रंगमंचावर छत्रचामरे इ. घेऊन आले तरी त्यांना टाळी मिळाली नाही. त्यावेळी शिवाजीला सध्या इतका भाव नव्हता व आजच्याप्रमाणे प्रत्येक पुढारी आपल्या भाषणात शिवाजी महाराजांचे नांव घेत नव्हता. याबाबत पु. ल. लिहितात, 'दुर्दैवाने वीस वर्षापूर्वी शिवाजी महाराज आजच्या इतके 'फॅशनेबल' नव्हते. आज शिवाजी म्हटले की टाळी असते. त्यावेळी शिवाजी महाराज हिंदुमहासभेचे सभासद होते. काँग्रेसमध्ये त्यांना स्थान नव्हते.'

वसंतराव सबनीसांची व्यावसायिक नाटकातील ती पहिलीच एंट्री. त्यातून दुर्दैव असे की त्यांनी चढवलेली सुरवार अतिशय तंग होती. या सुरवारीने धोका दिला. तुकाराम बुवांना नमस्कार करण्यासाठी वाकले ते पुन्हा प्रेक्षकांपुढे तोंड करायला तयारच होईनात. याचे कारण पाराच्या पायथ्याशी बसताना शिवाजी महाराजांची सुरवार गुढघ्यावर फाटली. त्यामुळे पहिल्या अंकात शिवाजी महाराज प्रेक्षकांकडे पाठ करून उभे राहिले. नाटकाच्या यशापयशाचा तराजूचा काटा सारखा हलतच राहिला. काही चाणाक्ष प्रेक्षकांनी शिवाजीची ही अवस्था ओळखली असावी. याचे कारण प्रेक्षकात कुठेतरी खुदखुद झाली होती. फक्त पहिल्या अंकात कडाडून टाळी मिळाली ती जिजाईचे काम करणाऱ्या शकुंतलाबाई जाधवांना. शिवाजी महाराजांना खापरीतून गूळ, शेंगा, देताना त्यांनी सुरेख अभिनय केला.

पहिला अंक पडला. पु.लं.ची काही मित्रमंडळी आत गेली. त्यांच्याकडून प्रेक्षागारातल्या थंडपणाचे कारण पु.लं.ना समजले. प्रेक्षकांना नाटक विनोदी आहे असे वाटले. 'तुका म्हणे आता' या नावानेच घोटाळा केला होता. नाटककाराने त्या गर्दीचा अपेक्षाभंग केला होता.

दुसऱ्या अंकाला सर्व दृश्ये बदलायची होती. सुमारे पाऊण तास होऊन गेला तरी पडदा वर जाईना. प्रेक्षक ताटकळत बसले होते. त्यांनी नाटककाराच्या नावाने आरडाओरडा करण्यास सुरुवात केली आणि इथूनच नाटकाच्या पतनाला सुरुवात झाली. सेट लावणारे मिस्त्री हे सिनेमा स्टुडिओत

काम करणारे. त्यांना चपळाई माहीत नव्हती. सारं कसं अगदी संथपणे चालले होते, फिल्म स्टुडिओत चालतं तसं.

तिसऱ्या अंकातलेही दृश्य बदलायला वेळ लागला. इंद्रायणीकाठाचे सुंदर दृश्य होते. दिग्दर्शकाला चंद्राचे दृश्य दाखवायचे होते. सायक्लोरामावर चंद्र दाखवायची प्रकाश योजनाही दुर्दैवाने सदोष ठरली. मध्यरात्र उलटल्यावर शेवटचा पडदा पडला आणि नाटकाच्या यशापयशाचा ताजवा अपयशाकडे झुकला. दुसऱ्या दिवशी ९ नोव्हेंबर १९४८ ला दुसरा प्रयोग होता. पावसाळ्याचे दिवस नसतानाही पुण्यात अवेळी धो धो पाऊस सुरू झाला. परंतु दुसरा प्रयोग तसा बरा गेला. तिसऱ्या दिवशी तर मुसळधार पावसामुळे तिसरा प्रयोग रद्दच करण्यात आला.

भरवशाचा सेंच्युरी फलंदाज पहिल्याच षटकात शॉर्ट रन घेताना घसरून धावचीत व्हावा तसेच पु.लं.चे झाले. दैवाने त्यांना साथ दिली नाही. पु.लं.च्या नाट्य संसारातले पहिले दान दैवाने हिरावून नेल्याने ते दुःखी झाले होते.

तुकारामाची अभंग गाथा इंद्रायणी गंगेने तारली नसून ती लोकगंगेने तारली हे 'तुका म्हणे'चे प्रतिपादन खरोखरच विचारणीय आहे. 'अभंग गाथा' लोकगंगेने तारली याचा अर्थ असा की तुकारामाचे अभंग लोकांना तोंडपाठ होते आणि लिहिलेली अभंगगाथा इंद्रायणीत बुडवल्यावर संतू तेली, ग्यानू चांभार हे त्यांचे शिष्य लोकांच्याकडे गेले व लोकांना पाठ असलेले अभंग लिहून काढून त्यांनी पुन्हा गाथा तयार केली.

संतू तेली तुकारामाला सांगतो, 'महाराज, वह्या विसर्जन केल्या आणि मी, आई आणि रामेश्वर बाबा निघालो. आईनं गांवोगांवच्या जात्यावरनं आणि पाळण्याकडनं तुमचे अभंग वेचले. मी शेतामळ्यांतून फिरलो आणि रामेश्वरबाबा गृहस्थांच्या घरात हिंडले. गावागावांतून पाखरासारखे भिरभिर हिंडलो आणि हे तुळशीचं बी गोळा करून आणलं.'

अशा तऱ्हेनं संतांना चमत्कारातून वाचवण्याचा पु.लं.चा प्रयत्न फसला. नाटक म्हणून 'तुका म्हणे आता' खरोखरच परिणामकारक आहे. तीस वर्षांपूर्वी शूद्रांना वेदविद्येचा अधिकार आहे किंवा नाही या गंभीर विषयावर पु.लं.नी हे नाटक लिहिले आहे. नाटक तसे रंगत असे. दुसऱ्या अंकातील साक्षात वेदोनारायण रामेश्वरशास्त्री तुकारामाची अभंग रचले या अपराधाखाली चौकशी करतात हा प्रसंग तर कमालीचा रंगत असे. रामेश्वर शास्त्री व त्यांची पत्नी जानकी यांच्यातील प्रसंगही रंगायचे.

या नाटकाच्या पुस्तकाची पहिली आवृत्ती नाटककारानेच नोव्हेंबर

१९४८ मध्ये छापून प्रसिद्ध केली होती. दुसरी आवृत्ती तीस वर्षानंतर मे १९७९ मध्ये प्रकाशित झाली. ही दुसरी आवृत्ती प्रकाशित करताना प्रस्तुत नाटक पुन्हा एकदा दुरुस्त करून लिहावे असा विचार नाटककाराच्या मनात आला खरा, पण तो बेत त्यांनी बदलला. नाटककाराला नेमकी काय दुरुस्ती अभिप्रेत आहे हे एखाद्या नाटचसंस्थेने जाणून घेण्याचा प्रयत्न करावा. जर लेखकाने आजच्या बदललेल्या परिस्थितीनुसार दुरुस्ती करून दिल्यास या नाटचकृतीचे नाटचरसिक निश्चितच स्वागत करतील. पु.लं.ची अफाट लोकप्रियता ध्यानात घेता या नाटकाचे रंगभूमीवरचे पुनरागमन निःसंशय लाभदायक ठरेल.

● ●

# २

## नाटककार असून प्रस्तावना लेखक

८ नोव्हेंबरला पु.लं.चा वाढदिवस असतो. ८ नोव्हेंबर १९४८ रोजी त्यांच्या वाढदिवसाच्या दिवशी 'तुका म्हणे आता' या त्यांच्या पहिल्या नाटकाचा पहिला प्रयोग झाला. याबाबत पु.लं. लिहितात 'दर वाढदिवसाला माझ्या या वाढदिवसाची आठवण येते. हा माझा वाढदिवस म्हणजे माझ्या पहिल्या नाटकाची पुण्यतिथी!'

'तुका म्हणे आता' हे नाटक रंगभूमीवर यशस्वी होऊ शकले नाही. या घटनेतून काही महत्त्वाचे प्रश्न डोळ्यासमोर उभे राहतात. यशस्वी नाटककार कसे व्हावयाचे? विनोदी लेखक यशस्वी नाटककार होऊ शकेल का? एखादा प्रतिभावान कादंबरीकार यशस्वी नाटक लिहू शकेल का? नाट्य लेखनाचे तंत्र तरी काय आहे?

कथा, कादंबरी, काव्य, या वाङ्मय प्रकाराप्रमाणेच 'नाट्य' हा साहित्याचा एक लेखन प्रकार आहे. आणि तो सुद्धा श्रेष्ठ प्रतीचा. नाट्य-लेखन करणे हे कथा, काव्य, किंवा कादंबरी लिहिण्यापेक्षा कठीण आहे. त्यामुळे यशस्वी नाटकांची निर्मिती कथा-कादंबऱ्यांपेक्षा नेहमीच कमी असते.

नाटककाराला दोन-तीन तासांच्या कालमर्यादेत आपले कथानक मांडावे लागते. रंगभूमीच्या बाहेर जाऊन त्याला चालत नाही. त्याला काळ आणि स्थळ ही दोन्ही बंधने पाळावी लागतात. थोडक्यात, नाटक हे रंगभूमीवरच्या प्रयोगाच्या दृष्टीने परिणामकारक असावे लागते. कादंबरीकाराचे मात्र तसे नसते. आपले कथानक जगाच्या पाठीवर कुठल्याही भागात घडलेले त्याला दाखवता येते. आणि ते सुद्धा मन मानेल तितक्या वेळात. काळ व स्थळ ही बंधने त्याच्या आड येत नाहीत. उलटपक्षी नाटककाराला ही बंधनें काटेकोरपणे पाळावी लागतात. नाटकाचा प्रयोग समुदायापुढे ठराविक वेळेच्या आतच पूर्ण करून दाखवावा लागतो. नाटक ही समुदायापुढे

उभी करायची कला आहे. रंगमंच व प्रेक्षागार एकदिलाने एकत्र आले तर नाटकाचा प्रयोग यशस्वी होतो. यादृष्टीने नाटककार हा एक श्रेष्ठ कलावंत ठरतो

तसेच नाट्यलेखनही उच्च दर्जाचे असावे लागते. लेखनात कच्चे दुवे राहिले तर नाटक यशस्वी होऊ शकणार नाही. यशस्वी नाटक हे उत्तम वाङमय असावे लागते हे मात्र निर्विवाद. कांही कांही नाटके वाचताना चांगली वाटतात, पण त्यांचा प्रयोग मात्र परिणामकारक होत नाही. कांही नाटके प्रयोगाच्या दृष्टीने रंगभूमीवर यशस्वी होतात, पण ती नाटके जर आपण वाचायला घेतली तर कंटाळवाणी वाटतात.

याबाबत पु.लं.नी एका भाषणातून सांगितलं, 'नाटकाचं पुस्तक वाचायचा मला कंटाळा आहे. मी जी काही नाटके लिहिली ती रंगमंचावरून करण्यासाठी लिहिली. नुसतं कथा–कादंबरी, कविता यासारखं एकांतात वाचण्यासाठी नाटक ही कल्पना मला रुचत नाही. कथा–कादंबरी, कविता ह्या साहित्य प्रकारात माझ्या खात्यावर एकही महान निर्मितीची नोंद नाही. अलीकडे तर मी प्रस्तावना लेखक म्हणूनच अधिक प्रसिद्ध आहे.'

कथा, कादंबरी, किंवा काव्य हे सवडीने केव्हाही आपल्या मर्जीप्रमाणे वाचता येते. नाटकाचे मात्र तसे नसते. नाटक हे 'दृश्य' आहे. केवळ 'वाच्य' नाही. मनोवेधक कथानक, नाट्यमय घटनांची रेलचेल, पात्रांच्या रुपाने प्रगट होणाऱ्या मानवी स्वभावाच्या विविध छटा या साऱ्यांची गरज कादंबरी प्रमाणेच नाटकालाही असली तरी त्याचा वापर करण्याची कादंबरीची व नाटकाची पद्धत वेगवेगळी असते. केवळ पात्रांच्या संवादरूपाने सांगितलेली कथा अशी नाटकाची व्याख्या आहे.

जिथे संघर्ष नाही ते मानवी जीवन कसले? या संघर्षातून चाललेलं मानवी जीवनातलं नाट्य पाहायची माणसाची प्रवृत्ती असते. या विविध प्रकारच्या मानवी स्वभावाच्या छटा नाट्यरूपानं आपल्यापुढं येतात. नाटककाराला मानवी स्वभावाच्या गूढ स्वरूपाला सोपे रूप देऊन घटनांचे अचूक चित्रण करावे लागते. आणि ते पाहाण्यासाठी आपण नाटकाला जातो. नाट्यकलेत पारंगत असलेले नट व नटी या मानवी स्वभावाच्या छटांचा आविष्कार प्रभावीपणे करण्याचा प्रयत्न करतात. नाटक हे समुदायापुढे करून दाखवण्यासाठी असतं यावर नटनटींची नितांत श्रद्धा असते. प्रेक्षागारात बसलेल्या प्रेक्षकाला हा आविष्कार कितपत पटला यावरच नाटकाचे यश अवलंबून असते.

नाटक कसे पाहावे हे सुद्धा महत्त्वाचे आहे. एखाद्या संगीत नाटकातलं अमुक एक गाणं आवडणं किंवा नाटकातल्या नायिकेच्या साडीचं डिझाईन

किंवा रंग आवडणं यावरून ते नाटक यशस्वी झालं असं म्हणता येणार नाही. संवाद, संगीत, अभिनय, नेपथ्य या सर्व घटकांनी नाटक यशस्वी होण्यासाठी कितपत हातभार लावला हे नाटक पाहाण्याचं एक तंत्र आहे.

यशस्वी नाटककाराला साहित्याचे सखोल ज्ञान असावे लागते. तसेच त्याला रंगभूमीच्या तंत्राचे व अभिनयाचे सूक्ष्म ज्ञान हवे. नाटक हे समुदायासाठी असल्यामुळे समुदायाच्या मानसशास्त्रात्री त्याला जाण असावी लागते. समुदायाला एका जागी बांधून ठेवण्याची प्रतिज्ञा करूनच नाटककार नाटक लिहितो. नाटक प्रेक्षकांच्या डोळ्यांसमोरून सारखे पुढे सरकत असते. रंगमंचावर चाललेला नाटकाचा प्रयोग थांबवून पुन्हा मागे नेणे अशक्य असते. कादंबरीचे वाचन थांबवून पुन्हा मागे पाने उलटता येतात. कादंबरीचे यशापयश कालांतराने समजते. परंतु नाटक यशस्वी झाले किंवा नाही हे नाट्यगृहातच समजून येते.

या संदर्भात पु. ल. लिहितात, ' नाटककाराची थिएटर ही दहनभूमि ! नाटकावरचे अखेरचे सर्व संस्कार तेथे व्हावयाचे.'

नाटक ही एक कला आहे. कलेत सुखविण्याचं सामर्थ्य असत, तसंच यशस्वी नाटकही प्रेक्षकांना सुखावत. अश्रूंची फुलं करण्याची किमया यशस्वी नाटककार करून दाखवतो. तसेच नाटक हा बुद्धिबळाचा डाव आहे. तो फार सावकाश व विचारपूर्वक खेळावा लागतो.

चांगला कादंबरीकार हा यशस्वी नाटककार होऊ शकेल काय ' या प्रश्नाचे उत्तर तसे अवघड आहे. ' शास्त्रोक्त गायनात ज्यानं प्रावीण्य मिळवलं तो पार्श्वसंगीत देण्याच्या कामी यशस्वी होईल कां ?' या प्रश्नाचे उत्तरही वरील प्रश्नाच्या उत्तराप्रमाणेच अवघड आहे. शास्त्रोक्त गायनांतील तयारी पार्श्वसंगीताच्या कामी उपकारकही ठरण्यासारखी आहे आणि ती विघातकही ठरण्याची शक्यता आहे. याचे कारण दोन्ही क्षेत्रांची तंत्रे भिन्नभिन्न आहेत. याप्रमाणेच नाटक व कादंबरी यांची तंत्रेही अशीच भिन्न आहेत.

सॉमरसेट मॉम कादंबरीकार म्हणून जितका यशस्वी झाला तितकाच नाटककार म्हणून. जे. बी. प्रीस्टली यानेही कादंबरी आणि नाटक या दोन्ही क्षेत्रांत नांव मिळवलं. ना. सी. फडके, वि. स. खांडेकर या प्रथितयश कादंबरीकारांनी नाट्यक्षेत्रात पदार्पण करण्याचा प्रयत्न केला, पण तो मात्र यशस्वी होऊ शकला नाही.

राम गणेश गडकऱ्यांचा सारा जन्म नाटक मंडळ्यांच्या वातावरणात गेल्याने नाट्यमय घटनांचा प्रेक्षकांच्या मनावर कसा प्रभाव पडतो, संवादाची कशी रचना केली की हंशा उत्पन्न होतो याचे बारकावे त्यांनी लक्षपूर्वक अभ्यासले होते. यामुळे त्यांनी नाट्यक्षेत्रात अलौकिक यश संपादन केले.

स्वतःच्याच कादंबरीवरून नाटक बेतणारे असे कांही लेखक आहेत. सुप्रसिद्ध विनोदी लेखक डॉ. अ. वा. वर्टी यांची अभिनय ही पहिलीच कादंबरी चांगलीच गाजली. नाट्यनिकेतनच्या मो. ग. रांगणेकरांनी सुचवल्यावरून डॉ. वर्टींनी या स्वतःच्या कादंबरीवरून ' राणीचा बाग ' हे नाटक लिहिले. या नाटकानं डॉ. वर्टींना अमाप यश मिळवून दिलं. अलिकडेच रणजित देसाई, श्री. ना. पेंडसे, श्री. ज. जोशी, जयवंत दळवी इ. मातब्बर लेखक आपापल्या कादंबरीवरून नाटक बेतण्यात अंशतः सफल झाले.

श्री. वसंत कानेटकरांनी सुरवातीला लिहिलेल्या ' पंख ' आणि ' पोरका ' या दोन कादंबऱ्यांनी वाचकांच्या मनाची पकड घेतली खरी, पण त्यानंतर त्यांनी सतत नाट्य लेखनाला वाहून घेतले.

यशस्वी नाटककार कसे व्हायचे याबाबत एक किस्सा सांगितला जातो एका प्रसिध्द नाट्य दिग्दर्शकाची एका थोर कांदबरीकाराशी गाठ पडली असता तो नाट्य दिग्दर्शक म्हणाला, " मित्रा, माझ्याकडे नाना धंद्यातील व्यक्तींनी लिहिलेली नाटके येतात. पण ती अगदी सामान्य दर्जाची असतात. हे लेखक सुध्दा नाटककार होण्याचे केविलवाणे प्रयत्न करीत असतात. जणू कांही नाटक लिहिल्यावाचून आपल्या पिंडाला कावळा शिवणार नाही असं त्यांना वाटत असतं. फक्त नाटककारांनी लिहिलेली नाटकेच चांगली असतात.

' पण आधी नाटककार कसे व्हायचे ते सांगाल की नाही ? ' लेखक.

ते मला सांगता येणार नाही. या प्रश्नाचे उत्तर फार अवघड आहे. जगात इतके लाखो लोक आहेत, त्यांतले फक्त हाताच्या बोटावर मोजण्याइतके लोकच नाटककार आहेत हे मात्र खरे.'

' समजा एखाद्या वकिलाने, डॉक्टरने चांगले नाटक लिहिले तर ?'

' मग ते नाटककारच होतील. फक्त नाटककारच चांगले नाटक लिहू शकतो. '

थोडक्यात म्हणजे हा एक प्रकारचा चक्रव्यूहच आहे. चांगले नाटक लिहिल्याशिवाय नाटककार होता येत नाही आणि नाटककार झाल्याशिवाय चांगले नाटक लिहिता येत नाही.

विनोदी नाट्यलेखनाचे एक वेगळेच तंत्र आहे. विनोदी नाट्यलेखन हे विनोदी वक्तृत्वाशी निगडीत असते. विनोदी वक्ता हा उत्तम विनोदी नाटककार होऊ शकतो. विनोदी वक्त्याला समुदायाच्या मानसशास्त्राची चांगली जाण असते. कोणत्या वाक्याची कशी रचना करायची व ते कशा पद्धतीने उच्चारले म्हणजे हशा उत्पन्न होतो याचे तंत्र त्याने आत्मसात केलेले असते. या अनुभवाचा त्याला विनोदी नाट्य लेखनात निश्चितपणे उपयोग होऊ शकतो. विनोदी संवादाची कशी रचना करायची व नाटका-

तील पात्रांनी ते कशा रीतीने उच्चारले म्हणजे हंशा पिकतो या तंत्राचा विनोदी नाट्यलेखनात तो सहजपणे उपयोग करतो व इष्ट परिणाम साधतो. विनोदी संवादात अचूक लय साधणे हे कठीण काम आहे. ही लय चुकली तर अपेक्षित परिणाम होत नाहीत.

समस्याप्रधान नाटकातले गंभीर संवादाचे मात्र तसे नसते. ज्याप्रमाणे गंभीर भाषणांचे परिणाम चटकन अजमावता येत नाहीत, त्याप्रमाणेच नाटकातील गंभीर संवादाचे परिणाम सुद्धा चटकन समजून येत नाहीत. उलटपक्षी विनोदी भाषणे किंवा विनोदी संवादाचे परिणाम प्रेक्षकांच्या हंशावरून लगेच अजमावता येतात.

कादंबरी किंवा लेखातील विनोद एकटया वाचकापुरताच मर्यादित असतो. परंतु एकांकिका किंवा नाटकातील विनोद हा समुदायासाठी असतो. त्यादृष्टीने समुदायाला चटकन आकलन होईल अशा कल्पनांचा व शब्दांचा खेळ नाटककाराला मांडावा लागतो. विनोद पोट धरधरून हंसविणारा आहे किंवा कसे याची कसोटी रंगभूमीवरच लागते. समुदायात विविध रुची असलेले प्रेक्षक बसलेले असतात. यामुळे सर्व प्रेक्षकांना आकलन होईल अशाच संदर्भाचा वापर करावा लागतो.

नाटकाचं मोठेपण कशात आहे याची मीमांसा करताना पु.लं.नी एका भाषणातून सांगितलं, ' नाटकाचं मोठेपण ते विनोदी आहे की गंभीर आहे, संगीत आहे की गद्य आहे, ह्याच्यावर ठरत नाही. त्यांतल्या पात्रांच्या अंतरीची ओढ कुठे आहे त्याच्यावर ठरते. एखाद्या व्यक्तीच्या वागण्यातील विसंगती दाखवून तात्पुरता हंशा पिकवता येईल. पण प्रवृत्तीतली विसंगती दाखवून हशा निर्माण करणारं नाटक प्रेक्षकांना हसवतं आणि अंतर्मुख होऊन विचार करायलाही लावत. रंगमंचावर एक चर्मचक्षूंना जाणवणारं नाटक चाललेलं असत आणि आपापल्या संस्कारातून घडणारं अंतःचक्षूंनी पाहायचंही एक नाटक आपल्या मनात चाललेलं असतं. आतल्या डोळ्यांना दिसणारं नाटक किती प्रभावी आहे यावरच त्या नाटकाचं आयुष्य अवलंबून असतं.'

' प्रेक्षक एखाद्या नाटकाला का गर्दी करतात आणि एखाद्या नाटकाला कां जात नाहीत याचे अचूक निदान करणे कठीण आहे. कारण जे जातात त्यांनाही ते नक्की सांगता येत नाही. एखाद्या लोकप्रिय नाटकातलं तुम्हाला काय आवडलं असा प्रश्न विचारला तर अनेक प्रकारची उत्तरं येतील. एक मात्र निश्चित की नाटक पाहायला जाणारा प्रेक्षक सांस्कृतिक कार्याला हात-भार लावला पाहिजे म्हणून जात नाही. तो आनंदासाठी, मनोरंजनासाठी जातो. ते मिळावे ही त्याची किमान अपेक्षा असते.'

' नाट्यसंमेलने कशासाठी ?' असा प्रश्न कांहीजण विचारतात. या

प्रश्नाला पु.लं.नी सडेतोड उत्तर दिले आहे. पुण्यात संभाजी पार्कजवळ बाल-गंधर्व नाटचमंदिर बांधण्याचे काम सुरू होते. त्यावेळी एक वयोवृद्ध गृहस्थ पु.लं.च्याकडे आले व त्यांना म्हणाले, 'अहो हे नाटचमंदिर बांधायला किती खर्च येणार आहे ? इतका खर्च कशासाठी ? नाटके तरी कशासाठी करता ? नाटचस्पर्धा कशासाठी ? त्यांतून काय फायदा ?'

पु. ल. बालगंधर्व रंगमंदिर रचनेचे सल्लागार होते. रंगमंदिराच्या खर्चाचा अंदाज सुमारे पस्तीस लाखाचा होता, तरीपण पु.लं.नीं मराठी मनाला पेलेल असा दोन लाखाच्या खर्चाचा अंदाज त्यांना सांगितला. तरी ते गृहस्थ म्हणाले, 'इतका प्रचंड खर्च कशासाठी करायचा ? त्याचा काय फायदा ?'

यावर पु. ल. उत्तरले, 'माणसं डोंगर कशासाठी चढतात ? डोंगर हे चढण्यासाठीच असतात म्हणून त्यावर चढतात नं ? सारस बागेत गुलाबाची फुले आहेत ती कशासाठी ? अशी कितीतरी उदाहरणे पु.लं.नी त्यांना दिली. पण त्यांचे कांही समाधान होईना. शेवटी पु. ल. त्यांना एक निर्वा-णीचा प्रश्न विचारणार होते, 'अहो आपण जगता आहात ! काय फायदा ?'



थोडक्यात म्हणजे नाट्यसंमेलने कशासाठी याचे उत्तर ' नाट्यसंमेलना-साठीच ' एवढेच आहे. नाट्यसंमेलन म्हणजे नाट्यकलेची आवड असलेल्या भिन्न रुचीच्या लोकांचा मेळावा होय. नाट्यक्षेत्रांत कलावंत, प्रेक्षक, समीक्षक, व्यवस्थापक, निर्माते अशा निरनिराळ्या रितीनं वावरणाऱ्या मंडळींनी आपल्या अनुभवांचा आणि विचारांचा फायदा इतरांना द्यावा अशी ही संमेलनं भरवण्यामागे इच्छा असते.

वेळोवेळी पु.लं.नी नाट्य व्यवसायाबद्दल मौलिक विचार व्यक्त केले आहेत. त्यांचा सारांश असा:–

' नाटक हा गर्दीपुढे करून दाखवायचा खेळ आहे. निरनिराळ्या कला आणि कारागिरीत प्रवीण असलेल्या लोकांनी एकत्र येऊन करायची ही कला निर्मिती असल्यामुळं त्यातला कुठला घटक कच्चा पडल्यामुळं प्रयोग फसला हे सांगणं अवघड. उपसंपादकांने एखादी डुलकी खाल्ली म्हणून वर्तमानपत्राचा धंदा गुंडाळावा लागत नाही. पण नुसत्या पडदेवाल्यानं जिथं पडदा पाडायचा तिथं डुलकी खाल्ली की पडद्याआधी नाटक पडतं. या धंद्यात निश्चिती नसल्यामुळं संपूर्ण वेळ करायचा व्यवसाय म्हणून इथं यायला फार थोडी माणसं तयार होतात. ' मी माझ्या मुलाला इंजिनीयर करीन, डॉक्टर करीन, शास्त्रज्ञ करीन हे म्हणणारेच आईबाप आहेत. माझ्या मुलाला मराठी रंगभूमीवरचा उत्तम नट करीन असं म्हणणारे आईबाप माझ्यातरी पाहाण्यात नाहीत.'

' मोठमोठ्या कचेऱ्यांतून क्रिकेटर्सना घेतले आहे, तसे मराठी तरुण नटनटींना नेमायला काय हरकत आहे ? या नवीन नटात अनेक गुणी नट आहेत. पण सर्वस्वी नाट्यव्यवसायावर जगणे ही तारेवरची कसरत आहे. ज्या मानाने नवीन तरुण ह्या क्षेत्रात आले त्या मानाने स्त्रिया आल्या नाहीत. मुंबई शहरात सुद्धा हीच स्थिती आहे. विवाहानंतर सकाळी दहा ते संध्याकाळी सहापर्यंत आपल्या बायकोला कारकुनी करायला पाठवणारा नवरा तिला नाटकात काम करायला जाऊ देत नाही. वाह्यात नाटकांना आपल्या घरातल्या बायकामाणसांना घेऊन जाणाऱ्या पुरुषांना चांगल्या नाटकात अभिनयाचा गुण असलेल्या स्वतःच्या पत्नीला पाठवणं धोक्याचं वाटतं. नाटकवाल्यांच्या इथलं वातावरण वाईट असतं आणि टेबलाखाली दडवून घाणेरड्या मासिकातले लेख वाचण्यात गुंतलेल्या कचेऱ्यांतले वातावरण भलतंच पवित्र असतं ! पण तिथे एक ठरलेला पगार मिळतो. या व्यवसायात थंडा फराळ करायची तयारी ठेवावी लागते. घरची चूल कधी थंड पडेल हे सांगणं अवघड आहे. ' हाऊस फुल 'चं उजळलेलं भाग्य केव्हां

मावळेल हे सांगणारा ज्योतिषी अजून जन्माला यायचा आहे. अशा या परिस्थितीतही जी माणसं इथं संपूर्ण वेळ नट किंवा नटी म्हणून टिकून राहिली त्यांच्याविषयी नाटचप्रेमी व्यक्तीला कृतज्ञता वाटायलाच हवी. जिथे उद्याची निश्चिती नाही आणि वार्धक्यात निवृत्तीवेतन नाही तिथं माणसं का टिकून राहातात याला 'वेड' या खेरीज उत्तर नाही.'

मराठी माणसाला नाटकाचे वेड आहे असं म्हणतात. लोकमान्य टिळक मंडालेच्या तुरूंगातून सुटल्यावर त्यांनी देशाच्या राजकीय परिस्थितीबद्दल चौकशी तर केलीच, त्याबरोबरच किर्लोस्कर नाटक कंपनीचं कसं काय चाललंय याबद्दलही विचारणा केली असं सांगतात.

परंतु अशी कितीतरी सधन असंख्य माणसं असतील की त्यांना नाटक कधी पहावं असं वाटलं नसेल. प्रत्येक कलेच्या क्षेत्रातही असंच असतं. क्रिकेटच्या क्षेत्रातही असंच आहे. अशी कांही विद्वान माणसं आहेत की ती क्रिकेट कशासाठी खेळायचं, टि. व्ही. वर, रेडिओवर धावते वर्णन कशासाठी, क्रिकेटची मॅच पाहाण्यात फुकट वेळ कशासाठी घालवायचा असे विविध प्रश्न विचारतात; त्यांना काय उत्तर द्यायचे ?

मुंबई–पुणे सायकल रेस कशासाठी ? हे एकशेवीस मैलाचे अंतर सतत पांच–सहा तास सायकल चालवून पार करायचे. देहाला इतके कष्ट तरी कशाकरता द्यायचे ? त्यापेक्षा सरळ आगगाडीने किंवा टॅक्सीने ही मंडळी का जात नाहीत असा प्रश्न जर कोणी विचारला तर त्याला काय उत्तर देणार ?

या नाटचव्यवसायाला अनेक समस्यांना तोंड द्यावे लागते. त्यापैकी 'फुकट पासाची' एक गंभीर समस्या आहे. 'नाटक' ही फुकट पासावरच पाहाण्याची गोष्ट आहे ही अगदी दरिद्री विचारसरणी आहे. इथे नाटच-निर्मात्याला खिरापतीसारखे फुकट पास वाटावे लागतात. आणि तेसुद्धा पहिल्या रांगेतले, मधल्या आसनांचे.

इंग्लंडमध्ये मात्र खुद्द महाराणीला आयत्यावेळी नाटक पाहायची इच्छा असूनही थिएटर 'हाऊसफुल' झाल्यामुळे मॅनेजरने नम्रतापूर्वक नकार दिला होता असे पु.लं.नी एका भाषणातून सांगितलं होतं.


HOUSE
FULL
श्याम जोशी

# ३

## नाटक हा बुद्धिबळाचा डाव आहे

विनोद ही मानवाला मिळालेली महान देणगी आहे. या देणगीमुळे तो जगत असतो. विनोद जितक्या साध्या सरळ रीतीनं सांगावा तितका तो जास्त परिणामकारक ठरतो. जो विनोद हंसवतो, मन प्रसन्न करतो, कांही काळ दुःख, काळज्या विसरायला लावतो, मनाला उभारी आणतो तो उत्तम विनोद होय.

विनोद हे एक दोष दाखवण्याचे प्रभावी शस्त्र आहे. विनोदाने समाजातील विसंगतीवर व अनिष्ट गोष्टींवर टीका करणे शक्य होते. विनोद हे गर्दीला हंसवण्याचे एक साधन आहे. समुदायाला काबूत ठेवण्यासाठी विनोदासारखे दुसरे प्रभावी शस्त्र नाही. विनोदाचे सामर्थ्य फार मोठे आहे. ओंगळ विनोदालाही माणसं हंसतात खरी, पण त्या हंसण्याची माणसाला नंतर लाज वाटते. निर्मळपणे हंसायला लावणाऱ्या नाटकांची निर्मिती तशी कमीच.

'पु.लं.चे अत्यंत लोकप्रिय झालेले पहिले विनोदी नाटक 'अंमलदार' होय. मुळ रशियन लेखक निकोलाय व्ही. गोगोल यांच्या डी. जे. कॅम्बेल याने केलेल्या इंग्रजी भाषांतरावरून रचलेले हे मराठमोळे रुपांतर. गोगोलने समाजाला लागलेल्या 'लाचलुचपत' या रोगाचे अचूक निदान आपल्या 'इन्स्पेक्टर जनरल' या नाटकातून विनोदाच्या आधारे केले. दि 'गव्हर्मेंट इन्स्पेक्टर उर्फ इन्स्पेक्टर जनरल' या गोगोलच्या मूळ नाटकाला मराठी साज चढवताना त्यात रुपांतरकाराने कांही काटछाट केली आहे. तसेच प्रयोगाच्या सोयीसाठी काही ठिकाणी स्वतंत्र मजकूरही समाविष्ट केला आहे.

जेव्हा परदेशी कलाकृतीचे रुपांतर केले जाते त्यावेळी मूळ संहितेत काटछाट ही अपरिहार्य असते. शिवाय स्थलकालाप्रमाणे इथल्या वातावरणाला पोषक असा स्वतंत्र मजकूरही घालणे इष्ट असते. अन्यथा मूळ

कलाकृती जरी कितीही गाजलेली असली तरी तिचे सहीनसही रुपांतर प्रेक्षकावर आपला प्रभाव पाडू शकत नाही. अनेक गाजलेल्या परदेशी कलाकृतींची अन्य मराठी लेखकांनी केलेली रुपांतरे फसल्याची कितीतरी उदाहरणं देता येतील. नाटकाच्या मूळ संहितेमधल्या न रुचणाऱ्या प्रसंगांची, मजकुराची काटछाट करून त्या जागी इथल्या प्रेक्षकांना रुचणारे आकर्षक प्रसंग, संवाद घालून नाटक बांधेसूद करणे हे रुपांतरकाराचे कौशल्य आहे. या प्रक्रियेत पु.लं.चा हातखंडा आहे हे मात्र निर्विवाद.

रशियाच्या झारने गोगोलच्या मूळ नाटकाचे हस्तलिखीत वाचले होते. त्याच्या स्वतःच्या राजवटीवर या नाटकात विदारक टीका असूनही त्याचा प्रयोग झालाच पाहिजे असा त्याने आग्रह धरला. हा प्रयोग पाहाताना खुद्द झार पोट धरधरून हंसला.

'अंमलदार' या नाटकाचा पहिला प्रयोग विदर्भ साहित्य संघमंदिराच्या मदतीसाठी नागपूर नाटचमंडळाने शनिवार ता. १६ फेब्रुवारी १९५२ रोजी व्ही. टी. आय. हॉल, नागपूर येथे केला. या प्रयोगाच्यावेळी विदर्भाचे नाट्याचार्य वीर वामनराव जोशी उपस्थित होते. या नाटकाच्या पुस्तकाची पहिली आवृत्तीसुद्धा विदर्भ साहित्य संघातर्फे १९५२ मध्ये प्रसिद्ध झाली व त्यापोटी पु.लं.नी. कोणत्याही प्रकारचे मानधन घेतले नाही.

पु.लं.नी रुपांतर करताना भारतांतील विलीन झालेल्या एका छोटया संस्थानाची पार्श्वभूमी घेतली व प्रेक्षकांच्या मनाची पकड घेईल असे वातावरण निर्माण केले. हे वातावरण प्रेक्षकांना परिचयाचे तर वाटेलच. एवढच नव्हे तर त्यांतील पात्रेसुद्धा नित्याच्या जीवनातील आहेत इतकी ती जवळची वाटतील. समाजातील विविध स्तरांवरील भ्रष्टाचाराचं मर्मभेदक चित्रण पु.लं.नी विनोदाच्या आधाराने या नाटकात केलं आहे. प्रस्तुत नाटकातील प्रत्येकाचा दाम खोटा आहे हे प्रत्येकाला माहीत आहे. इथली प्रत्येक व्यक्ती पदोपदी खोटं बोलण्यात सरावली आहे. जेठूमल मारवाड्याने साखरेचा काळाबाजार केला म्हणजे खून नाही ना केला असे सहजपणे जज्ज टुमणे बोलतात. त्यांच्या या वाक्यावर प्रेक्षक हसतात.

या नाटकात सर्जेरावची मध्यवर्ती भूमिका असून स्वतःची ओळख करून देताना त्याला एक स्वगत म्हणावे लागते, ते वैशिष्टयपूर्ण आहे. नंतर त्याची संस्थानातील एकेका लाचखाऊ आणि निष्क्रिय अधिकाऱ्यांशी जेव्हा गाठ पडते व काहीतरी घोटाळा झाल्यामुळे ते सर्वजण त्याला लाच देतात तेव्हा धमाल उडते. यामुळे प्रेक्षकांची भरपूर करमणूक होते. नाटककाराच्या उपरोधपूर्ण विनोदाने नाटकातील जज्ज, पोस्टमास्तर, डि. एस्. पी., दोन

भिक्षुक, इ. दुय्यम पात्रांची स्वभावरेखा ठळकपणे आपल्या नजरेत भरते. सर्जेरावच्या स्वभावाचे प्रतिबिंब त्याच्या शेवटच्या पत्रांत आपल्याला पाहायला मिळते.

'अंमलदार' रुपांतरीत असले तरी त्याचे महाराष्ट्रात खूप प्रयोग झाले. 'अंमलदार' म्हणजे हमखास रंगणारा प्रयोग असेच समीकरण होऊन बसले. या नाटकामुळेच पु. ल. मराठी रंगमंचावर पाय रोवून उभे राहिले.

नागपुरातील प्रथितयश नाटककार गणेश शिवराम उर्फ नाना जोग हे पु.लं.चे मित्र होते. 'अंमलदार' नाटक लिहिण्याचे व ते रंगभूमीवर आणण्याचे धाडस माझे ज्येष्ठ स्नेही श्री. नाना जोग यांच्या प्रेरणेमुळे मला झाले.' असे पु.लं.नी 'अंमलदार'च्या पहिल्या आवृत्तीच्या प्रस्तावनेत म्हटले आहे. नाना जोगांनी या नाटकाच्या प्रयोगासंबंधी ज्या महत्त्वाच्या सूचना केल्या त्या या पुस्तकात पाहायला मिळतात. 'नटांनी या नाटकाचा प्रयोग 'फार्स'सारखा करू नये. अन्यथा हे रुपांतर हास्यकारक होण्याऐवजी हास्यास्पद होण्याची भीती आहे.' अशी एक सूचना जोगांनी केली.

पु.लं.चे 'मोठे मासे आणि छोटे मासे' हे तीन विनोदी एकांकिका समाविष्ट केलेलं पुस्तक त्यांनी 'नाना जोग' यांना अर्पण केलं आहे.

नाना जोग यांचे निधन झाल्यावर कांही दिवसांनी पु. ल. नागपूरला गेले होते. त्याच दिवशी नागपूरला रंजन कलामंदिरातर्फे 'सदू आणि दादू' या एकांकिकेचा प्रयोग होता. पु. ल. प्रयोगाला गेले नाहीत. 'मी आज हंसण्याच्या मूडमध्ये नसल्यामुळे प्रयोगाला बसणार नाही.' असे पु.लं.नी नम्रपणे सांगितले.

नागपूरचे विदर्भ साहित्य संघाचे नाट्यगृह नाना जोगांच्या प्रेरणेनेच सुरू झाले. या नाट्यगृहाला नागपूरच्या एका बड्या उद्योगपतीने पन्नास हजारांची देणगी दिल्यामुळे त्यांचे नाव या नाट्यगृहाला देण्याचे ठरले. पण पन्नास हजाराची रक्कम कशी बरे पुरणार ? तेव्हां उरलेल्या रकमेची मागणी पु.लं.च्याकडे करावी असे कुणीतरी सुचवले. पु.लं.नी लगेच एका अटीवर त्यांची मागणी मान्य करण्याचे ठरवले. नाना जोगांचे नाव या नाट्यगृहाला देणार असाल तर पु.लं.नी एक लाख रुपये देण्याची तयारी दर्शवली. तशी ही अट साधी होती, पण नागपूरकरांना ती मान्य झाली नाही.

नाना जोगांच्या कर्तृत्वामुळे विदर्भ साहित्य संघाचे रंगमंदिर उभे राहिले, तरी आतापर्यंत त्यांचे योग्य असे स्मारक नागपुरात झाले नव्हते. तथापि त्यांच्या नाट्यक्षेत्रातील कार्याची योग्य जाणीव ठेवून पुण्याला अलीकडेच

त्यांचे यथोचित स्मारक करण्यात आले. पुण्याच्या भरत नाट्य संशोधन मंदिराच्या वर्धापन दिनी पु.लं.नी मंदिराच्या चित्र-ग्रंथ संग्रहालयास रुपये पंचवीस हजाराची देणगी दिली व संग्रहालयाला नाना जोग यांचे नांव देण्याची इच्छा प्रदर्शित केली. त्याप्रमाणे भरत नाट्यमंदिराने सदर संग्रहालयाला नाना जोगांचे नांव दिले. यावेळी पु.लं.नी स्वत:जवळ असलेले नाना जोगांनी लिहिलेल्या 'हॅम्लेट' नाटकाचे हस्तलिखित संग्रहालयाला देणगी म्हणून दिले.

मुंबई मराठी साहित्य संघातर्फे 'अंमलदार'चे प्रयोग होत असत त्या सुमाराची ही घटना आहे. संघातर्फे होणारे हे प्रयोग हमखास रंगत असत. पु.लं.ना हे समजल्यावर त्यांनी या नाटकात 'सर्जेरावची' भूमिका करण्याचे मान्य केले. त्याप्रमाणे साहित्य संघाने 'अंमलदार'चा प्रयोग केला. त्यात पु.लं.नी सर्जेरावाची भूमिका केली व नाना अभ्यंकरांकडे नेहमीची म्हणजे हरभटाची भूमिका होती. नेहमीप्रमाणे हा प्रयोग हमखास रंगला. प्रयोग संपल्यावर घरी जाताना पु. ल. नाना अभ्यंकरांनाम्हणाले, 'वाक्यावाक्याला नव्हे तर शब्दाशब्दाला प्रेक्षकांची पावती घेणारा हरभट मी आज प्रथमच पाहिला. मी स्वत: या नाटकाचा लेखक. पण नाटकाचा नायक सर्जेराव की हरभट असा मला भ्रम पडला आहे.' पु.लं.च्या मिष्किलपणाचा हा नमुना नाट्यदर्पण डिसेंबर १९७९ च्या अंकात श्री. नाना अभ्यंकरांनी कथन केला आहे.

१९५२ पासून या नाटकाच्या एकूण सहा आवृत्त्या प्रसिद्ध झाल्या असून पंधरा हजाराच्यावर प्रती संपल्या आहेत. अजूनही या नाटकाला सतत मागणी असते.

अंमलदारच्या यशाची झुळुक पु.लं.ना सुखावुन गेली. या यशाने उत्साहित होऊन पु.लं.नी 'भाग्यवान' हे नाटक लिहिले. या नाटकाची कल्पना पु.लं.ना सॉमरसेट मॉमच्या 'शेपी' या नाटकावरून जरी सुचली तरी ते 'शेपी'चे भाषांतर वा रुपांतर नाही. याबाबत पु. ल. प्रस्तावनेत म्हणतात, 'मॉमचा नायक शेपी ज्या परिस्थितीत सापडला तशाच परिस्थितीत आमच्या इथला 'शिदबा' जर सापडला असता तर तो कसा वागला असता याचे जे चित्र माझ्या कल्पनेने रेखाटले, त्यातून या नाटकाचा जन्म झाला. एका अत्यंत चांगल्या कलाकृतीची आपल्या मन:पटलावर उमटलेली भावचित्रे आणि स्वत:वर आजवर झालेले अन्यसंस्कार यांच्या मिश्रणातून नवीन कलाकृती निर्माण करण्याचा हा प्रयत्न आहे.'

तसे पु. ल. स्वत: भावनाशील आहेत. कुठलीही मुलगी लग्न होऊन

सासरी जाण्याचा प्रसंग त्यांना बघवत नाही. त्यांना अंगठा चोखणारं मूल सुंदर वाटतं. त्यांच्यामते भारतीय गाय हा अतिशय सुंदर प्राणी आहे.

लहानपणापासून पु.लं.ना 'गरिबांची दया फार' असं त्यांच्या कनिष्ठ भगिनी सौ. मीरा दाभोळकर यांनी 'माझा भाई' या 'नाटयदर्पण' मधील लेखात म्हटलं आहे. सौ. दाभोळकर पुढे लिहितात, 'मातोश्रींशी अवांतर गप्पाटप्पा झाल्यावर पु. ल. हळूच मातोश्रींना विचारत, 'आई, माझा एक मित्र आहे. त्याला राहायला जागा नाही. हुषार आहे बेटा, मी त्याला आपल्या घरी आणू का ? आपल्यात राहील !'

ही भावुकता एका विशिष्ट प्रमाणात 'भाग्यवान' नाटकात आढळते.

तसेच पु.लं.च्या लिखाणातून, भाषणातून, सामाजिक जाणीवेची छटा व राष्ट्रीय संवेदन क्षमता दिसून येते. हे सारे संस्कार त्यांच्या लहानपणीच झाले होते. या संदर्भात पु. ल. लिहितात, 'जुना काळ हा त्यागाचा, चढाओढीचा काळ होता. गांधी तुरूंगात असले तर आमच्या घरी दिवाळीला फराळ होत नसे. 'गांधी तुरूंगात आहेत मग आपण इथं लाडू कसे खायचे ?' असं पु.लं.ची आजी म्हणायची.

असे हे पु.लं.च्यावर झालेले अन्य संस्कार. या संस्काराचे प्रतिबिंब पु.लं.नी रेखाटलेल्या 'भाग्यवान' मधील पात्रांत उमटले आहे

एक सुबक नाटक असे 'भाग्यवान'चे वर्णन करता येईल. नाटकाचा नायक शिदबा हा एक साधा सरळ माणूस असतो, जणू काही देवांच्या दुनियेतला एक. त्याला शब्दकोडयांत अगदी सहजपणे तीस हजार रुपयांचे बक्षीस मिळते. शिदबाला आयत्या पैशावर जगायची इच्छा नसते. त्यामुळे या प्रचंड रकमेचे काय करायचे हे त्याला सुचेनासं होतं. शेवटी बाळंतपणाच्या मोफत दवाखान्याला हे सारे पैसे तो द्यायचे ठरवतो.

या नाटकात भावनांचे अतिरेकी प्रदर्शन नसले तरी त्यातील शिदबाच्या रुपाने माणुसकीचे मनोज्ञ दर्शन घडते. 'शिदबासारख्या अडाण्यांच्या जगातील माणसं डोक्यानं जगत नाहीत तर फक्त अंतःकरणाने जगतात.' असं लेखक सांगतो.

पु.लं.च्या व्यक्तिमत्त्वात सामाजिक दानतीचे बीज लहानपणापासूनच रुजले असावे असे शिदबाच्या चित्रणावरून दिसून येते. शिदबासारखा एक अडाणी व दरिद्री माणूस तीस हजार रुपये मिळाल्यावर त्या पैशाचा हव्यास न धरता सार्वजनिक सेवाकार्याला ते पैसे देण्याचे ठरवतो यावरून लेखकाच्या मोठ्या मनाची कल्पना येते. स्वतः पु.ल. हे काल्पनिक चित्र रंग-

वून थांबले नाहीत तर जेव्हा स्वतःला लक्ष्मी प्रसन्न झाली तेव्हा त्यांनी ही कल्पना प्रत्यक्षात आणून दाखवली.

पु.लं.नी आतापर्यंत दिलेल्या देणग्यांचा हिशोब केला तर तो दहा लाखाच्या घरात जाईल. अंधशाळा, बाबा आमटे यांचा कुष्ठाश्रम, रुग्णालये, रक्तपेढी, पुणे विद्यार्थी गृहातर्फे उभारण्यात येणाऱ्या 'मुक्तांगण' प्रकल्पासाठी त्यांनी या देणग्या दिल्या.

एका जाहीर सभेत त्यांच्या या दातृत्वाचा गौरव करताना कुणीतरी त्यांना 'दानशूर' म्हटलं. यावर पु. ल. म्हणाले, 'दानशूर' वगैरे विशेषणे मला लावू नयेत. ते लावले की उगीचच मला पोट सुटलेल्या मारवाड्या-सारखं वाटायचं!'



पु.लं.चा एक गुणविशेष म्हणजे सार्वजनिक सेवाकार्याला त्यांनी देणग्या दिल्या तरी एका शब्दाने त्याचा कधीही उल्लेख वा गाजावाजा केला नाही.

'दानशूर लेखक ही मराठी, भारतीय अन् कदाचित जागतिक साहित्यातही अभूतपूर्व गोष्ट आहे. ही दानाची प्रेरणा कुठून आली?' असा प्रश्न ललित मासिकातर्फे घेतलेल्या एका प्रदीर्घ मुलाखतीत श्री. विद्याधर पुंडलीक यांनी पु.लं.ना विचारला असता, त्याला पु.लं.नी उत्तर दिले नाही.

'पु. ल. एक साठवण' या पुस्तकाचे कांही हजारो रुपयांचे मानधनही त्यांनी स्वत:साठी न ठेवता ते पूर्णपणे सार्वजनिक संस्थेला देणगी म्हणून दिले.

'भाग्यवान'चा पहिला प्रयोग १९५३ च्या जानेवारीत मुंबई मराठी साहित्य संघातर्फे करण्यात आला. साहित्य संघाचे डॉ. अ. ना. भालेराव यांनी श्री. चिंतामणराव कोल्हटकरांना या नाटकाच्या तालमी घेण्यास सांगितले व त्यांनी ते मान्य केले. श्री. कोल्हटकरांनी परिश्रम घेऊन हे नाटक रंगभूमीवर आणले. या नाटकाच्या पुस्तकाची पहिली आवृत्ती १९५३ मध्ये प्रकाशित झाली. त्यानंतर या पुस्तकाच्या दोन आवृत्त्या प्रसिद्ध झाल्या.

लेखकाने हे नाटक श्री. चिंतामणरावांना अर्पण केलं आहे. अर्पण पत्रिका येणेप्रमाणे:-

रंगभूमीवर 'घन:श्याम' म्हणून गाजलेले<br>
पण व्यवहारात 'धुंडीराज' ठरलेले<br>
माझे नाटयगुरु<br>
श्री. चिंतामणराव कोल्हटकर यांना<br>
प्रेमादरपूर्वक अर्पण.

—पुरुषोत्तम.

तसेच पुस्तकाच्या प्रास्तविकेत पु ल. लिहितात, 'हे नाटक प्रयोगरुपाने रंगभूमीवर आणण्यासाठी, नाटसृष्टीत वयाची साठी उलटली तरी तरुणाच्या उत्साहाने अजून राबणारे गुरुवर्य चिंतामणराव कोल्हटकर यांनी जे परिश्रम घेतले त्याबद्दलचे ऋण शब्दांनी फिटणार नाहीत.'

याला प्रत्युत्तर म्हणून की काय 'बहुरूपी' या ग्रंथात श्री. चिंतामणराव कोल्हटकर लिहितात, 'मुंबई मराठी साहित्य संघाकरता पु. ल. देशपांडे यांनी लिहिलेल्या 'भाग्यवान' या नवीन नाटकाच्या तालमी घेण्याची कामगिरी डॉ. भालेराव यांनी मला सांगितली आणि मीहि ती मोठ्या आनंदाने मान्य केली. माझ्या तरुण मित्राला 'माझे नाटककार' म्हणण्याचा योग अशा प्रकारे येईल याची मला पुसटही कल्पना नव्हती. माझ्या आवाक्या

प्रमाणे मी तालमी घेतल्या. या नाटकाच्या पुस्तकात नाटककाराने एवढा मोठा बोजा माथ्यावर ठेवला आहे की काहीही मत प्रदर्शित करणे शिष्टाचाराला सोडून होईल. श्री. देशपांडे मराठीतील पहिल्या प्रतीचे नाटककार होवोत एवढीच माझी सदैव सदिच्छा राहणार !'

पु.लं.नी आपल्या नाटचगुरुबद्दल काढलेले गौरवपर उद्गार किंवा श्री. कोल्हटकरांनी आपल्या गुणी शिष्याच्या पदरात टाकलेले स्तुतीचे माप, यावरून या गुरुशिष्यांच्या उदार अंतःकरणाची आपल्याला कल्पना येते.

'देवापेक्षा देवमाणसांच्या आशीर्वादाचे बळ मोठे असते.' असे पु.लं.नी एका लेखात नमूद केले आहे. पु.लं.ना श्री. कोल्हटकरांनी आशीर्वाद दिला होता. 'श्री. देशपांडे मराठीतील पहिल्या प्रतीचे नाटककार होवोत' अशी श्री. कोल्हटकरांनी प्रदर्शित केलेली सदिच्छा आता लवकरच साकार होणार होती. नियतीची तशी इच्छा होती.

नाटकाचा बुद्धीबळाचा डाव पु. ल. सावकाशीने पण चतुराईने खेळत होते. त्यात त्यांनी नेत्रदिपक यश मिळवलं.

'तुझे आहे तुजपाशी' हे 'भाग्यवान' नंतर लिहिलेले नाटक यशाचा भरघोस नजराणा घेऊन आले.

२६ जानेवारी १९५७ हा दिवस पु.लं.च्या नाटचप्रवासातला अविस्मरणीय ठरला.

● ●

# ४

## ‘ वंदेमातरम् ते गुळाचा गणपती ’

कोल्हापूरमधील पॅलेस थिएटरच्या रिकाम्या रंगपटात दिवसा एक आकर्षक व्यक्तिमत्त्वाचा तरुण येरझाऱ्या घालत एकाग्र चित्तानं पुस्तक वाचत होता. हातात पुस्तक घेऊन येरझाऱ्या घालत अभ्यास करण्याची अशीही एक पद्धत आहे. अशा पद्धतीने काही दिवस त्या तरुणाचा अभ्यास चालला होता. रंगपटाच्या बाहेरच्या हॉलमधे राजाराम कॉलेजचे विद्यार्थी गॅदरिंगसाठी आचार्य अत्रेकृत ‘ लग्नाची बेडी ’ हे नाटक बसवत होते. या नाटकाच्या तालमी चालू असताना या तरुणाने हॉलमध्ये कधी डोकावून पाहिले नाही, इतका तो तन्मयतेने अभ्यास करत होता. एक दिवस तालीम संपल्यावर तो तरुण हॉलमध्ये आला व त्याने खणखणीत आवाजात एन्ट्रीचे वाक्य म्हटले, ‘ आता ‘ अवधूत ’चा रोल कोण वाचत होता ?’

हे ऐकताच एक पोरसवदा तरुण पुढे आला व भीतभीतच म्हणाला, ‘ मी,– मीच ! ’

‘ एवढाच एक समजून बोलतोय ! ’ तो तरुण झटदिशी बोलून गेला.

श्री. पु. ल. देशपांडे व श्री. राम गबाले यांची पहिलीवहिली भेट ही अशी.

पु. ल. कॉलेजमध्ये असताना नाटकातून काम करत, तरीपण त्यांनी अभ्यासाकडे कधीच दुर्लक्ष केलं नाही. वरील घटना घडली त्यावेळी पु.लं.च्या कंपनीचा मुक्काम कोल्हापूरला होता. ते स्वत: रात्री नाटकातून काम करत व दिवसा थिएटरच्या रिकाम्या रंगपटात अभ्यास करीत. त्याचवेळी श्री. राम गबाले त्यांच्या कॉलेजच्या गॅदरिंगसाठी ‘ लग्नाची बेडी ’च्या तालमी घेत होते. वर उल्लेख केल्याप्रमाणे पु.लं.नी राम गबालेंची

पाठ थोपटल्यामुळे ते खूष झाले. या भेटीनंतर या दोघांची दोस्ती वाढत जाऊन श्री. गबाले हे पु.लं.च्या बैठकीतले झाले.

पु. ल. फर्ग्युसन कॉलेजमध्ये शिकत असताना त्यांची व संगीत दिग्दर्शक श्री. राम कदम यांची ओळख झाली. पु. ल. कॉलेजचे एक संगीत नाटक बसवत होते व संगीताची जबाबदारी अर्थात त्यांच्याकडेच होती. चालींना उठाव देण्यासाठी त्यांना क्लॅरोनेट वादकाची जरूरी होती. पु.लं.ना प्रभात स्टुडिओतील राम कदम यांचे नाव कुणीतरी सुचवले. लगेच पु. ल. कदमांना भेटण्यासाठी प्रभात स्टुडिओत आले.

नंतर गप्पांच्या ओघात पु. ल. कदमांना म्हणाले, 'मी कॉलेजचे नाटक बसवतोय. आपण क्लॅरोनेट वाजवायला याल का? आपण किती फी घ्याल?'

पु.लं.च्या प्रसन्न व्यक्तिमत्त्वामुळे राम कदम इतके भारावून गेले की पु.लं.ना फी सांगण्याचे धैर्य त्यांना झाले नाही. तरीपण ते नाटकांच्या तालमींना हजर राहिले. पु.लं.नी दिलेल्या चालीतील गोडवा ऐकून श्री. राम कदम थक्क होऊन गेले.

एकाच वेळी दोन व्हायोलीन वादक, माझ्यासारख्या निष्णात क्लॅरोनेट वादक साथीला घेऊन गाणं म्हणायची पु.लं.ची ती पहिलीच वेळ असल्यामुळे ते सुद्धां भलतेच खूष झाले असं राम कदम सांगतात.

नाटक पार पडल्यानंतर या दोघांची रस्त्यात क्वचितच् गाठ पडायची' एकदा गाठ पडल्यावर मात्र त्यांच्या गप्पा खूप रंगायच्या. पु. ल. तर गोष्टी वेल्हाळ. त्यांच्या नेहमीच्या संवयीप्रमाणे खांद्यावर हात ठेवून भरपूर गप्पा मारायचे, गाण्यांच्या नवीन चाली ऐकवायचे. त्या नावीन्यपूर्ण चालीतील गोडवा ऐकून राम कदम मंत्रमुग्ध होत. पु. ल. भेटले की कदम त्यांना विचारत, 'आपल्याकडे इतक्या अफलातून चालींचा खजीना असताना आपण चित्रपटांना संगीत कां देत नाही?'

'माझं शिक्षण चाललय्. तूर्त वेळ नाही.' असं काहीतरी सांगून पु. ल. आपली सुटका करून घेत.

अशीच दोन–तीन वर्षे निघून गेली. एके दिवशी प्रभात स्टुडिओत या दोघांची अचानक गाठ पडली. नाट्यनिकेतनचे श्री. मो. ग. रांगणेकर 'कुबेर' हा चित्रपट काढत होते व त्याचे चित्रीकरण प्रभात स्टुडिओत चालल होतं. या चित्रपटात नायिकेचा भाऊ म्हणून पु.लं.ना रोल मिळाला होता. त्याचवेळी प्रभातमध्ये शांताराम आठवले यांचा 'भाग्यरेखा' हा चित्रपट तयार होत होता. शांता आपटे 'भाग्यरेखा'ची नायिका होती व पु.लं.च्या

कडे नायिकेचा भाऊ म्हणून आणखी एक भूमिका आली.

कुबेर चित्रपटात 'जाग जाग ग सखी' हे गीत पु.लं.नी गायले होते. केशवराव भोळ्यांच्याकडे या चित्रपटाचे संगीत दिग्दर्शन असल्यामुळे पु.लं.ना भोळ्यांच्या तालमीत संगीत दिग्दर्शन पाहाण्याची अमोल संधी लाभली.

केशवराव भोळे पु.लं.ची ओळख करून देताना राम कदमांना म्हणाले, 'बेटयाचा गोविंदराव टेंब्यांसारखा पेटीवर हात आहे.' यावर पु. ल. लगेच त्यांना म्हणाले, 'अहो, माझ्या कॉलेजच्या नाटकाला कदम तर क्लॅरोनेट वाजवायला आले होते, ना!'

'मंगल पिक्चर्स'चा 'मोठी माणसं' हा पु.लं.नी संगीत दिलेला पहिला चित्रपट होय. या चित्रपटाची गीते व कथा श्री. ग. दि. माडगूळकरांची होती. आपण संगीत दिग्दर्शक कसे झालात?' या प्रश्नाला उत्तर देताना पु.लं.नी एकदा सांगितलं, 'ग. दि. माडगूळकरांनी मी संगीताची बाजू सांभाळावी असा आग्रह धरला. त्यातून राम गबालेंसारखा मित्र पाठीशी उभा असल्यामुळे मी संगीत दिग्दर्शनात पडलो. तसे व्यावसायिक नट म्हणून रंगभूमीवर पदार्पण केल्यावर संगीताच्या अभ्यासाचा आपल्याला उपयोग होईल हे मला उमजले. 'शारदे'मधील कोदंडाची भूमिका, भावबंधन, राजसंन्यासमधील गाणाऱ्या नटांच्या भूमिका मी चिंतामणराव कोल्हटकरांच्या 'ललित कलाकुंजा'मध्ये करत असे. यामुळे संगीताच्या अभ्यासावर जास्त जोर द्यावा असं वाटू लागलं. आणि त्या दृष्टीने दत्तोपंत राजोपाध्यांकडे संगीताचे धडे घेण्यास सुरवात केली.'

राम गबाले व पु.लं.ची खरी दोस्ती प्रभातमध्येच जमली. पु. ल. काम करत असलेल्या 'कुबेर' चित्रपटाचे चित्रीकरण प्रभात स्टुडिओत नुकतेच सुरू झाले होते. त्याचवेळी ग. दि. माडगूळकर, सुधीर फडके, राम गबाले ही सारी मंडळी 'प्रभात'मध्ये 'आगेबढो' या चित्रपटात गुंतली होती. याच सुमारास श्री. पु. रा. भिडे यांना त्यावेळी नुकत्याच झालेल्या स्वातंत्र्य संग्रामावर चित्रपट काढण्याची कल्पना सुचली. त्यांनी ग. दि. माडगूळकरांना चित्रपट कथा लिहिण्यास पाचारण केले. स्वतः ग. दि. मां. नी स्वातंत्र्य लढ्यात भाग घेतला होता, त्यामुळे त्यांनी हे आगळे कथानक सहज हातावेगळे केले. या चित्रपटाचे नाव होते 'वंदेमातरम्' व दिग्दर्शन होते राम गबालेंचे.

कथानकाची निश्चिती झाल्यावर चित्रपटाच्या नायकाचा शोध सुरू झाला. एका आगळ्या विषयावरील कथानकामुळे लोभस व देखणी परंपरा

असलेला नायक या चित्रपटाला चालणार नव्हता. तेव्हा आकर्षक व्यक्तिमत्त्व असलेला नायक घेण्याचे ठरले. माडगूळकरांनी नायकासाठी पु.लं.चे नांव सुचवले व त्यांच्या जोडीला नायिका म्हणून सुनीताबाईंचे नांव पुढे आले. लगेच त्या दोघांची निवडही झाली. हिरो म्हणून खऱ्या अर्थाने वंदेमातरम् हा पु.लं.चा पहिला चित्रपट ठरला.

पु. ल. सिनेमात काम करणार ही बातमी त्यांच्या श्वशुरगृही जाऊन पोहोचली. पु.लं.चे श्वशुर श्री. ठाकूर हे रत्नागिरीतील एक प्रतिष्ठित फौजदारी वकील म्हणून ओळखले जात. अशा मातब्बर वकीलांचे जामात रंगरंगोटी करून सिनेमात काम करणार हा तेथे एक चर्चेचा विषय बनला. व त्याचे पडसाद बाररूममध्ये उमटले.

पु.लं.च्या श्वशुरांना उद्देशून बाररूममध्ये एका कवळीतून शब्द फुटले, 'आप्पा, तुमचा जावई सिनेमात काम करणार म्हणे. फार घाणेरडी माणसं असतात तिथं.'

'म्हणून तर घाणेरडे सिनेमे निघतात. चांगली माणसे तिथे गेल्याशिवाय चांगले सिनेमे कसे निघतील ? त्यातून आमच्या जावयांबरोबर तुम्ही म्हणता तसल्या वाईट नटीने काम करण्याऐवजी आमच्या मुलीने काम केलेलं काय वाईट !' असे सांगून आप्पासाहेबांनी सर्वांना निरुत्तर केलं.

पु.लं.ची नायक म्हणून निवड झाल्यावर त्यांना चित्रीकरणापूर्वी कॅमेरा टेस्ट द्यावी लागली. श्री. आगाशे हे कॅमेरामन होते. त्यांनी स्वतः स्वातंत्र्य संग्रामात भाग घेतल्यामुळे 'वंदेमातरम्' बद्दल त्यांना साहजिकच व्यक्तिगत जिव्हाळा वाटत होता. कॅमेरा घेऊन ते विठ्ठलवाडी रस्त्यावर आले. सोबत श्री. राम गबाले व पु. रा. भिडेही होते. पु. ल. व सुनीताबाईंनी दोनदोन डायलॉग म्हटले व त्या प्रसंगाचं चित्रीकरणही पार पडलं. ही अशी पहिली वहिली पु.लं.ची स्क्रिन स्टेस्ट.

'वंदेमातरम्'च चित्रीकरण कोल्हापूरमधल्या शालिनी स्टुडिओत झालं. कोल्हापूरमधील श्री. मेढेकर हे सुनीताबाईंचे स्नेही होते. त्यांच्याकडे या नायक-नायिकेचा मुक्काम असे. स्टुडिओतून घरी येताना दुसऱ्या दिवशी लागणारे कपडे (ड्रेपरी) पु. ल. व सुनीताबाई स्वतःच खरेदी करत. एखादा विशिष्ट रंगाचा खण हवा असल्यास तो खरेदी केला जाई व सुनीताबाई स्वतः श्री मेढेकरांच्या मशीनवर चोळी शिवत. ही सारी ड्रेपरी दुसऱ्या दिवशी पिशवीतून स्टुडिओत स्वतःबरोबर नेली जाई. क्वचित प्रसंगी चित्रपटातल्या सैंपाकघराच्या सजावटीसाठी पिशवीतून दांडयाच पातेलं, गाळण, चमचे, ओगराळ, चिमटा, स्टोव्ह इ. आवश्यक सरंजाम



श्री. गबाले यांच्या घरून घेऊन ही दुक्कल चित्रीकरणाला वेळेवर हजर राहायची. अलीकडच्या जमान्यातील नट–नटींकडून होणारी अडवणूक इ. प्रकार त्यावेळी नव्हता. दुसरा हप्ता जोपर्यंत हातात पडत नाही तोपर्यंत मी सेटवर येणार नाही अशा प्रकारची भाषा त्यावेळी नव्हती. पु. ल. व सुनीताबाईंनी संपूर्णपणे सहकार्य केले. अशा तऱ्हेनं हा चित्रपट पूर्ण केला गेला.

प्रस्तुत चित्रपट प्रदर्शित होण्याच्या वेळी भारत स्वतंत्र झाला होता तरी

सेन्सॉरने या चित्रपटाचा जवळजवळ एक चतुर्थांश भाग कापला. त्यामुळे सर्वजण रडकुंडीला आले. तशाही अवघड परिस्थितीत सर्वांनी हिंमत धरून तो चित्रपट प्रदर्शित केला. 'वंदेमातरम्'चे वास्तव चित्रण, अत्यंत तन्मयतेने केलेला अभिनय, आकर्षक संवाद व चैतन्य देणारी स्फूर्ती गीते व सुरेल संगीत यामुळे प्रेक्षकांनी या चित्रपटाला गर्दी केली. सेनापती बापट, आचार्य अत्रे या मातब्बर मंडळींनी हा चित्रपट आवर्जून पाहिला. 'वंदेमातरम्'च्या यशामुळे सर्वांनाच हुरूप आला.

'वंदेमातरम्' नंतर पु.लं.च्या रुपेरी कारकिर्दीच्या यशाचा आलेख चित्रपट कथालेखक, संगीत दिग्दर्शक, गीतकार व त्यानंतर दिग्दर्शक अशा क्रमाक्रमाने उंचावत गेला.

पु.लं.ची कथालेखक म्हणून बाळ गजबरांच्या 'गोकुळचा चोर' या चित्रपटापासून सुरुवात झाली. या चित्रपटाची कथा शिवराम वाशीकरांनी लिहिली होती तरी ती कथा गजबरांना संपूर्ण समाधान देऊ शकली नाही. यामुळे वाशीकरांच्या मूळ चित्रकथेत कांही फेरफार करण्यासाठी त्यांनी पु.लं.ना पाचारण केलं व ही कामगिरी त्यांच्याकडे सोपवली. पु.लं.नी केलेले बदल गजबरांना आवडले व ते स्वीकारून चित्रीकरण केले. पुढे चित्रपटाच्या श्रेयफलकात लेखक म्हणून कोणाचे नांव द्यायचे असा प्रश्न उभा राहिला असता गजबरांनी वाशीकर–पु. ल. देशपांडे असे जोडनांव टाकण्याचे ठरवले. पु.लं.च्या नावाला त्यावेळी बराच विरोध झाला याचे कारण त्यावेळी चित्रपट क्षेत्रात पु.लं.च्या नावाभोवती आताचे तेजोवलय नव्हते. याउलट शिवराम वाशीकरांची पटकथा असलेले दोन चित्रपट 'संत तुकाराम' व 'संत ज्ञानेश्वर' अजरामर झाले होते. तेव्हा श्रेयफलकात फक्त वाशीकरांचे नांव टाकण्यात यावे असा आग्रह धरण्यात आला खरा, पण तो गजबरांनी मान्य केला नाही. अखेरीस वाशीकर– पु. ल. देशपांडे हे जोडनांव श्रेय फलकात झळकले.

पु.लं.च्या लेखणीतली चमक गजबरांना दिसली म्हणून की काय त्यांच्या 'नवरा बायको' या दुसऱ्या चित्रपटाचे कथानक लिहिण्याची जबाबदारी त्यांनी पु.लं.च्यावर सोपवली. या चित्रपटाची गीतरचना व संगीत दिग्दर्शनही पु.लं.चे होते. हा चित्रपट तसा फार गाजला नाही. पण पु.लं.चे संगीत मात्र लोकांच्या पसंतीस उतरले. विशेषकरून या चित्रपटातले विष्णुपंत जोगांनी गायलेले 'सखूबाई, साळूबाई बारशाला या ऽ ऽ हे गाणे तर खूप लोकप्रिय झाले.

पु.लं.नी मोठी माणसं, देव पावला, नवरा बायको, मानाचे पान, आपलं घर, दूधभात, देवबाप्पा, माईसाहेब, घरधनी, गुळाचा गणपती या

चित्रपटांना संगीत दिलं. यापैकी 'कौसल्येचा राम बाई', 'नाचरे मोरा आंब्याच्या वनात', 'इथेच टाका तंबू', 'ही कुणी छेडीली तार' अशी अनेक अवीट गोडीची गाणी आजही मनाला भुरळ घालतात. 'दूधभात'मध्ये डॉ. वसंतराव देशपांड्यांनी गायलेला 'तोडी', 'अंमलदार'मधील 'पूरिया' व 'गुळाचा गणपती'मधील 'केदार' ऐकल्यावर पु.लं.नी चित्रपट संगीतात रागदारी संगीताचा यशस्वीपणे उपयोग केला हे दिसून येते.

एका मुलाखतीत पु.लं.ना 'तुम्ही संगीत देताना कोणत्या गोष्टींचा विचार करता? चित्रपट संगीतात शास्त्रीय संगीताचा उपयोग, गाण्यांच्या चाली, टायटल संगीत,' असे अनेक प्रश्न विचारण्यात आले. या साऱ्या प्रश्नांना पु.लं.नी दिलेल्या उत्तरांचा सारांश असा :–

'चित्रपटातील संगीताचे व बैठकीतील संगीताचे हेतू एकदम भिन्न आहेत. चित्रपटात संगीत हे साधन असते तर उलटपक्षी बैठकीत संगीत हे साध्य व साधन असते. चित्रपटांतील संगीत हे त्यांतील पात्रांचा दर्जा आणि प्रसंग यातून निर्माण केलेले असते. शास्त्रीय संगीताचं स्वतंत्र असं स्थान आहे. चित्रपट संगीतात प्रसंगाला योग्य अशा गीतांतून शास्त्रीय संगीताचा उपयोग केल्यास ते लोकांना आवडेल. चित्रपटाचं टायटल संगीत हे चित्रपटातील पुढील सर्व प्रसंगाचा जो गाभा असेल त्याची पूर्वसूचना देणारं असावं.'

'भक्तिगीतांच्या चाली करायला मला विशेष आवडतं. माझ्या गाण्यांच्या चालीमध्ये मी परंपरेने गायल्या जाणाऱ्या स्त्री-गीतांचा खूप उपयोग केला. भोंड्याची गाणी, हादग्याची गाणी, झोपाळ्यावरची गाणी, जात्यावर दळतानाची गाणी, माझ्या संगीत दिग्दर्शनाच्यावेळी माझ्या मदतीला धावून आली आहेत.'

स्वत: पु. ल. उत्तम गायक व उत्कृष्ट पेटीवादक असल्यामुळे प्रसंगाला अनुरूप अशा अवीट गोडीच्या चाली ते सहजगत्या लावीत. गायक व वाद्यवृन्द यांच संचलन करताना या संगीत दिग्दर्शकाच्या हालचाली अत्यंत रेखीव होत असत.

पु.लं.चे आकाशवाणीतील त्यावेळचे एक सहकारी श्री. मोहनराव नगरकर यांना अलिकडेच पाठवलेल्या पत्रात पु.लं.नी लिहिलं.

'मी मनापासून जर कशावर प्रेम केलं असेल तर ते संगीतावर. त्या कलेने मात्र माझ्यावर अनुग्रह केला नाही. फक्त नादाला लावून ठेवले.'

पु.लं.नी चित्रपट क्षेत्रात निरनिराळ्या भूमिका केल्या. 'वंदेमातरम्'मध्ये नायकाची–स्वातंत्र्य सैनिकाची भूमिका केली, तर 'जोहार मायबाप'

अर्थात 'ही वाट पंढरीची' मध्ये चोखामेळ्याचं काम करताना हातात चिपळ्या धरल्या. 'पुढचं पाऊल' मध्ये गळ्यांत ढोलकी होती. पु.लं.नी हा ग्रामीण ढंगातला ढोलकीवाला समर्थपणे उभा केला. 'गुळाचा गणपती' मधील अभिनयातून विनोदी व्यक्तिमत्व साकार केले.

'पुढचं पाऊल' मधील ढोलकीवाल्याची भूमिका समर्थपणे उभी केल्यानंतर पु.लं.ना प्रवासात एका अवघड प्रसंगाला त्यावेळी कसे तोंड द्यावे लागले त्याची ही हकीकत आहे.

पु. ल. टांग्यातून एका गावाला चालले होते. त्यांच्याकडे एक बॅग होती. टोल नाक्यावर त्यांचा टांगा अडवला गेला. जकात कारकुन जाग्यावर नव्हता व कारकुनाचा शिपाई पु.लं.ना जाऊ देईना. पु.लं.नी माझ्या बॅगेत फक्त कपडे व पुस्तके आहेत हे वारंवार सांगून पाहिले पण 'आपण थोडावेळ थांबा, भाऊसाहेब आताच येतील.' असे त्या शिपायाने सांगितले.

जकात चुकवणाऱ्या एखाद्या तंबाखूच्या व्यापाऱ्यासारखे पु. ल. त्याला वाटत होते. त्या कारणाने पु.लं.ना संताप आला होता. तेवढ्यात कारकून महाराज आले. ते आल्यावर शिपाई त्यांना म्हणाला, 'भाऊसाहेब, परवा आपण यांचा शिनेमा पाहिला ते.'

यावर भाऊसाहेब म्हणाले, 'खरंच. माडगूळकर काय आपण? छान काम झालं आहे हो तुमचं.'

'अहो भाऊसाहेब, हे माडगूळकर नव्हेत. हे पूल्देसपांडे! माडगूळकर म्हणजे ते बापाचा पार्ट केल्याले!'

'हो. हो. हे म्हणजे बाईच्या मागे लागलेले? ढोलकी वाजवणारे? वा वा! चष्मा काढून ढोलकी वाजवायला जमलं का हो! छान!'

केवळ भाऊसाहेबांना पु.लं.ना 'दाखवण्यासाठी' पु.लं.चा टांगा त्या शिपायाने अडवला होता.

चित्रपटकथा लेखक म्हणून पु.लं.चे 'देवबाप्पा', 'दूधभात', 'देव पावला' 'गुळाचा गणपती', 'जागा भाड्याने देणे आहे' हे चित्रपट गाजले. 'देवबाप्पा' हा खास मुलांच्यासाठी निर्माण केलेला एक आदर्श चित्रपट. यांतील चंदाराणीचे सहज व सोपे संवाद कौटुंबिक जिव्हाळ्याची जाणीव करून देत. चंदाराणीचे काम मेघा गुप्ते या चुणचुणीत बालनटीने केले होते. देवबाप्पाची गीते ग. दि. माडगूळकरांची होती व दिग्दर्शन राम गबालेंचे.

पु.लं.च्या अफाट लोकप्रियतेचा फायदा घेऊन १९७९ च्या दिवाळीच्या सुमारास पुण्याच्या अलका थिएटरमध्ये 'देवबाप्पा' पुन्हा प्रदर्शित कर-



हे पूल्देसपांडे ! चष्मा काढून ढोलकी वाजवयाला झकास जमलं की !

ण्यात आला. व 'चंदाराणी'चं उत्स्फूर्त स्वागत झालं. 'देवबाप्पा'च्या पुनरागमनामुळं अलका थिएटरचे 'हाऊस फुल'चे भाग्य उजळले. चंदाराणीला पाहाण्यासाठी बाळगोपाळांनी एकच गर्दी केली. मुलांच्यासाठी आदर्श चित्रपट निर्माण करण्यासाठी सरकारने चिल्ड्रेन फिल्म सोसायटीची

स्थापना केली खरी, पण या सोसायटीला प्रचंड खर्च करूनही ' देवबाप्पा ' सारखा मुलांच्या दृष्टीने आदर्श असलेला चित्रपट कधीच निर्माण करता आला नाहीं. पु लं.च्या ' देवबाप्पा'चे हे एक वैशिष्ट्य आहे.

' देवबाप्पा ' पहिल्या प्रथम पुण्याला प्रदर्शित झाला त्यावेळची ही हकीकत आहे. पु. ल. त्यावेळी एस्. पी. कॉलेजच्या पिछाडीला असलेल्या बिल्डींग-मध्ये तिसऱ्या मजल्यावर राहात असत. एक दिवस पु. ल. व राम गबाले एकत्र बसले असताना त्यांना भेटण्यासाठी त्यांच्या ओळखीचे एक गृहस्थ आले व पु.लं.ना म्हणाले, ' मी तुमचा ' देवबाप्पा ' पाहिला, पण त्याची ष्टोरी काय आपल्याला कळली नाही बघा.'

हे ऐकताच पु. ल. उठून गॅलरीकडे गेले व खाली क्रिकेट खेळत असलेल्या एका मुलाला टाळी मारून त्यांनी वर बोलावले. तो मुलगा वर आल्यावर पु.लं.नी त्याला विचारले, 'काय रे बाळ, तू ' देवबाप्पा ' पाहिलास का ?'

' हो. किती छान सिनेमा आहे !'

'पण ' देवबाप्पा ' म्हणजे काय रे ?' पु. ल.

' हात्तिच्या ! एवढंच ना ! तुम्हाला कसं माहीत नाही ? देवबाप्पामध्ये एक चंदाराणी असते. तिचे बाबा लहानपणी वारलेले असतात. ती लहान असल्यामुळे सर्वजण तिला सांगतात तुझे बाबा देवबाप्पाकडे गेले. मग ती एक दिवस खरोखरच देवबाप्पाला पत्र लिहिते.' याप्रमाणे त्या मुलाने थोड-क्यात देवबाप्पाचे कथानक सांगितले. यावर पु.लं.नी त्याला शाबासकी देऊन म्हटलं, ' बाळ, तू कितवीत आहेस ?'

तो म्हणाला, ' तिसरीत.'

नंतर पु. ल. त्या गृहस्थांना शांतपणे म्हणाले, ' या लहान मुलाला तर देवबाप्पाची गोष्ट कळली. तुम्हाला कळायला खरं म्हटलं तर...'

पु.लं.चे हे वाक्य पुरं होण्याच्या आतच ते गृहस्थ तेथून निघून गेले.

' दूधभात ' सुद्धा अशाच प्रकारचा कौटुंबिक जिव्हाळ्याचा चित्रपट. यानेही रौप्यमहोत्सव साजरा केला. ' देवबाप्पा ' व ' दूधभात ' हे दोन्ही चित्रपट करुणरसाने ओतप्रोत भरलेले होते, तर ' देव पावला ' व ' गुळाचा गणपती ' या चित्रपटांत हास्यरसाची चमचमीत मेजवानी होती. ' गुळाचा गणपती ' तर सब कुछ पु. ल. जणू काही एकपात्री प्रयोगच होता. कथा, पटकथा, संवाद, गीते, संगीत, दिग्दर्शन व नायकाची भूमिकासुद्धा पु.लं.ची. हा चित्रपट चांगला गाजला.

चित्रपटात कथानकाचे महत्त्व विषद करताना पुण्याच्या फिल्म अँड टेलिव्हिजन इन्स्टिटयूटच्या दिक्षांत प्रसंगी केलेल्या भाषणात पु.लं.नी

सांगितलं, 'उत्तम चित्रपटांचे यश हे प्रतिभासंपन्न लेखकांनी लिहिलेल्या कथा–कादंबऱ्यांवर आधारलेले असते. न्यू थिएटर्सच्या काळात शरदबाबूंच्या कथा–कादंबऱ्यांवरील चित्रपटांनी व अलिकडच्या काळात सत्यजित रे पासून अगदी नव्या दमाचे डॉ. कारंथ यांच्या कलाकृतींवर आधारलेल्या चित्रपटांनी या विधानाची सत्यता पटवून दिली आहे. आपल्या भारतीय भाषेत अशा अनेक उत्कृष्ट कथा आहेत की, ज्यांच्यावर उत्तम चित्रपट तयार करता येतील. आमच्या मराठीतच मी अशा अनेक कथा सहज सांगू शकेन.'

पु.लं.ची रुपेरी सृष्टीत काम करण्याची एक आगळीच धाटणी होती. कुठलेही काम करताना ते स्वतः आनंद तर घेतच पण इतरांनाही तो देत. खेळीमेळीनं काम करून सहकलाकार तंत्रज्ञांना आपापले रोल, भूमिका समजून देण्यासाठी ते प्रयत्नांची पराकाष्ठा करीत. पु.लं.ना प्रत्येक वाद्याची जाण होती, एवढेच नव्हे तर वादकांच्या विशिष्ट संवयी त्यांना माहीत होत्या. रेकॉर्डींग करतेवेळी ही घडलेली घटना आहे. घाटगे नावाचे उत्कृष्ट कडं वाजवणारे एक गृहस्थ होते. त्यांना एका जागी उभं करण्यात आलं व स्वतंत्र मायक्रोफोनही दिला होता. एका समूह गीताचं रेकॉर्डींग सुरू होतं. घाटगेंच कडं वाजवण्यात काहीतरी चुकत आहे हे पु.लं.च्या ध्यानांत आलं. एकदोन रिहर्सल घेतल्यानंतरही मनासारखं रेकॉर्डींग होईना. यावर पु.लं.नी रेकॉर्डिस्टला काही सूचना केल्या व घाटग्यांना त्यांच्या नेहमीच्या संवयीप्रमाणे कडं वाजवत वाजवत पुढे येण्याची सूचना दिली. घाटगेंनी तसं करून दृष्ट परिणामही साधले व रेकॉर्डींग उत्कृष्ट झालं.

पु.लं.नी आपल्या अष्टपैलू व्यक्तिमत्त्वामुळे चित्रपट सृष्टीतही एक आगळं चैतन्य निर्माण केलं. त्यावेळी पुण्यात नवयुग, डेक्कन, प्रभात अशा तीन स्टुडिओमध्ये चित्रपट निर्मिती होत असे. ग. दि. माडगूळकर, राम गबाले, सुधीर फडके, वसंतराव देशपांडे, राजा परांजपे, राजा ठाकूर, वसंत सबनीस, मधुकर गोळवलकर अशा गुणी कलावंतांच्या सान्निध्यात पु. ल. रमून गेले होते.

मानवी स्वभावातील विविध छटांच सूक्ष्म निरीक्षण व अजोड कल्पकता या त्यांच्या गुणांचा लाभ त्यांना अभिनय–दिग्दर्शनात होई. त्यांची वाङ्मयीन जाण व लालित्य याचा उपयोग त्यांना संवाद लेखनात होई. याखेरीज त्यांचा प्रसन्न विनोद, खेळकरपणा, हजरजबाबीपणा, यामुळे ते सर्वांना हवेहवेसे वाटत.

एकदा पु. ल., राम गबाले व इतर मंडळी नवयुग स्टुडिओमध्ये एका चित्रपटाच्या मुहुर्तासाठी गेले होते. तिथे दोन प्रसिद्ध निर्माते एकमेकांना

कडकडून भेटत आहेत असे एक वेगळंच दृश्य या मंडळींना दिसलं. यावर पु. ल. बोलून गेले. 'झालं. आता एकाचं पाकीट गायब तर दुसऱ्याचं फाऊंटन पेन गेलं.' यावर सर्व मंडळी खदखदून हंसताच त्या दोघा निर्मात्यांनी विचारलं.' काहो, आमच्यावर कांही शेरा मारलात काय ?'

तेव्हा पु.लं.नी खळकरपणाने आपण काय बोललो ते त्यांना सांगूनही टाकले.

पु.लं.चा असाच एक किस्सा श्री. शरद तळवलकरांनी सांगितला आहे. एकदा रात्रीच्या वेळी पु. ल., शरद तळवलकर व इतर मित्रमंडळी लकडी पुलावरून जात होते. पुलाच्या बाजूला असलेल्या स्मशानात एक चिता जळत होती. चितेच्या ज्वालांच्या प्रकाशात जमलेली गर्दी पाहून शरद तळवलकर म्हणाले, 'कुणीतरी मोठा माणूस गेलेला दिसतो आहे. पहा किती लोक जमलेत.'

'अरे वेड्या, कोणी गेलेलं नाही.'– पु. ल.

'पण चितेभोवती गर्दी दिसते आहे ती !'

'लेका, ते धर्माधिकारींचं शुटींग चालू आहे.' पु.लं.च्या या वाक्यावर सर्व मित्रमंडळींची हंसता हंसता पुरेवाट झाली. त्यावेळी 'आल्हाद' या दत्ता धर्माधिकारी यांच्या चित्रपट संस्थेतर्फे निघालेल्या चित्रपटात कोणीतरी मेलेला असायचा व त्याचे सर्व संस्कार, पेटलेली चिता, घरातील त्याच्या जागेवर पणती ठेवलेली सुद्धा चित्रपटात दाखलेली असायची.

असाच एक गंमतीदार प्रसंग श्री. राम गबाले यांनी सांगितला आहे. श्री. गबाले यांच्या 'दूधभात' या चित्रपटाचे चित्रीकरण नवयुग स्टुडिओत सुरू होतं. त्यावेळी मुंबईतील हिंदी चित्रपटाचे एक बडे निर्माते नवयुग स्टुडिओत कांही कामाच्या निमित्ताने आले होते. कामाचा वेग व साधं वातावरण पाहून त्यांनी विचारलं, 'काय हो, अशा या साध्या मराठी चित्रपटांना किती खर्च येतो ? आणि किती वेळात तुम्ही चित्रपट पूर्ण करता ?'

हिंदी निर्मात्याचा हा प्रश्न ऐकून पु. ल. चटकन् उत्तरले, 'अहो, तुमच्या हिंदी चित्रामध्ये लंच टाईम म्हणून जेवढा वेळ जातो तेवढा वेळ आमच्या चित्रणाला लागतो व आपल्या एकंदर लंचवर जेवढा खर्च होतो तेवढ्यात आमचा चित्रपट तयार होतो.'

पु.लं.च्या या उत्स्फूर्त जबाबाला ते निर्माते व अन्य मंडळी मनापासून हंसली.

पु.लं.ची रुपेरी कारकीर्द तशी फार प्रदीर्घ नव्हे. 'वंदेमातरम् ते गुळाचा

गणपती ' या अवघ्या दहा वर्षांच्या काळात पु.ल. या व्यवसायात जसे रमल तसे त्यानंतर कधीच रमले नाहीत. ' गुळाचा गणपती ' या चित्रपटानंतर व्ही. शांताराम यांच्या ' फूल और कलियाँ ' या चित्रपटाची कथा व इतर एकदोन कथा लिहून ते चित्रपट सृष्टीतून बाहेर पडले.

प्रतिभावान लेखकाच्या लेखन स्वातंत्र्यावर जर गदा आली तर ते त्याला कसे बरे रुचेल ? पु.लं.ना अमूक लिहू नका, निर्माता वा हिरॉअिनच्या सोयीच लिहा असं सांगणारे निर्माते व वितरक भेटले. तसेच दिग्दर्शनाच्या क्षेत्रातही अकारण ढवळाढवळ करणाऱ्या निर्मात्यांशी त्यांची गाठ पडली. मन विटण्यासारखे कांही कटू अनुभवही त्यांना आले. कांहीनी चित्रपटाच्या कामाचे मानधनही त्यांना दिले नाही. फार कशाला, पुण्यात ' गुळाचा गण-पती ' प्रकाशित झाला तो चित्रपट पाहाण्यासाठी पु.लं.ना साधे आमंत्रण सुद्धा नव्हते. त्यामुळे स्वतः पु. ल. सुनीताबाई व मं. वि. राजाध्यक्ष यांनी तिकिटे काढून या चित्रपटाचा पहिला खेळ पाहिला.

चित्रपटात आपण का रमलो नाही याची मीमांसा करताना पु. ल. म्हणाले, ' तुम्ही असे करा, तसे करा, अशी इतरांना आज्ञा देण्याइतकं माझं तिथं स्थान नव्हतं. त्यामुळे फार तडे जायला लागले. त्या तडजोडी मला मानवेनात. दिवसाचे चाळीस शॉटस् करा हे माझ्यासारख्याला कसं जमा-यचं हो ? त्या काळात सोळा–सतरा सिनेमांचे करार माझ्या हाती असताना मी हे क्षेत्र सोडून दिलं. मला जे निर्माते भेटले त्यांचे नेमके सत्याशी व सौंद-र्याशी वाकडे होते. एक लेखक किंवा कलावंत म्हणून त्यांना माझ्याकडून काय पाहिजे होते तेच मला कळत नसे. ते मला सांगत पब्लिक डिमांडला उतरेल असं कांहीतरी करा. आणि पब्लिक डिमांड म्हणजे नेमके काय ते मला कधी कळलेच नाही. हळूहळू माझ्या लक्षात आलं की या निर्मात्यांना फक्त त्यांची तिजोरी पैशांनी भरभरून वाहायला हवी होती. आणि त्याकरिता मी काय वाटेल ते करावे अशी त्यांची अपेक्षा होती.

● ●

५

# आपण दाजींना का ट्राय करूं नये ?

'तुझे आहे तुजपाशी' हे पु.लं.चे चौथे नाटक असले तरी 'तुका म्हणे आता' नंतरचे स्वतंत्ररित्या लिहिलेले दुसरे नाटक होय. मुंबई मराठी साहित्य संघ, नाटचशाखेतर्फे हे नाटक रंगभूमीवर आले. पु.लं.च्याकडे या नाटकाचे दिग्दर्शनही होते.

चर्चगेटला पु.लं.च्या एका मित्राकडे या नाटकाचे वाचन झाले. वाचनानंतर सारेजण कमालीचे भारावून गेले. 'काकाजीं'ची महत्वाची भूमिका कोणाला द्यायची याची चर्चा सुरू झाली. चर्चेच्या पहिल्या फेरीत वसंत बापट, दत्तोपंत आंग्रे ही नावे पुढे आली. स्वतः पु. ल. पात्रांच्या निवडीबद्दल फार चोखंदळ. 'काकाजी' ही व्यक्तिरेखा तशी विलक्षण असल्यामुळे पु.लं.च्या या भूमिकेबाबत खूपच अपेक्षा होत्या. ते म्हणाले, 'आपण दाजींना का ट्राय करू नये ? तो खानदानी घराण्यातला आहे. राजस, राजबिंडा व गुबगुबीत आहे. 'काकाजी' म्हणून खचित शोभून दिसेल.'

अशा तऱ्हेने दाजी भाटवडेकरांनी पु.लं.चा काकाजी साकार केला.

या नाटकाचा पहिला प्रयोग होण्यापूर्वी दहाबारा दिवस आधी एक अनपेक्षित अडचण उद्भवली. आचार्यांची भूमिका करणाऱ्या नाना अभ्यंकरांनी काम करण्यास नकार दिला व ते अचानक नाटक सोडून गेले. पहिला प्रयोग तर तोंडावर येऊन ठेपला होता. आचार्यांची भूमिका काकाजींच्या भूमिकेइतकीच महत्त्वाची होती. आता अनुरूप पात्राची निवड करण्यास वेळ तसा थोडा होता. या अनपेक्षित आलेल्या संकटामुळे नाटकात काम करणारे सारेजण चिंताग्रस्त झाले. पण पु. ल. मात्र डगमगले नाहीत. याच नाटकात राजा पटवर्धन भिकू माळ्याची भूमिका करत होते त्यांनाच पु.लं.नी 'आचार्य' केला व यशस्वीही करून दाखवला. भिकू माळ्यात




'आपण दाजीला का ट्राय करूं नये ?'

'आचार्य' हेरून ठेवणाऱ्या या दिग्दर्शकाच्या असामान्य बुद्धीची व गुणांची प्रचीती त्यावेळी साऱ्यांना आली.

थोडक्यात म्हणजे पु.लं.च्या दिग्दर्शनाचे विशेष 'पैलू' या नाटकात दिसून आले. पात्राला भूमिका समजावून देण्याची त्यांची हातोटी प्रशंसनीय होती. भूमिकेच्या बारीकसारीक खाचाखोचा पूर्णपणे पात्राच्या गळी उतरवून त्या त्याच्याकडून योग्य तऱ्हेने वदवून घेणे या साऱ्या गोष्टी ते सहजपणे करीत. रंगभूमीवरील प्रमाणबद्ध हालचाली, संवादातील चढउतार, त्याची फेक, उच्चाराची शुद्धता, ही सारी अभिनयाची अंगे ते प्रत्येकाला नीट समजावून देत.

अशा तऱ्हेने 'तुझे आहे तुजपाशी'च्या विल्सन हायस्कूलमध्ये झालेल्या तालमी अतिशय रंगल्या. पु. ल. गंमतीजमती सांगून त्यात आणखीनच रंगत आणत. त्यामुळे या तालमी कधीच संपू नये असं साऱ्यांना वाटे.

पु. ल. तसे कडक शिस्तीचे दिग्दर्शक होते. ते स्वत: चिंतामणराव कोल्हटकरांच्या तालमीत तयार झाले असल्यामुळे तालमीत जराही ढिलेपणा किंवा बेशिस्त त्यांना खपत नसे. कोल्हटकरांच्या तालमीबद्दल पु.लं.नी एका लेखात लिहिलं आहे. 'आम्ही तालमीला उभे राहिलो म्हणजे आमच्या कंबरा ढिल्या व्हायच्या. पण चिंतामणराव थकत नसत. प्रत्येक शब्दाला, हालचालीला फुलवीत, फुलवीत चाललेल्या तालमींचा तो आनंद प्रयोगापेक्षाही अधिक असे.'

नाट्यक्षेत्रांत पु.लं.ना अधिक आनंद मिळाला तो नाटकांच्या तालमीत नाट्यदर्पणच्या एका अंकात लिहिलेल्या लेखात पु. ल. म्हणतात, 'पहिला प्रयोग हे प्रवासातला शेवटला मुक्काम गाठण्यासारखं असतं. पण मजा असते ती प्रवासात त्या मुक्कामापर्यंतच्या वाटचालीत. एखाद्या वाक्याचा चढउतार, एखादा पॉज, एंट्रीच्या वेळची एखादी हालचाल, एखाद्या पात्राचा अकल्पितपणाने साधलेला अभिनयातला बारकावा, इतकंच नव्हे तर अनपेक्षितपणे उद्भवणाऱ्या अडचणी या साऱ्या उत्सुक क्षणातून पहिल्या प्रयोगाच्या दिशेला हे तालमीचं जहाज प्रवास करीत असत. ह्या तालमीचा ज्याला मजा घेता आली नाही त्याला नाटकात रमण्यात रस नसून नुसतं मिरवण्याची आवड आहे हे ओळखावं. आणि इतकी सगळी धडपड करूनही पहिल्या प्रयोगाच्यावेळी आपल्या स्वप्नातही नसलेल्या ठिकाणी दाद मिळून जाते किंवा अपेक्षित प्रतिक्रियेच्या क्षणी प्रेक्षागार 'ढप्प' होऊन बसते तो अनुभव निराळाच.'

२६ जानेवारी १९५७ रोजी या नाटकाचा पहिला प्रयोग होता. नाटकात भाग घेणारे सारेजण हौशी कलावंत असल्यामुळे या प्रयोगाच्या वेळी

त्यांच्या मनात एक प्रकारची भीती होती. तशीच भीती पहिला प्रयोग असल्यामुळे नाटककाराच्याही मनात होती.

पु.लं.च्या नावामागे आज जे तेजोवलय आहे ते त्यावेळी नव्हते. इतकी जबरदस्त कलाकृती प्रेक्षकांपुढे कशी पेश केली जाते यावरच 'तुझे आहे तुजपाशी'चे यश अवलंबून होते. कलाकारांतील उणीवा, किंवा दोषांचे खापर लेखकावर फोडले जाण्याचा संभव होता. तसेच दिग्दर्शकाची पात्रांची निवड अचूक होती किंवा कशी याची ती एक प्रकारे कसोटीच होती. यामुळे कलाकारांवर मोठी जबाबदारी होती.

पहिल्याच प्रयोगाने प्रेक्षकांच्या मनाची विलक्षण पकड घेतली. दाजी भाटवडेकरांची 'काकाजी'ची भूमिका तर अतिशय गाजली. ही भूमिका त्यांना सर्व दृष्टीने लौकिकाला चढवणारी ठरली. काकाजींच्या भूमिकेला शोभणारे शरीर सौष्ठव, पल्लेदार आवाज व मुरलेल्या नटाचा अभिनय हे सारे पैलू त्यांच्यात दिसून आले. प्रत्येक कलाकाराने प्रयत्नांची पराकाष्ठा केली व तन्मयतेने भूमिका करून नाटकाची रंगत वाढवली.

नाटक यशस्वी होण्यास अनेक महत्वाच्या कारणांबरोबर मुख्य भूमिकेसाठी अनुरूप व्यक्ति मिळणे हे सुद्धां एक कारण आहे. अशी निवड करणे ही दिग्दर्शकाची जबाबदारी होय. दाजी भाटवडेकर काकाजींच्या भूमिकेला अनुरूप असेच होते व त्यांनी आपली निवड सार्थ करून दाखवली.

या नाटकाच्या यशाला तोड नाही. पु.लं.च्या जीवनांतले सर्व अपयश या नाटकाने धुवून टाकले. एक स्वतंत्र नाटककार व कुशल दिग्दर्शक म्हणून पु.लं.ची प्रतिमा कमालीची उजळली. त्यांनी केलेली पात्रांची निवड अचूक ठरली व त्या साऱ्यांना यशस्वी कलाकार घडवण्यात ते विजयी झाले. एका रात्रीत विजया मेहता, अरविंद देशपांडे, दाजी भाटवडेकर, अनंत वर्तक, राजा पटवर्धन हे सारे हौशी कलावंत प्रसिद्धीच्या झोतात आले.

दाजी भाटवडेकरांनी आपल्या 'काकाजी'च्या अविस्मरणीय भूमिकेबद्दल 'चित्रानंद' या साप्ताहिकाला दिलेल्या मुलाखतीत सांगितलं, 'पु.लं.नी काकाजींची भूमिका देऊन नाट्यक्षेत्रांत माझी व्यक्तिरेखा घडवली. काकाजी (तुझे आहे तुजपाशी) ढेरे साहेब (अंमलदार) आणि महाराज (सुंदर मी होणार) हे पु.लं.चे तीन मानसपुत्र साकार करण्याची मला मौलिक संधी मिळाली हे मी माझे सद्‌भाग्य समजतो. पृथ्वीतलावर जेव्हा पु.लं.च्या नाटकाचा विषय निघेल तेव्हा 'दाजी भाटवडेकर' हे नांव देखील उजळून निघेल.'




'अंमलदार' या नाटकामुळे पु.लं.ची कीर्तिमंदिराची वाट खुली झाली 'तुझे आहे तुजपाशी' या नाटकामुळे पु. ल. कीर्तिमंदिराच्या पायऱ्या भराभर चढून गेले. २६–१–५७ या शुभदिवशी विजयी नाटककाराचा चमचमणारा डौलदार तुरा पु.लं.च्या शिरोमंदिलात खोचला गेला.

पु.लं.नी एका लेखात म्हटले आहे 'माझ्या आयुष्यातल्या एका योगाचे

मला नेहमी कौतुक वाटते. मला या कलेच्या क्षेत्रात उमेदवाराच्या भूमिकेत फार काळ कधी राहावे लागले नाही.' एक श्रेष्ठ नाटककार म्हणून पु.लं.नी तसे फार लवकर यश मिळवले.

आचार्य अत्रे म्हणाले, 'तुझे आहे तुजपाशी' या एकाच नाटकाने पु.लं.नी श्रेष्ठ मराठी नाटककारात स्थान प्राप्त केलं आहे.'

नाटकाच्या सुरवातीलाच काकाजी व त्यांचा पुतण्या शाम बुद्धिबळे खेळत असतात असं दृश्य दिसतं. त्यावेळी रेडिओ सुरू असून कुणीतरी भसाडच्या आवाजात ठुमरी गाण्याचा प्रयत्न करीत असतो. काकाजी रेडिओतल्या गाण्याला कंटाळून तो बंद करण्यास सांगतात खरे, पण त्यांचे कुणी ऐकत नाही. त्यानंतर भिकूमाळी, वासुअण्णा व जगन्नाथ ही पात्रे रंगमंचावर येतात पण प्रत्येकजण दुसऱ्यावर रेडिओ बंद करण्याची कामगिरी सोपवतो. रेडिओ बंद न झाल्यामुळे शाम व काकाजी पुन्हा वैतागतात व प्रेक्षकातही हंशा पिकतो. अशा तऱ्हेने नाटक सुरवातीलाच प्रेक्षकांच्या मनाची पकड घेते.

ही नाटकातली भसाडच्या आवाजातली ठुमरी पु.लं.नी स्वत: रेकॉर्ड केली होती. त्यावेळी आजच्यासारखे स्टुडिओ उपलब्ध नव्हते. तेव्हा साहित्य संघाच्या मागच्या बाजूला रात्री साडेबारानंतर पु.लं.नी 'ऐसी ना मारो पिचकारी' ही मुद्दाम वेडीवाकडी गायलेली ठुमरी रेकॉर्ड केली.

अगदी सुरवातीच्या संवादापासूनच पु.लं.च्या लेखणीचा प्रत्यय प्रेक्षकांना येतो. या नाटकात विनोदी संवाद, शाब्दिक कोटयांची लयलूट असून प्रेक्षकांची हंसता हंसता पुरेवाट होते. वासुअण्णांची म्हशीच्या तुपाची हकीकत, काकाजींचे जंगलातील शिकारीचे व मैफलीतील किस्से, तसेच शामचे गीतावाचन, भिकूमाळी व वासुअण्णा इ. नोकर मंडळींचे भांग प्राशन, असे अनेक गंमतीदार प्रसंग पु.लं.नी रंगवले आहेत. नाटकाची एकंदर उभारणी, त्यांतील पात्रे आणि प्रसंग असे आकर्षक आणि बहारदार आहेत की ते मनाची पकड घेतात.

अपेक्षाभंगामुळे कसा विनोद निर्माण होतो याचे एक उत्कृष्ट उदाहरण या नाटकात आहे. तिसऱ्या अंकात काकाजी जेव्हा म्हणतात, 'आम्ही देखील एक नवं पाप केलं.'

या रंगेल काकाजीनं कसलं पाप केलं यावर प्रेक्षकात कुतूहल निर्माण होते न तोच काकाजी लगेच सांगून टाकतात, 'शामभय्या, मोठं मस्त पाप केलं. बरं का गीता, काल तुझी टकळी घेऊन हळूच सूत काढून पाहिलं.' काकाजींच्या या वाक्यावर प्रेक्षक मनमुराद हंसतात.

पु.लं.नी रेखाटलेलं अतिविशाल महिला मंडळ हे आजच्या वरिष्ठ पांढर-




'अंमलदार' या नाटकामुळे पु.लं.ची कीर्तिमंदिराची वाट खुली झाली 'तुझे आहे तुजपाशी' या नाटकामुळे पु. ल. कीर्तिमंदिराच्या पायऱ्या भराभर चढून गेले. २६-१-५७ या शुभदिवशी विजयी नाटककाराचा चमचमणारा डौलदार तुरा पु.लं.च्या शिरोमंदिलात खोचला गेला.

पु.लं.नी एका लेखात म्हटले आहे 'माझ्या आयुष्यातल्या एका योगाचे

मला नेहमी कौतुक वाटते. मला या कलेच्या क्षेत्रात उमेदवाराच्या भूमिकेत फार काळ कधी राहावे लागले नाही.' एक श्रेष्ठ नाटककार म्हणून पु.लं.नी तसे फार लवकर यश मिळवले.

आचार्य अत्रे म्हणाले, 'तुझे आहे तुजपाशी' या एकाच नाटकाने पु.लं.नी श्रेष्ठ मराठी नाटककारात स्थान प्राप्त केलं आहे.'

नाटकाच्या सुरवातीलाच काकाजी व त्यांचा पुतण्या शाम बुद्धिबळे खेळत असतात असं दृश्य दिसतं. त्यावेळी रेडिओ सुरू असून कुणीतरी भसाडच्या आवाजात ठुमरी गाण्याचा प्रयत्न करीत असतो. काकाजी रेडिओतल्या गाण्याला कंटाळून तो बंद करण्यास सांगतात खरे, पण त्यांचे कुणी ऐकत नाही. त्यानंतर भिकूमाळी, वासुअण्णा व जगन्नाथ ही पात्रे रंगमंचावर येतात पण प्रत्येकजण दुसऱ्यावर रेडिओ बंद करण्याची कामगिरी सोपवतो. रेडिओ बंद न झाल्यामुळे शाम व काकाजी पुन्हा वैतागतात व प्रेक्षकातही हंशा पिकतो. अशा तऱ्हेने नाटक सुरवातीलाच प्रेक्षकांच्या मनाची पकड घेते.

ही नाटकातली भसाडच्या आवाजातली ठुमरी पु.लं.नी स्वत: रेकॉर्ड केली होती. त्यावेळी आजच्यासारखे स्टुडिओ उपलब्ध नव्हते. तेव्हा साहित्य संघाच्या मागच्या बाजूला रात्री साडेबारानंतर पु.लं.नी 'ऐसी ना मारो पिचकारी' ही मुद्दाम वेडीवाकडी गायलेली ठुमरी रेकॉर्ड केली.

अगदी सुरवातीच्या संवादापासूनच पु.लं.च्या लेखणीचा प्रत्यय प्रेक्षकांना येतो. या नाटकात विनोदी संवाद, शाब्दिक कोटयांची लयलूट असून प्रेक्षकांची हंसता हंसता पुरेवाट होते. वासुअण्णांची म्हशीच्या तुपाची हकीकत, काकाजींचे जंगलातील शिकारीचे व मैफलीतील किस्से, तसेच शामचे गीतावाचन, भिकूमाळी व वासुअण्णा इ. नोकर मंडळींचे भांग प्राशन, असे अनेक गंमतीदार प्रसंग पु.लं.नी रंगवले आहेत. नाटकाची एकंदर उभारणी, त्यांतील पात्रे आणि प्रसंग असे आकर्षक आणि बहारदार आहेत की ते मनाची पकड घेतात.

अपेक्षाभंगामुळे कसा विनोद निर्माण होतो याचे एक उत्कृष्ट उदाहरण या नाटकात आहे. तिसऱ्या अंकात काकाजी जेव्हा म्हणतात, 'आम्ही देखील एक नवं पाप केलं.'

या रंगेल काकाजीनं कसलं पाप केलं यावर प्रेक्षकात कुतूहल निर्माण होते न तोच काकाजी लगेच सांगून टाकतात, 'शामभय्या, मोठं मस्त पाप केलं. बरं का गीता, काल तुझी टकळी घेऊन हळूच सूत काढून पाहिलं.' काकाजींच्या या वाक्यावर प्रेक्षक मनमुराद हंसतात.

पु.लं.नी रेखाटलेलं अतिविशाल महिला मंडळ हे आजच्या वरिष्ठ पांढर-




पेशांच्या दिखाऊ जीवनातील गंमतीदार दर्शन प्रेक्षकांना घडवत. दिवाण-खान्यात सजावटीसाठी ठेवण्यात आलेला ग्रीक पद्धतीचा नग्न पुतळा, शिकार, संगीत, हुक्का यासारखे षोक. या पार्श्वभूमीवर लेखकाने काकाजींची व्यक्ति रेखा रंगवली आहे. दुसरी एक प्रमुख व्यक्ति या नाटकात आहे–ती म्हणज आचार्य. नाटककाराने आचार्यांची व्यक्तिरेखा कर्मठ व गांधीवादाची कास धरणारी अशी दाखवली आहे. काकाजी सुखोपभोगात रममाण झालेले तर आचार्य हे सुखोपभोगाकडे पाठ फिरवणारे– अशा या दोन परस्पर विरोधी व्यक्तिमत्वातील संघर्ष प्रस्तुत नाटकात मनोवेधकपणे चित्रीत केला गेला आहे. नाटकाच्या शेवटी आचार्य जेव्हां आपले मनोगत व्यक्त करतात तेव्हा त्यांच्याबद्दल प्रेक्षकांच्या मनात करुणा निर्माण होते.

काकाजींच्या कुटुंबातील शाम व उषा, उषाचा प्रियकर डॉ. सतीश आचार्यांची मानलेली मुलगी 'गीता' ही पात्रे तरुण पिढीचे प्रतिनिधीत्व करतात. उषा व सतीश यांच्यामधील गतजीवनातील आठवणींना उजाळा देणाऱ्या संवादातून सुंदर काव्याचा व त्याचबरोबर नर्मविनोदाचाही शिडकावा होतो. काकाजींची 'इन्दौरी' भाषाशैली व शब्दोच्चार स्वत: पु.लं.नीच दाजींना पढवले. दाजींनी खूप मेहनत घेऊन झोकांत उभा केलेला काकाजी प्रेक्षकांचा कंठमणी होऊन बसला आहे.

सखोल व अचूक स्वभाव चित्रण, सुंदर काव्यात्मता, अत्यंत जळजळीत असा सामाजिक व राजकीय उपहास हे सारं या नाटकात आपणाला आढळते. तसेच ओतप्रोत प्रसन्नता हा या नाटकाचा गुणविशेष.

इतके सर्वगुणसंपन्न नाटक मराठी रंगभूमीवर दीर्घकाल आले नव्हते. या नाटकाची मराठीतील सर्वोत्तम नाटक म्हणून गणना झाली. श्रेष्ठ नाटकाचा सन्मान जसा रंगमंचावर होतो तसा तो ग्रंथालयातही होतो. 'तुझे आहे तुजपाशी' या नाटकाला उच्च वाङ्मयीन मूल्ये तर प्राप्त झाली आहेत, एवढंच नव्हे तर रंगमंचावरील त्याचा आविष्कारही प्रभावशाली झाला आहे. विद्यापीठाच्या अभ्यासक्रमात या नाटकाचा समावेश झाला आहे.

कधीकधी नाटकात पदरची वाक्ये घालण्याचा मोह नट-नटींना होतो. विनोदी संवादात तर हा मोह टाळणे अवघड होऊन बसतं. यासाठी पु.लं.नी या पुस्तकाच्या प्रस्तावनेत नटनटींनी पदरची वाक्ये घालण्याचा मोह टाळला पाहिजे अशी सूचना केली आहे.

विनोदी संवादात नटाला पदरची वाक्ये घालून हास्यरस पिकवण्याची खमखुमी येते खरी, पण अशामुळे नाटककाराला कमीपणा येतो. असाच एक प्रसंग श्री. चिंतामणराव कोल्हटकरांनी आपल्या 'बहुरुपी' या आत्मवृत्तात रेखाटला आहे. ही १९२१ सालातील घटना आहे. बलवंत संगीत मंडळींचे संगीत 'एकच प्याला'चे प्रयोग नागपूरला सुरू होते. त्यावेळचे नागपूरमधील प्रेक्षक तसे खटयाळ, केव्हा कुठल्या वेळी नटाची हुर्यो उडवतील, हे सांगता येत नसे. 'एकच प्याला'तील तळीरामाच्या मृत्यूच्या प्रवेशात नागपूरकरांच्या खोडकरपणाचा अनुभव आला. दिनकरराव ढेरे या प्रवेशात वैद्याची भूमिका करत. नाटक चालू असताना प्रेक्षकांतून एक अंडे रंगमंचावर येऊन पडले. ते पाहून त्या नटाने 'हे रोग्याला दिले तर चालेल. हा खुराक शक्तिवर्धक आहे' असे पदरचे वाक्य टाकून हंशा पिकवला. हा प्रवेश संपल्यावर इतर् सर्व मंडळींनी हजरजबाबीपणाबद्दल त्या नटाची पाठ थोपटली. पण चिंतामणराव कोल्हटकरांना हा झालेला प्रकार मुळीच आव-

डला नाही. ते म्हणाले, 'प्रेक्षकांच्या अशा कुचेष्टेला प्रोत्साहन देणे बरे नव्हे. आपण गडकऱ्यांसारख्या प्रतिभावान नाटककारांची नाटके करतो. ओसंडून जाणारा विनोद त्यांनी लिहून ठेवला असता अशा कुचाळक्यांनी त्याला कमीपणा येतो.'

'तुझे आहे तुजपाशी' या नाटकाची जाहिरात अजरामर विनोदी नाटक म्हणून केली जाते व प्रेक्षकांनी सुद्धा ते विनोदी म्हणूनच स्वीकारले आहे. पु. ल. फक्त विनोदी लेखक आहेत, असा जो लोकांचा समज आहे तो बराचसा एकांगी आहे. जो लेखक विनोदकार म्हणून प्रसिद्ध आहे, त्याचे बोलणे किंवा लिहिणे विनोदीच असले पाहिजे अशी लोकांची अपेक्षा असते. स्वतः पु. ल. जेवढे मोठे विनोदकार आहेत तेवढेच ते चिंतक, विचारवंत व समाजसुधारणेची आच असलेले मोठे लेखक आहेत. त्यामुळे प्रस्तुत नाटकात गंभीर व चिंतनीय संवादही आपणाला आढळतात. असे कांही निवडक संवाद येथे दिले आहेत.

शेवटच्या अंकात उषा आचार्यांना गीताच्या–स्त्रीच्या अंतःकरणाच्या भावना बोलून दाखवते:–

'ती शेवटी स्त्री आहे. तिला कधी स्वतःच घरकुल असावसं वाटेल, मूल असावसं वाटेल, आपल्या पोराच्या भुरभुणाऱ्या जावळाचा मुका घ्यावासा वाटेल, याचा काही विचार शिवला होता तुमच्या मनाला ?'

सतीश आचार्यांना उद्देशून म्हणतो, 'माणुसकी टिकविण्यासाठी जर सगळा अट्टाहास तर मानववंशाच्या वृद्धीसाठी स्त्री-पुरुष एकत्र आले की पाप पाप म्हणून ओरडायचं ढोंग कशाला ?'

शंभर टक्के विनोदी असलेले नाटक जरी लोकप्रिय झाले तरी ते अव्याहतपणे प्रदीर्घ काल चालू शकत नाही. 'तुझे आहे तुजपाशी' हे जरी विनोदी नाटक म्हणून मानले जात असले तरी नाटककाराने या नाटकात गंभीर प्रवृत्तीचेही दर्शन घडवल्यामुळे ते प्रेक्षकांच्या मनाची पकड घेते.

या नाटकाच्या पुस्तकाची पहिली आवृत्ती जानेवारी १९५७ मध्ये प्रसिद्ध झाल्यावर, सप्टेंबर १९७७ मध्ये अकराव्या आवृत्तीचा योग आला, या वरून या नाटकाच्या अफाट लोकप्रियतेची कल्पना येईल. आतापर्यंत या पुस्तकाच्या वीस हजाराच्यावर प्रती संपल्या असून मराठी प्रकाशन क्षेत्रातील हा खपाचा उच्चांक समजला जातो. प्रस्तुत नाटकाचे 'कस्तुरी मृग' या नावाने हिंदीत भाषांतरही प्रकाशित झाले असून हिंदी रंगमंचावर त्याचे कांही प्रयोगही झाले आहेत.

या नाटकाचा सुवर्ण महोत्सवी प्रयोग २६ जानेवारी १९५९ रोजी महा-

पौर मिरजकर यांच्या अध्यक्षतेखाली झाला. या प्रयोगाच्या वेळी नाटकात काम करणाऱ्या नटनटींना सुवर्णमुद्रा स्मृती चिन्ह म्हणून भेट देण्यात आली. या नाटकाने मुंबई मराठी साहित्य संघाला यश व कीर्तीच्या जोडीला भरपूर अर्थलाभही करून दिला.

'तुझे आहे तुजपाशी' या नाटकानंतर लगेच 'सुंदर मी होणार' हे पु.लं.चे नवीन नाटक मुंबई मराठी साहित्य संघातर्फे रंगभूमीवर आले. या नाटकाचा प्रयोग 'तुझे आहे तुजपाशी' या नाटकाच्या प्रयोगाप्रमाणेच फार देखणा होत असे.

आंग्ल कवीयत्री एलिझाबेथ बॅरेट व कवि रॉबर्ट ब्राऊनिंग यांच्या प्रणय जीवनावर रूडॉल्फ बेसियर याने 'द बॅरेटस् ऑफ विम्पोल स्ट्रीट' हे नाटक लिहिले. या नाटकाचे मराठी रुपांतर पु.लं.नी 'सुंदर मी होणार' या नावाने केलं. तसेच रुपांतर करताना 'इम्मॉर्टल लव्ह' ह्या ब्राऊनिंग पतिपत्नींच्या चरित्राचा व व्हर्जीनिया वूल्फकृत 'फ्लश्' या पुस्तकाचाही आधार पु.लं.नी घेतला.

मूळ नाटकाचा नायक महाकवी रॉबर्ट ब्राऊनिंग आहे आणि नायिका विवाहपूर्ण प्रियाराधन काळातील कवियत्री मिस् एलिझाबेथ बॅरेट. ब्राऊनिंग पति-पत्नीच्या विवाह कथेत एक विलक्षण नाट्य आहे. मूळ नाटक हे चरित्रात्मक स्वरूपाचे असल्यामुळे त्याचे रुपांतर करणे ही अवघड कामगिरी होती. मूळ नाटकात रॉबर्ट ब्राऊनिंग व त्याची प्रेयसी कवियत्री एलिझाबेथ ही दोघे प्रत्यक्ष जीवनात कवी होते, त्यामुळे प्रेक्षकांना ते दोघेही परिचीत होते. उलटपक्षी, रुपांतरामधील कवी संजय व त्याची प्रेयसी दिदी ही काल्पनिक पात्रे नाटककाराला रेखाटावी लागली. 'संजय' हा कवी आहे हे दाखविण्यासाठी पु.लं.नी त्याच्या तोंडी बरेच काव्यात्मक संवाद टाकले आहेत.

महाराज व संजय या दोघांच्या संघर्षातून पु.लं.ची समाजवादी मूल्ये प्रेक्षकांच्या पुढे येतात. तसेच पु.लं.ची संवेदनाक्षम वृत्ती या नाटकातील वयोवृद्ध डॉक्टर पटवर्धनांच्या रेखाटलेल्या व्यक्तिचित्रणातून दिसून येते. बालपणी मातृसुखाला वंचित झालेल्या राजेंद्र, बेबी, या भावंडांना डॉक्टर पटवर्धन आपल्या जीवनातील एक नाजुक पण करूण घटना सांगतात. हा प्रसंग हृदय हेलावून सोडणारा असून रंगमंचावर तो हृद्य परिणाम करतो. पु. ल. हे फक्त विनोदी लेखक नसून करूण रसाने ओतप्रोत भरलेले लिखाणही ते प्रभावीपणे करू शकतात हे यावरून दिसून येते.

या नाटकात महाराजांचा शरीररक्षक मेजर सुभानराव यांना 'यस् युवर हायनेस', 'काय युवर हायनेस' या शब्दांच्या पलीकडे एकही वाक्य बोलावे

लागत नाही. तरीपण या नाटकाच्या रंगीत तालमीत आदल्या दिवसापर्यंत पु.लं.सारख्या कल्पक दिग्दर्शकाने सुभानरावाच्या भूमिकेसाठी कुणाचीही निवड करू नये याबद्दल साऱ्यांना आश्चर्य वाटत होते. अगदी आयत्यावेळी पु.लं.नी साहित्य संघाचे एक तळमळीचे कार्यकर्ते श्री. गंगाधरपंत जोशी यांना बोलावून सांगितले, ' जोशीबुवा, तुम्ही उद्या ' सुभानराव ' म्हणून उभे राहायचे. मी तुमची निवड पहिल्या दिवसापासून मनात पक्की केली होती. तुम्ही पहिल्यापासून तालमी पाहात आला आहात, तेव्हा मला काय हवं, नको, ते तुम्हाला माहीत आहेच.'

पु.लं.च्या या निवडीमुळे गंगाधरपंताना आनंद झाला व आपली निवड योग्य होती हे त्यांनी प्रयोगात सिद्ध केलं.

● ●

६

# एकपात्री (बहुरूपी) प्रयोग

'एकपात्री प्रयोग' ही पु.लं.ची मराठी रंगभूमीला खरी देणगी आहे. मराठी रंगमंचावर पु.लं.नी एक नवे पर्व सुरू केले ते एका अभिनव नाटच-प्रकाराने. खास रंगमंचाला शोभेल असा एक आगळा बहुरूपी कार्यक्रम त्यांनी जन्माला घातला. 'एकपात्री' हा शब्दप्रयोग पु.लं.ना आवडत नाही. त्याला ते 'बहुरूपी' म्हणतात.

या प्रयोगाची सुरुवात त्यांनी बालपणापासूनच केली. नरसोबाच्या वाडीला पु.लं.ची सकाळी मुंज झाली. भटजींनी मुंज कशी केली याचा पु.लं.नी लागलीच संध्याकाळी 'वन मॅन शो' केला. तो पाहताना त्या भटजींची सुद्धा हंसता हंसता पुरेवाट झाली.



पु.लं.नी आपल्या बहुरूपी प्रयोगांनी मराठी समाजाला खदखदून हंसायला लावले. त्यांच्या लेखनांतील विनोद या कार्यक्रमांनीच अधिकाधिक लोकांपर्यंत पोचवला व त्यांना जनमानसात अढळ स्थान प्राप्त झाले. केवळ साहित्यरूप शब्द आणि नक्कलवजा अभिनय यांच्या जोरावर पु.लं.नी ही किमया केली. त्यांच्याएवढे प्रचंड यश अद्याप कोणालाही मिळाले नाही.

पु. ल. दिल्लीला असताना त्यांनी 'कृष्णाकाठी कुंडल' नावाचा एक अभिनव कार्यक्रम 'सप्रू हाऊस'मध्ये सादर केला. दिल्लीत अनेक मराठी कुटुंबे स्थायिक झालेली आहेत. मराठी माणूस नाटकवेडा असल्यामुळे या नाटकवेड्या व गुणी मंडळींना एकत्र करून पु.लं.नी हा कार्यक्रम सादर केला. अस्तंगत होत जाणाऱ्या एका अत्यंत जिव्हाळ्याच्या विषयाचे, मावळत्या मराठी संस्कृतीचे ते संगीतमय दर्शन होतं.

या कार्यक्रमाची सुरुवात पु.लं.च्या निवेदनाने झाली. त्याचा थोडक्यात आशय असा होता : 'प्रत्येकाच्या भावविश्वात आठवणींच्या कृष्णाकाठी बालपणातलं एक कुंडल वसत असतं. पोटासाठी भटकत जरी माणूस दूरदेशी येऊन पडला तरी एखाद्या हळव्या क्षणी त्याच्या मनात ते कुंडल रुंजी घालतं. विसरून चाललेल्या शब्दसुरांच्या पंखावरून आज आपण त्या गतकाळात मागे जायचंय.'

या कार्यक्रमात भूपाळी, काकडारती, आरती, स्तोत्र, मनाचे श्लोक, भेंड्या, हदगे, पोवाडे, लावणी, कीर्तन असे सारे प्रकार असल्यामुळे प्रयोग अतिशय रंगला. तसेच अण्णासाहेब किर्लोस्करांच्या 'शाकुंतला'तील नांदी नंतर बहारदार नाट्य संगीतही झाले.

शेवटी पु.लं.नी 'मंगलदेशा पवित्र देशा महाराष्ट्र देशा' हे गीत म्हटलं. याबाबत सुप्रसिद्ध नट श्री. श्रीकांत मोघे 'चित्रानंद'मध्ये लिहिलेल्या एका लेखात म्हणतात, 'आम्ही या प्रयोगात काम करणारे ३०-४० कलावंत त्यांना साथ द्यायला उभे राहिलो तेव्हा दिल्लीच्या सप्रू हाऊसमधील सारी माणसं राष्ट्रगीतासाठी उठावे तशी मंत्रमुग्ध होऊन उभी राहिली. मध्यमवयीन माणसे भारावली, जुन्या पिढीतली तर पार गदगदली.'

या कार्यक्रमांत माणसं कमी हसली, पण गतकालच्या आठवणींनी मनोमन मोहरली. माणसांच्या काळजालाच नेमका हात घालण्याचे सामर्थ्य पु. लं. शिवाय दुसऱ्या कुठल्याही विनोदी लेखकात नाही यात संदेह नाही.

**गडकरी दर्शन:-**

पु.लं.च्या दिल्लीतील वास्तव्यामुळे तेथील साहित्यप्रेमी जनाना साहित्याच्या अक्षरशः मेजवान्या मिळत. पु.लं.च्याकडे नेहमी कलाप्रेमी मंडळींची

ये-जा असे. एकदा चिंतामणराव कोल्हटकर दिल्लीला आले होते त्यावेळी पु.लं.नी त्यांचा ‘राजसंन्यास’ या नाटकाच्या वाचनाचा कार्यक्रम घडवून आणला होता. स्वत: पु.लं.नी ‘तुका म्हणे आता’ या नाटकाचे वाचन श्री. प्रभाकर पाध्ये यांच्या घरी केले होते.

पु. ल. त्यावेळी दूरदर्शनवर होते. दिल्लीच्या पार्लमेंट स्ट्रीटवरील आकाशवाणी भवनात ‘दूरदर्शन’ केंद्र अगदी नव्याने सुरू झाले होते. त्याच आकाशवाणी भवनात कुसुमावती देशपांडे व श्री. माधव गडकरीही होते. दुपारच्या वेळेस आकाशवाणीच्या कॅन्टीनमध्ये पु. ल., माधव गडकरी व इतर मंडळी जमत. पु. ल. नव्यानेच सुरू झालेल्या ‘दूरदर्शनच्या’ गंमती-जमती सांगत. एक दिवस कॅन्टिनमध्ये राम गणेश गडकरी यांचा विषय निघाला. ‘गडकरी’ तर पु.लं.चा एक आवडता विषय. तेव्हां त्यांच्या मुखातून रसवंती ओसंडू लागली. अशा या गप्पातूनच ‘गडकरी दर्शन’ या कार्यक्रमाचा जन्म झाला.

दिल्लीच्या सप्रू हाऊसमध्ये २३ जानेवारी १९६० रोजी हा प्रयोग प्रथम सादर झाला. या प्रयोगाची सर्व व्यवस्था श्री. माधव गडकरी यांच्याकडे होती. राम गणेश गडकरी यांचे २३-१-१९१९ रोजी सावनेर येथे निधन झाले. भारताच्या राजधानीत त्यांचा स्मृतिदिन पाळला जाण्याचा हा पहिलाच प्रसंग होता. या दिनानिमित्त पु.लं.नी ‘गडकरी दर्शन’ हा एक आगळा, हृदयस्पर्शी व चैतन्यपूर्ण कार्यक्रम सादर केला. या नाट्यपूर्ण कार्यक्रमात पु.लं.नी गडकऱ्यांचे असामान्य प्रतिभाशाली वाङ्मयाचे विविध पैलू प्रेक्षकांपुढे उभे केले.

या कार्यक्रमात पु.लं.ना सुनीताबाईंचे मोलाचे साहाय्य झाले. तसेच सौ. शालिनी पाटील यांचाही या कार्यक्रमात सहभाग होता.

या तिघांनी मिळून सुरुवातीला एक निवेदन केले ते अत्यंत हृदयस्पर्शी आहे. ते थोडक्यात असे, ‘गडकऱ्यांच्या शब्दांनी सिद्धि प्राप्त केली आहे. आमचे काम हे सिद्ध शब्द आपणापुढे सादर करण्याचे आहे. भांडार धन्याचे आहे. आमची भूमिका भारवाही हमालांची आहे. गडकऱ्यांच्या नाटकातल्या भूमिका मराठी रंगभूमीवरच्या तेजस्वी नटांनी कळसाला नेऊन ठेवल्या आहेत. त्यांचे काव्य ‘बी’, ‘बालकवि’ यांच्यासारख्यांनी ओठी खेळविले आहे. त्यांच्या विनोदाला मराठी विनोदाचे आद्याचार्य श्रीपाद कृष्ण यांच्या-सारख्यांनी हसून साथ दिली आहे. या साऱ्या गोष्टींची जाण आमच्या मनांत आहे. घास घेऊ इच्छिणारी तोंडे लहान आहेत याचे विस्मरण नाही. परंतु अंत:करणे सश्रद्ध आहेत म्हणून प्रमादांची क्षमा असावी.’

हे निवेदन चालू असताना रंगमंचावरील काळ्याभोर पडद्यावर काळ्या

रेघांनी वेढलेले राम गणेश गडकरी यांचे ठसठशीतपणे काढलेले रेखाचित्र टांगण्यात आलेले होतें व त्यावर प्रकाशाचा झोत टाकण्यात आला होता. गडकऱ्यांच्या प्रतिमेचे हे दर्शन घडवण्याची कल्पकता पु.लं.ची होती.

'यावज्जीवही मी न काय कळले आम्हा प्रती नीटसे.' या गडकऱ्यांच्या आत्मवृत्तपर काव्याने पु.लं.नी गडकऱ्यांची प्रतिमा प्रेक्षकांसमोर उभी केली. नंतर पु. ल. व सुनीताबाईंनी महाराष्ट्राच्या अभिमानाने ओतप्रोत भरलेले महाराष्ट्र गीत गायले. या गीताने प्रेक्षक रोमांचित झाले. महाराष्ट्र गीतानंतर गडकऱ्यांच्या निवडक कविता त्या दोघांनी म्हटल्या. यानंतर हृदयस्पर्शी, विनोदी व कारुण्यमय असे नाटयप्रसंग रंगभूमीवर सादर करण्यात आले.

विनोदी प्रसंगात पु. ल. हे प्रकर्षाने चमकले. इंदु-बिंदु आणि कामण्णा यांच्यामधील विनोदपूर्ण प्रसंग, प्रोफेसर कोटिबुद्धे व वेडयाच्या बाजारातील बाळाभाऊ या साऱ्या भूमिका पाहताना प्रेक्षागृह खळखळून हंसत होते. तसेच पुण्यप्रभावातील 'वृंदावन' एकच प्यालातील 'सुधाकर' व राजसंन्यासातील 'रायाजी' या तीन विभिन्न गंभीर भूमिका त्यांनी तितक्याच प्रभावीपणे पार पाडल्या.

सुनीताबाई आपल्या उत्कट अभिनयाने या प्रयोगात अधिक रंगत आणीत. पुण्यप्रभावातील कारुण्यमयी कालिंदीची भूमिका त्यानी हळुवारपणे केली. तसेच राजसंन्यासातील शिवांगीची भूमिका हृदय ओतून केल्यामुळे साऱ्या प्रेक्षकांचे डोळे त्यांनी पाणावून टाकले.

शालिनी पाटील यांच्या सर्व भूमिका ठसकेदार झाल्या. 'एकच प्याला' तील 'गीता', 'इंदु-बिंदु' मधील एका कुब्जेची भूमिका व राजसंन्यास मधील येसूबाईची भूमिका प्रेक्षकांना त्यांच्या उत्कट अभिनयामुळे आवडल्या.

थोडक्यात म्हणजे देशपांडे पति-पत्नीने आपल्या उत्कट अभिनयाने हृदयाचा ठाव घेणाऱ्या शब्दोच्चारांनी गडकऱ्यांच्या नायक-नायिका प्रेक्षकांसमोर सजीव केल्या. मराठी वाङमयातील अद्वितीय भाषाप्रभू म्हणून गडकऱ्यांबद्दल हा भाव निर्माण करण्यात पु. ल. यशस्वी झाले यात शंका नाही.

## बटाट्याची चाळ

'गडकरी दर्शन' या रेखीव कार्यक्रमानंतर पु.लं.नी 'बटाटयाची चाळ' हा पहिला बहुरूपी कार्यक्रम सादर केला. आपल्या 'बटाटयाची चाळ' या विनोदी लेखसंग्रहातील 'मी उपास करतो', 'भ्रमण मंडळ', 'संगीतिका' व 'बटाटयाची चाळ-एक चिंतन' असे चार कार्यक्रम पु.लं.नी साभिनय पेश केले.




पु. ल. दूरदर्शनवर असतानाच 'बटाटयाची चाळ' मुंबईत रंगमंचावर आली होती. हा कार्यक्रम कमालीचा यशस्वी झाल्यामुळे पु. ल. खूष होते. एक दिवस आकाशवाणी भवनात एक धक्कादायक बातमी पसरली. 'पु. ल. दूरदर्शनचा राजिनामा देत आहेत.' ही बातमी ऐकताच श्री. माधव गड-करी पांचव्या मजल्यावर पु.लं.ना भेटायला गेले. त्यांना पु. ल. म्हणाले, 'होय. मी राजिनामा देत आहे. ज्यावेळी लिहिण्याची स्फूर्ती येते तेव्हां ऑफिसला जाण्याची वेळ होते. येथे डी. जी. यांच्या तासन्तास चालणाऱ्या सभा मला खाऊन टाकतात.'

त्यावेळी पु.लं.च्याकडे गाडी नव्हती. ते रोज टॅक्सीने घाईघाईने ऑफि-सात येत. त्यांना सरकारने खर्च करून दूरदर्शनच्या शिक्षणासाठी परदेशी

पाठविले होते. पु.लं.नी राजिनामा देण्याचा निर्णय घेऊन सरकारचे पैसे परत देऊन टाकले व दिल्ली सोडली.

'बटाटयाची चाळ' या कार्यक्रमात चाळीतील विविध वयांची, विविध प्रवृत्तींची माणसे, पुरुष, स्त्रिया, मुले त्यांच्या त्यांच्या खास वैशिष्टयासह आणि लकबीसह पाहायला सापडतात. मानवी स्वभावाचे हे कितीतरी वास्तव व अस्सल नमुने या चाळीत आपणाला आढळतात. या विविध प्रवृत्तींच्या माणसांचे दर्शन विनोदी पद्धतीने घडत असल्यामुळे कार्यक्रम विलक्षण रंगत असे.

सुप्रसिद्ध आंग्ल लेखक चार्लस् डिकिन्स् हा आपल्या साहित्याचे वाचन नाटयगृहातून करीत असे. हे कार्यक्रम इंग्लंड–अमेरिकेत अत्यंत लोकप्रिय झालेले होते. डिकिन्सच्या निधनानंतर सुप्रसिद्ध ब्रिटिश नट व नाटककार एमलिन विल्यम्स हा डिकिन्सच्या कादंबऱ्यांमधील उतारे साभिनय म्हणून दाखवीत असे. विल्यम्सच्या डिकिन्स दर्शनाने पु.लं.च्या या एकपात्री उपक्रमाला चालना दिलेली होती.

एकाच व्यक्तीने सुमारे तीन तास रंगमंचावर प्रेक्षकांसमोर सतत बोलत राहायचे, विविध पात्रे आणि प्रसंग प्रेक्षकांसमोर सजीव करायचे, त्यांना कंटाळा येऊ न देता सुरुवातीपासून अखेरपर्यंत एका जागी खिळवून ठेवून त्यांना वारंवार हसत ठेवायचे हे काम खरोखरच अवघड होते. पु.लं.च्या स्वभावामधील मिस्किलपणा आणि सुलभपणे एखाद्या विशिष्ट प्रवृत्तीच्या व्यक्तीचे सोंग वठविण्याची त्यांची हातोटी या कार्यक्रमात चांगली कामी आली.

**मी उपास करतो**:– पंतानी आपल्या उपासाचा निश्चय कोणालाही सांगितला नव्हता. पण उपासाला सुरुवात करून पुढे चार तास लोटले नाहीत तो त्यांच्या घरी चाळकरी मंडळींची वर्दळ सुरू झाली. पंतानी उपास केलेला असतो आपले वजन घटविण्यासाठी पण चाळकरी शेजारी-पाजारी त्याचा अर्थ अगदी भिन्न प्रकारे लावतात.

'पंत, तुम्ही या उपासाचा नाद सोडा, ही अन्नब्रह्माची उपेक्षा आहे. 'नका पंत, ह्या उपासापोटी आपल्या प्रकृतीचा सत्यानाश करू.' 'पंत, तुम्ही जेवायचं नाही तर कुणी ?' असा चाळकरी त्यांना सल्ला देतात.

'चाळीय ऐक्यासाठी पंताचे आमरण उपोषण' असेही कुणीतरी जाहीर केले. 'चित्याचे बाबा मरणार का रे चंदू ?' असा प्रश्न कुठलेसे कारटे विचारते तेव्हां तर अगदी कळसच होतो. 'हा उपास माझं वजन उतरविण्यासाठी आहे' असे पंतानी जाहीर करताच त्यांना वजन कमी करण्यासाठी

चाळकरी मंडळी अनेक उपाय सुचवितात. त्यांत ‘ बटाटा, भात, डाळी, साखर, मीठ, लोणी–तूप ’ हे सारे खाद्यपदार्थ जेवणातून वर्ज करावेत असा सल्ला पंताना मिळाला. कुणीतरी सांगितलं. ‘ पंत तुम्ही नोकरी सोडा.’ परिणामी पंतांचे वजन १८१ पौंडावरून १९२ पौंडावर जाते.

**भ्रमण मंडळ**– चाळीतल्या मंडळींनी प्रवासाला जाण्याचे ठरवले व त्यातून भ्रमण मंडळाची स्थापना झाली. सुरुवातीला बऱ्याच मंडळींनी उत्साह दाखवला. शेवटी मंडळाची संख्या घटत घटत चारावर आली. त्रिलोकेकर शेट, कोचरेकर मास्तर, काशीनाथ नाडकर्णी व बाबूकाका खरे या चार सभासदांनी मंडळाचा पहिला कार्यक्रम म्हणून पुण्याला जायचे ठरवले. यापैकी प्रवासाचा अनुभव कोणालाच फारसा नसल्यामुळे ते जेव्हा प्रवासाला निघतात तेव्हां त्यांना हरतऱ्हेचे अनुभव येतात. या प्रवाश्यांची गंमत पाहातांना प्रेक्षकांची हंसता हंसता मुरकुंडी वळते.

प्रवासात कोचरेकर मास्तरांना भेटलेला शेतकरी विशेष लक्षात राहतो. कोचरेकर त्याला विचारतात, ‘ कुठं पुण्याला चाललात कां ? यावर तो शेतकरी उलट प्रश्न करतो, ‘ आपुन कुटं चालला ?’

पु.लं.नी या शेतकऱ्याचा हुबेहुब आवाज काढल्यामुळे प्रेक्षक टाळी देतात.

पुणे जवळ आल्यावर काशीनाथ नाडकर्णी झोपेतून जागे होऊन नेहमीच्या संवयीप्रमाणे ओरडतात. ‘ चा झाला काय गो ? ’ हा प्रसंगही प्रेक्षकांना खदखदून हंसवतो. ‘ संगीतिका ’ हा एक आगळा भाग पु.लं.नी सादर केला. चाळकरी मंडळींवरच ही संगीतिका आधारलेली होती. रामा गड्याची मनधरणी करणारी मालकीणबाई व चाळीतील शांता खरे पसंत करावी की ऑफीसातील मिळवती सरला पित्रे पसंत करावी या विचारात पडलेला टंकलेखक अंतू जोशी ही या संगीतिकेतील कांही पात्रे.

निरनिराळया चालीत वेगवेगळया ढंगात पु.लं.नी ही संगीतिका छान रंगवली.

**बटाट्याची चाळ : एक चिंतन** :– या कार्यक्रमातील शेवटचा भाग होता ‘ बटाट्याची चाळ–एक चिंतन.’ यात पु.लं.नी चाळीच्या मन:स्थितीचे केलेले वर्णन हृदयस्पर्शी होते. बरीच वर्षे लोटली असल्यामुळे चाळ जुनी झाली तरी अजून उभीच होती. ऊन खात, पाऊस पचवीत, समोरच्या नवीन नवीन इमारतींना तोंड देत उभी होती.

तो काळ फार जुना होता. त्याकाळी मुंबईची रहदारी कुणालाही धक्के न देता हलत होती. मोटारी मोजक्याच होत्या. वकिलांना पगड्या घ्यायची ऐपत होती. आणि डॉक्टर लोक भक्कम आकाराची फेल्ट हॅट घालायचे.



माणसे एक तर म्हातारपणामुळे मरायची किंवा प्लेग देवी, कॉलरा यासारख्या मातबर रोगांपुढे मान टाकायची. इन्फ्लुएंझा देखील जरा अधिक ताकदीचा होता. पारतंत्र्यामुळे पुढारी संख्येने बेताचेच होते. परिषदा नव्हत्या आणि चर्चा नव्हत्या.

आता हा सारा काळ मागे पडला होता. ठसठशीत शब्दप्रयोगही मागे पडले. पूर्वी भांडणाला भांडण म्हणत, स्पर्धा म्हणत नसत, करमणुकीच्या कार्यक्रमांना सांस्कृतिक कार्यक्रम म्हणत नसत. जुन्या पिढीला चाळीची ओढ होती, माया होती. आता ही मायाच आटल्यामुळे चाळीला वाटे जागच्या-जागी कोसळून जावे !

चाळीचे हे पु.लं.नी केलेले यथार्थ चित्रण मनाला चटका लावणारे आहे. हे चिंतन एका सामाजिक स्थित्यंतराची बोचक जाणीव करून देणारे आहे. हे चिंतन ऐकताना प्रेक्षक सद्गदित होत असत. साऱ्या प्रयोगभर खळाळून हंसणाऱ्या प्रेक्षकांना त्यांनी शेवटी गांभीर्याकडे नेले व अंतर्मुख केले.

'बटाटाच्या चाळी'चा रौप्यमहोत्सवी प्रयोग बिर्ला मातोश्री सभागृहात ५ नोव्हेंबर १९६१ रोजी मोठ्या वैभवशाली स्वरुपात सादर करण्य त आला. जेव्हां फेब्रुवारी १९६१ मध्ये ही बहुरूपी चाळ रंगमंचावर प्रथम अवतीर्ण झाली तेव्हाच मराठी नाट्याच्या इतिहासातील एक सोनेरी पान पु.लं.च्या नावाने व तिच्या नावाने लिहिले गेले. हा पहिला भाग्यशाली प्रयोग झाल्यावर त्याच्या कीर्तीचा सुगंध सर्वत्र असा काही पसरला की चाळीचा प्रयोग जाहीर झाल्यावर त्याची तिकिटे एकदोन तासातच संपू लागली. या कार्यक्रमाला खरोखरच हजारो प्रेक्षकांनी डोक्यावर घेतले.

'आपण चाळकरी नसूनही 'बटाटयाच्या चाळी'चे एवढे सर्वस्पर्शी जीवनचित्रण आपण कसे करू शकलात ?' या प्रश्नाला उत्तर देताना पु. ल. म्हणाले, 'मी चाळकरीच होतो. त्याकाळी सारा मध्यमवर्गीय मराठी माणूस गिरगावात चाळीतच होता. मी नेहमी गिरगांवच्या आमच्या नातेवाईकांकडे शनिवार–रविवार काढत असे. तिथेच मी 'बटाटयाची चाळ' जवळून पाहिली. या नावाची चाळ खरोखरच आहे हे मला नंतर कळलं. हे नांव मी पठ्ठे बापूरावांच्या मुंबईवरच्या वगातून घेतले. पुढे प्रत्यक्ष बटाटयाच्या चाळीतलीच माणसं मला भेटली आणि त्यांनी मला विचारलं, 'आमच्या चाळीतली माणसं तुम्हाला कशी माहिती ?' आश्चर्य म्हणजे त्याच चाळीत 'पावशे', 'त्रिलोकेकर' याच नावाची बिऱ्हाडं होती.'

'हा कार्यक्रम रंगमंचावर पेश करण्यासाठी आपण कशी तयारी केली ?' या प्रश्नाला उत्तर देताना पु.लं.नी सांगितलं,' 'एकपात्री प्रयोग चमत्कारीक असतो. सगळं तुम्हाला एकटयालाच करावं लागतं. कुणाची मुद्रा कशी घ्यायची, त्याची शरीराची पोज कशी असेल याची कल्पना आपणच करायची. 'बटाटयाच्या चाळी'चं साडेतीन तासांचं स्क्रीप्ट मी समोर एक आरसा ठेवून पाठ केलेलं आहे. स्क्रीप्ट पाठ केलं नाही तर नाटकाचा बांधेसूदपणा जातो. या साडेतीन तासांत अनेक पात्रांच्या वेडयावाकडया हालचाली खोलीभर हिंडून मी स्वतः करीत असे. कारण व्यक्तिदर्शन चांगलं झालं पाहिजे. संध्याकाळी प्रयोग असला की मी सकाळी तीन एक तास सबंध स्क्रीप्ट म्हणून टाके. त्यादिवशी घरी मी कुणालाही भेटत नसे.

या प्रयोगात चेहऱ्यावरच्या हावभावापेक्षा सबंध शरीराच्या हालचाली-

वरच माझा भर असे. उदाहरण सांगायचे झाल्यास भ्रमण मंडळाचे सभासद प्रवासासाठी व्हिक्टोरियातून बोरीबंदरला जाण्यास निघतात. व्हिक्टोरियात बसलेल्या माणसांचे गचके मी देत असे. आणि ती थांबल्यावर माझे गचकेही मी एकदम थांबवत असे. प्रेक्षक याला कडाडून टाळी देत.'

'बहुरूपी प्रयोगाच्या' यशाबद्दल सांगायचे झाल्यास त्यात रंजन आणि विनोद असल्यामुळे तो लोकांना आवडला. सुनीताबाईंचा जिजाबाईंचा एकपात्री प्रयोग गंभीर असल्यामुळे यशस्वी झाला नाही.'

'बटाटयाच्या चाळीं'त पुस्तकात आणि प्रयोगातही शेवटचा भाग मी करूण दाखविला आहे. कारण संपूर्णपणे वाईट असं मी पाहूच शकत नाही.

'बटाटयाच्या चाळी'च्या कार्यक्रमाबाबत पु लं.च्या मातोश्री म्हणतात, 'भाईच्या सगळया लेखनात शेवटी एक ध्येयवाद आणि माणुसकीचा गहिवर असतो. लोकांच्या तो नेमका काळजाला भिडतो. भाईने ते सगळं प्रत्यक्ष अनुभवलेलं आहे. त्याचं ते 'चिंतन' ऐकण्यासाठी मी 'बटाटयाच्या चाळी'चे सात आठ तरी खेळ पाहिले असतील.'

नाटयदर्पणमध्ये लिहिलेल्या 'न संपणारे सुरुवातीचे दिवस' या लेखात पु. ल. लिहितात. 'मला एकदा कोणीसं विचारलं होतं की, 'तुमच्या बटाटयाच्या चाळीचे किती प्रयोग झाले ?' मी म्हणालो, 'मला प्रत्येक प्रयोग हा पहिल्या प्रयोगासारखाच वाटत आल्यामुळे मी हिशेब ठेवला नाही. हे मी अगदी मनापासून सांगितलं.'

'बटाटयाच्या चाळी'नंतर 'वाऱ्यावरची वरात' आली. १९६२ मध्ये वरातीचा पहिला प्रयोग झाला. वरातीच्या प्रयोगाची सुरुवात कशी हास्याच्या स्फोटानं व्हायची याचे खुमासदार वर्णन श्री. श्रीकांत मोघे यांनी एका लेखात केलं आहे. ते लिहितात, 'तिसरी घंटा व्हायच्या सुमारास आम्ही सगळे पहिले एन्ट्रीवाले जय्यत तयार असू. तिसरी घंटा झाली की स्टेजच्या आत व बाहेर अंधार होत असे व अंधारातच पु.लं.ची अनाऊंसमेन्ट सुरू व्हायची.

'या. या. या भाऊसाहेब या ! बापूसाहेब या ! अरे वा. वा. कमळीचा बबडयासुद्धा आलाय का वरातीला ? छान. छान. पण बबडया वरात सुरू झाली की टचँऽ करायचं नाही, हं. नाहीतर आसपासचे लोक तुला एकदम शु:ऽ ! शु:ऽ ! असं करतील. आणि त्यांनी शु:ऽ म्हटल्यावर तुम्ही भलतंच कांहीतरी कराल—'

आणि प्रेक्षागृहात एक मस्त हास्यस्फोट व्हायचा. पडदा वर जाण्याच्या आधीच प्रेक्षागृहातून अंधारातच हसण्याची एक लाट फुटायची. आत स्टेज

वर जागोजागी उभ्या असलेल्या सर्व नटांचे कान या हंसण्याच्या लाटेकडे लागलेले असायचे. त्या लाटेची तीव्रता जितकी अधिक तेवढी स्टेजच्या आतल्या बाजूला उत्साहाची लाट अधिक पसरे आणि प्रयोग बेफाम रंगत असे.

'वराती'त सामील झालेल्या कलाकारांसाठी जरी काटेकोर नियम होते तरी ते कार्यक्रम फुलविण्यासाठी उपयुक्त ठरणारे होते. शिस्त होती पण ती जाचक नव्हती. श्रद्धा होती ती कामावरची, पूजेवरची नव्हती. काही ठिकाणी स्टेजच्या पूजेचे खूप मोठे अवडंबर माजवले जात असे. वरातीच्या प्रयोगाला प्रारंभापासून कधीही पूजा करण्यात आली नाही तरीही प्रयोग हाऊसफुल जात असत.

स्टेजच्या आत व बाहेर आनंदी व प्रसन्न वातावरण असे. पु.लं.च्या चिडण्या–रागवण्यामुळे काम जमेना आणि त्यामुळे एखादा कलावंत काम सोडून गेला असं एकही उदाहरण घडलं नाही. ज्या कामासाठी जो माणूस निवडला गेला जणू त्या कामासाठीच तो निपजला असावा इतकी पु.लं.ची पात्र योजना चपखल असायची.

रंगभूमीवर आयत्यावेळी होणारी एकच गोष्ट म्हणजे 'फजिती.' ही महत्त्वाची बाब पु.लं.नी प्रत्येक कलाकाराच्या मनावर सुरुवातीलाच ठसवली होती, त्यामुळे कलाकार मंडळी चपलांबरोबर आळसही हॉलच्या बाहेर ठेवून तालमीला वेळेवर हजर होत.

प्रयोगाच्या वेळी सर्व पात्रे हजर होईपर्यंत पु. ल. अतिशय अस्वस्थ असत, पण एकदा का सर्वजण आले असं कळलं की मेकप् करता करता पु.लं.च्या गप्पा रंगत. एकदा मधु कदम मेकपरूममध्ये पेढे घेऊन आला. मधु कदम हा 'एक रविवार सकाळ' या वरातीमधल्या गंमतीच्या कार्यक्रमात रामा गड्याचं काम करीत असे.

पु.लं.नी त्याला विचारलं, 'आज पेढे कसले रे ?'

तो म्हणाला, 'हाऊस फुल्लचे नव्हेत. मला मुलगा झाला त्याचे ! '

यावर पु. ल. उत्तरले, 'कदम कदम बढाए जा !'

पु.लं.च्या या उद्गारावर मेकपरूममध्ये हास्याची एकच लाट उसळली. त्यात पु.लं.ही सामील झाले.

वरातीत सामील झालेल्या एखाद्या कलाकारास काम करण्यास वेळ नसला आणि त्याच्या जागी दुसऱ्यानं काम केलं की त्याचं कौतुक पेढे वाटून केलं जाई. नवीन काम करणाऱ्यास अशारीतीनं प्रोत्साहन मिळे. परगांवच्या

दौऱ्याच्या वेळी वातावरण खेळीमेळीचं असे. पु. ल. दौऱ्याच्या वेळी जवळपास एखादं प्रेक्षणीय स्थळ असेल तर मुद्दाम गाड्या ठरवून सर्वांना दाखवून आणीत. त्यामुळे सर्वजण खूष असत. दौऱ्याच्या वेळी प्रवासात पु.लं.च्या शेजारची जागा पटकावण्यासाठी सर्वांची धावपळ चाले. नोकर मालक हा भेद तिथे नसे. पु. ल., सुनीताबाई व इतर सर्व कलाकार व सेटिंग करणाऱ्या गफूरभाईपासून बॅकस्टेज आर्टिस्टपर्यंत हे सारेजण बरोबर चहा व जेवण घेत असत. पंगतीला गफूरसकट सगळे असल्याखेरीज कुणाचं जेवणाचं निमंत्रण घेतलं जात नसे.

पु.लं.च्या कनिष्ठ भगिनी सौ. मीरा दाभोळकर यांना नाटकात काम करावयाचं होतं. त्यांनी आपल्या मातोश्रींना सांगितलं व मातोश्रींनी आपल्या सुपुत्राला. लगेच ' वऱ्यावरची वरात ' या कार्यक्रमात त्या सामील झाल्या. सौ. दाभोळकर यांनी ' नाटयदर्पण 'मध्ये लिहिलेल्या एका लेखात ' वराती 'च्या परगावच्या दौऱ्याचा एक किस्सा कथन केला आहे तो असा:– वरातीचे इंदूरला प्रयोग होते. इंदूर नंतर दिल्लीला प्रयोग होणार होते. इंदूरचे प्रयोग झाल्यावर सारेजण दिल्लीला जाण्यास निघाले. परंतु इंदूरची गाडी लेट झाल्यामुळे दिल्लीची गाडी ' पु. ल. देशपांडे सहकुटुंब सहपरिवारासाठी ' थांबवून ठेवली होती. ' वरात ' इंदूरच्या गाडीतून उतरल्यावर पावलापावलाबर स्वागतासाठी टी. सी. उभे होते. त्यांनी दिल्लीच्या गाडीत वरातीला नेऊन बसवल्यावर गाडी सुटली.'

' वराती 'चा शंभरावा प्रयोग झाला तेव्हां पु.लं.नी गफूर मियापासून सगळ्या वऱ्हाडी मंडळींना आपल्या घरी जेवणाचं आमंत्रण दिलं होतं. जेवण झाल्यावर प्रत्येकाला एकएक मोठं पाकीट मिळालं. त्या पाकीटात आयुष्यभर जतन करून ठेवावी अशी अमोल भेट होती. पु.लं.नी प्रत्येकावर एकएक कविता लिहिली होती व त्यावर एक एक अनुरूप असं रंगीत चित्रही काढलं होतं. पु.लं.नी घेतलेले कष्ट पाहून सर्वांची अंत:करण भरून आली.

' वरात 'मध्ये खेडेगावामध्ये आजकाल जी स्थित्यंतरे झालेली आहेत त्याचे अत्यंत इरसाल व खुबीदार असे चित्रण केलेले दिसते. ' वरात 'च्या उत्तरार्धात ' एका रविवार सकाळ 'ची अत्यंत मजेदार हकीकत त्यांनी रंगमंचावर सादर केलेली आहे. त्यांच्या तीव्र कल्पकतेची साक्ष या प्रदीर्घ प्रहसनात मिनिटामिनिटागणिक पटते. पु.लं.च दिग्दर्शन त्यांच्या लेखनातूनच सिद्ध होऊन येतं. या कार्यक्रमात हाताला मेंदी लावलेल्या स्थितीत मालतीबाई, बापूसाहेबांनी हातात धरलेल्या टेलिफोनच्या रिसिव्हरवरून इडलीची

' रिसीपी ' मैत्रिणीला सांगतात. हा प्रसंग पु.लं.च्या लेखन–दिग्दर्शन आणि अभिनयाचा सुरेख त्रिवेणी संगम आहे. या प्रहसनातील पु.लं.चे पेटीवादन हे तर एक प्रमुख आकर्षण होते. हे पेटीवादन ऐकण्यासाठीच प्रेक्षक वारंवार वरातीला जात.

**वटवट**:– ' वाऱ्यावरची वरात ' नंतर पु.लं.नी ' वटवट ' या नावाचा एक आगळा कार्यक्रम सादर केला. या कार्यक्रमांत पु. ल. स्वत: खादीधारी पुढाऱ्याची नक्कल करून प्रेक्षकांना सुखद धक्का देत. ' वटवट 'मध्ये सटायर वापरून खुर्चीच्या लोभावर त्यांनी टीका केली आहे. यांत मंत्री समारंभाला खुर्ची घेऊन येतात. त्यांच्या नोकराला विचारले जाते ' साहेबांनी खुर्ची का बरोबर आणली ?'

यावर नोकर म्हणतो, ' साहेब कधीच खुर्ची सोडत नाहीत.'

तसेच रेडिओवर ' भाशान ' करण्यासाठी खुर्चीसह आलेल्या मंत्र्यांची भूमिका पु. ल. करीत असत. वटवटमध्ये स्वरचित लावणी पेश करून पु. ल. सर्वांना चकित करत. उत्तरार्धात तमाशा ढंगाचा एक वग आपल्याला पाहायला मिळतो.

**असा मी असा मी**– ' असा मी असा मी ' ही एक सामान्य माणसाची कहाणी आहे. कुठल्यातरी हपिसासाठी जगायचे आणि पेन्शनीसाठी किंवा प्रॉव्हिडंट फंडाकडे डोळे लावून दिवसा दिवसाने म्हातारे होत जायचे याहून त्याची मोठी महत्त्वाकांक्षा नसते.

कोकणातल्या जुन्या संस्कृतीत जन्माला आलेल्या हा बेंबटया मुंबईच्या बेनसन जॉनसन नावाच्या इंग्लिश कंपनीत कारकुनापासून अकौंटन्टच्या पदाला पोहोचतो. आयुष्याच्या या प्रवासात त्याला अनेक वळणे लागली. माणसाच्या तऱ्हा बदलल्या तरीही त्यांच्यातला माणूस कसा शाबूत राहिला याचा खुसखुशीत आढावा म्हणजेच ' असा मी असा मी ' हा बहुरूपी नाटचप्रयोग.

रत्नागिरीत जन्माला आलेला बेंबटया पोस्ट खात्यात नोकरी करणाऱ्या आपल्या वडिलांच्या जुन्या संस्कारात वाढला आहे. ह्या संस्कारात अंगवळणी पडलेली शिस्त व जीवनाचे आदर्श मुंबईच्या बदलत्या जीवनात त्याला सारखे बोचतात.

वडिलांना ' फादर ' असे संबोधून सिनेमातले किस्से सांगणाऱ्या आपल्या मुलाचा मोकळेपणा पाहून बेंबटयाला आश्चर्य वाटते. शाळेची मुख्या-

ध्यापिका सरोज खरे भेटायला येणाऱ्या पालकाच्या स्वागतासाठी तोंडावरून पावडरचा पफ् फिरविते व कपाळावरची केसांची बट पुढे ओढते हे पाहून तो स्तिमित होतो. ज्या शिष्याचा धंदा चालत नाही तो टेलरिंग कॉलेज काढून प्रोफेसर कसा होतो व त्याच्या क्लासला बायकांचा कसा घोळका जमतो हे त्याला समजत नाही. आणि कळस म्हणजे थालीपिठाच्या वासाने नवऱ्याला खिळून ठेवणारी त्याची पत्नी क्लबमधे कां जाऊ लागली व चालण्यात 'ग्रेस' दिसावा म्हणून कां कष्ट घेऊ लागली हे त्याला कळेना.

तरीही बेंबटचा या जुन्याला चिकटून न राहता त्याने नव्या जगाशी जुळवून घेण्याचा प्रयत्न केला. याचे कारण माणसाच्या तऱ्हा बदलल्या तरी त्याच्यातील माणूस बदलला नाही.

या कार्यक्रमात पु.लं.च्या समाजाभिमुख उपहासाला एखाद्या वाहत्या प्रवाहाचे स्वरूप येते. प्रचलित शिक्षणपद्धती, सामाजिक चालीरीती, इ. क्षेत्रात जे त्याज्य आहे ते हास्यास्पद स्वरूपात पु.लं.नी प्रेक्षकांसमोर ठेवले. तसेच त्यानी बुवाबाजीचीही रेवडी उडवली.

पु.लं.नी वेगवेगळ्या स्त्री–पुरुषांच्या, मुलाबाळांच्या लकबी कौशल्याने टिपल्या व त्यांच्यातील व्यंगांचे विडंबन अशा रीतीने केले की प्रेक्षागृह खळाळून हंसले. प्रेक्षागृहातील स्त्रिया तर वारंवार खदखदून हंसत.

एका सामान्य माणसाच्या जीवनांतील वेधक नाट्य पु.लं.नी जसे टिपले तसेच ते समर्थपणे रंगमंचावर उभे केले.

### हंसविण्याचा माझा धंदा:–

पु.लं.नी 'हंसविण्याचा माझा धंदा' हा आणखी एक एकपात्री कार्यक्रम सादर केला. यात अभिनय फक्त सूचक व मुख्य रोख निखळ वाचनावर होता.

आपल्या तीन कथांच– केवळ वाचन करून तीन तास प्रेक्षकांना खिळवून ठेवण्याचा चमत्कार पु.लं.नी केला.

रत्नागिरी ते मुंबई या एस्.टी.च्या प्रवासात म्हैस आडवी येऊन तिनं जो धुमाकूळ उडवून दिला त्याचं बहारदार वर्णन करणारी ही कथा आहे.

'बिगारी ते मॅट्रीक' पर्यंतच्या प्रवासाचं आपल्या खास शैलीत पु.लं.नी निवेदन केलं. त्यांनी हा कार्यक्रम अलिकडेच टी. व्ही. वर सादर केला. शिक्षणाच्या पद्धतीवर ती एक सटायर आहे. शिस्तीच्या नावाखाली सुरुवातीच्या आयुष्यातील कोवळी वर्षे कशी करपून गेली हे कठोर सत्य गंमतीदार पद्धतीने पु.लं.नी सादर केले.

'हरितात्या' हे हृद्य व्यक्तिचित्र पु.लं.नी वाचून दाखविलं.

पु.लं.ना निसर्गतःच उच्चारांची, ध्वनीची, एक वेगळीच जाण आहे. ते कितीतरी तऱ्हेने वेगवेगळ्या आवाजात बोलू शकतात. ती एक मोठी दैवी देणगी आहे. विविध तऱ्हांनी ते नकला करू शकतात. या देणगीचा त्यांना त्यांच्या 'बहुरूपी' प्रयोगात मोठ्या प्रमाणावर लाभ झाला.

थोडक्यात म्हणजे रंगमंचावरील आविष्कार हा किती विविधतापूर्ण व शैलीदार असू शकतो हे पु.लं.नी आपल्या बहुरूपी व बहुपात्री कार्यक्रमांनी दाखवून दिले. हे अभिनव कार्यक्रम मराठी प्रेक्षकांना फार आवडले. याच-काळात इतर भारतीय भाषांच्या रंगभूमीच्या परंपरांचेही त्यांनी अवलोकन केले व त्यांच्याशी घनिष्ठ संबंध जोडले. यामुळे पु.लं.ना संगीत नाटक अकादमीचे अध्यक्षपद मिळाले.

● ●

७

# ती फुलराणी अशी फुलली

'सुंदर मी होणार' या नाटकानंतर पु.लं.चे नवीन नाटक प्रदीर्घकाळ रंगमंचावर आले नव्हते. याचे कारण तीन अंकी नाटकाच्या रचनेवरचं त्यांच मन उडून 'बहुरूपी' या फॉर्मकडे गेलं. हा फॉर्म पु.लं.ना फार आवडला. १९६० नंतर रंगमंचावर आलेले पु.लं.चे एकपात्री, बहुरूपी, प्रयोग पाहून रसिक संतुष्ट होत असत. 'सुंदर मी होणार' नंतर पु.लं.नी एकदोन नाटके लिहिण्याचा प्रयत्न केला, पण ती त्यांनी उद्वेगाने फाडली. असं सांगतात की फाडलेले कागद त्यांच्या घरातच आहेत.

१९७५ च्या सुरुवातीला पु.लं.चे 'ती फुलराणी' हे नाटक इंडियन नॅशनल थिएटरतर्फे रंगमंचावर आले.

बर्नार्ड शॉ या आंग्ल नाटककाराच्या 'पिग्मॅलियन' या इंग्रजी नाटकावरून पु.लं.नी 'ती फुलराणी' हे अप्रतिम नाटक लिहिले. या नाटकाची जन्मकथा श्री. द्वा. पां. लेले यांनी रविवार सकाळमध्ये लिहिलेल्या एका लेखात कथन केली आहे.

एकदा पु. ल. परगांवी त्यांच्या एका मित्राकडे गेले होते. त्याने पु.लं.ना शॉ चे 'पिग्मॅलियन' हे नाटक वाचायला दिले. ते नाटक वाचून पु. ल. भारावून गेले. पु.लं.नी शॉची अनेक नाटके वाचली होती पण त्याच्या अन्य नाटकांपेक्षा पिग्मॅलियनचे स्वरूप निश्चितपणे वेगळे होते. या नाटकात शब्द आणि अर्थ याचे मनोहारी दर्शन शॉने घडवले आहे. यामुळे पु.लं.ना ते अतिशय आवडले. परभाषेतल्या उत्कृष्ट कलाकृती मराठीत जरूर यायला पाहिजेत असं पु. ल. वारंवार प्रतिपादन करत आले आहेत. तेव्हा 'पिग्मॅलियन'चे मराठीकरण करण्याचा पु.लं.नी संकल्प सोडला. पण हे काम सोपे नव्हते. मूळ नाटक भाषाशास्त्रावर आधारलेले; इंग्रजी शब्दांच्या निर-

निराळ्या उच्चारातून होणारा विनोद हा त्याचा स्थायीभाव. याखेरीज मूळ नाटकात शिव्या भरपूर असल्यामुळे त्यावरुन शॉ विरुद्ध आंदोलनही झाले होते. तेव्हां मराठी नाटकात शिव्यांचा वापर करावा तर सनातनी गहजब करतील ही भीती होती. शिव्यांचा वापर टाळल्यास नाटकाचा कणाच मोडेल असे वाटले. तेव्हां हे मराठीकरण पु.लं.ना एक आव्हान होते व ते त्यांनी स्वीकारले.

पु.लं.ची ' फुलराणी ' नायिका निश्चित झाली आणि नाट्यलेखनांत पु. ल. मग्न होऊन गेले. अवघ्या चार दिवसात दोन अंक हातावेगळे झाले खरे, पण गाडी पुढे जाईना. सुमारे चार वर्षे फुलराणी कागदावरच राहिली-- रंगमंचाची प्रतिक्षा करीत.

नंतर पु.लं नी ' पिग्मॅलियन 'चा ' संतु रंगीली ' हा गुजराथी नाट्यप्रयोग पाहिला व त्यांनी ' फुलराणी ' पूर्ण करण्याचा मनाशी निश्चय केला. नाटक पूर्ण झाल्यावर ' इंडियन नॅशनल थिएटर 'ला एका अटीवर देण्याचे कबूल केले. ती अट होती सतीश दुभाषी, भक्ति बर्वे व अरविंद देशपांडे यांनी या नाटकात कामे केली पाहिजेत. अट तशी जाचक नसल्यामुळे ती लगेच मान्य झाली. अशा रीतीने ' फुलराणी ' शब्दांचा फुलोरा फुलवीत वाटचाल करू लागली.

शब्दोच्चाराचा संस्कृतिस्तराशी घनिष्ठ संबंध असतो व शब्दोच्चार जर बदलला तर त्याप्रमाणे संस्कृतिस्तरही बदलतो या सिद्धांतावर हे नाटक आधारलेले आहे. समाजातील उच्चभ्रु थरातील व्यक्तींची भाषा शुद्ध मानली जाते. तेव्हा समाजात मानाचे स्थान हवे असेल तर आपली भाषा शुद्ध असली पाहिजे. शुद्ध बोलणारी व्यक्ती अशुद्ध बोलणाऱ्या व्यक्तीपेक्षा स्वत:ला अहंकारपोटी श्रेष्ठ मानीत असते व ' पाणी ' या शब्दाला ' पानी ' म्हणणाऱ्या व्यक्तीकडे तुच्छतेने पाहाते.

व्यक्तीचे समाजातील स्थान हे त्याच्या भाषेवरून ठरते. आपली सामाजिक उंची वाढवायची असेल तर शुद्ध बोलायला शिकले पाहिजे असा दृष्टीकोन बाळगणारा एक भाषा शास्त्राचा प्राध्यापक ' शुद्ध कसे बोलावे ' याचे वर्ग चालवीत असतो. त्याला एक गावंढळ मुलगी भेटते. तिला अवघ्या सहा महिन्यात शुध्द बोलायला शिकवून उच्चभ्रु समाजात राजकन्या म्हणून मिरवून आणू अशी पैज तो आपल्या एका भाषाशास्त्रज्ञ मित्राजवळ लावतो व ती जिंकतो. गंमतीची गोष्ट अशी की सहा महिन्यात या प्राध्यापकाचे त्या मुलीवर मन जडते.

अशा या मूळ कथेवर पु.लं.नी ' ती फुलराणी ' हे नाटक रचले आहे.

शब्दोच्चारानुसार प्रत्येक माणसाच्या जन्मस्थानाचा अचूक अंदाज बांधणारा मूळ नाटकातला प्रोफेसर हिगिन्स सहीनसही मराठीत आणणे हे काम अवघड होते. परंतु रूपांतरात पु.लं.नी हे उत्तम साधले. परभाषेतील उत्कृष्ट नाटचकृती तितक्याच उत्कृष्टपणाने मराठीत सादर करून मराठीचं नाटच-दालन त्यांनी समृद्ध केलं. मूळ कथेवर त्यांनी मराठी भाषेचे साज चढवून फुलराणीला नायिका बनवून तिला मोठचा दिमाखाने रंगमंचावर आणली. पु.लं.नी बालकवींची 'फुलराणी' या गाजलेल्या कवितेचा या नाटकात कौशल्याने उपयोग करून घेतला.

'हिरवे हिरवेगार गालिचे
हरित तृणाच्या मखमालीचे
त्या सुंदर मखमालीवरती
फुलराणी ती खेळत होती.
तोच एकदा हांसत आला
चुंबून म्हणे फुलराणीला
तो रविकर कां गोजिरवाणा
आवडला आमुच्या राणीला
लाजलाजली या वचनांनी
साधीभोळी ती फुलराणी!'

हे नाटक पडदा वर जाण्यापूर्वीच प्रेक्षकांच्या मनाची पकड घेते. एका नव्या ढंगाची नांदी पडद्यामागून ऐकू येऊ लागते.

'विश्वाच्या अंगणात, मुक्तमनाने विहरत होते स्वर बारा!'

आणि विचार चक्राला तिथेच चालना मिळाली. आधी फक्त बारा स्वर होते. पण कसल्यातरी अनिर्वचनीय आनंदान आदिमानवाचा कंठ दाटून आला आणि त्यातून व्यंजनं बाहेर आली.......

या नांदीतून पु.लं.नी मराठी भाषेची वैशिष्टचें प्रेक्षकांना ऐकवली.

प्रोफेसर अशोक जहागिरदार हा एका श्रीमंत जहागिरदाराचा मुलगा असून त्याचा भाषा शास्त्राचा गाढ व्यासंग असतो. मध्यरात्री एका थिएटर बाहेर त्याची एका साधी, सरळ पण तितकीच फटकळ असलेल्या मंजुळा नावाच्या फुलवालीशी गांठ पडते. हा आरंभीचा प्रवेश नाटकाच्या रंगतीला सुरवात करतो. या प्रवेशातून व्यक्तीव्यक्तीच्या भाषेतील सूक्ष्म फरक लेख-काने दाखवला असून कांही कोपरखळचाही दिल्या आहेत.




' साधी भोळी ती फुलराणी '

गावंढळ भाषा बोलणाऱ्या मंजुळेनं जर आपल्याकडे शुध्द बोलण्याचे व चांगले वागण्याचे शिक्षण घेतले तर सहा महिन्यात तिच्यात संपूर्णपणे बदल घडवून आणीन, एवढंच नव्हे तर तिला राजकन्या म्हणून बड्या लोकांत मिरवून आणीन अशी पैज अशोक जहागिरदार आपले एक भाषाशास्त्रज्ञ मित्र डॉ. विश्वनाथ जोशी यांच्याजवळ लावतो.

या त्याच्या उद्गाराने मंजुळा सुखावते व दुसऱ्या दिवशी सरळ अशोकच्या

घरी हजर होते. चांगलं कसं बोलावं, वागावं हे शिकायला. मंजुळा ज्यावेळी अशोकच्या घरी येते त्यावेळी डॉ विश्वनाथ जोशी तिथेच असतात. ते अशोकला ही पैज स्वीकारायला लावतात आणि या प्रयोगाचा आर्थिक भार स्वत: उचलतात.

सुरवातीलाच अडचण येते ती मंजुळेच्या बापाची. हा दगडोबा साळुंके व्यसनी असून पैसे उकळण्यासाठी अशोकच्या घरी येतो. त्याच्या या वृत्ती-बद्दल अशोक त्याला दोष देतो खरा, पण वरकरणी खोटे भासणारे परंतु विचारांती पटणारे रांगड्या लोकांचे तत्त्वज्ञान कसे बरोबर आहे हे दगडोबा साळुंके अशोकला पटवून देतो.

मंजुळेची शिकवणी सुरू होते. अशोक तिला तन्मयतेनं शिकवू लागतो. ती झपाट्याने प्रगती करू लागते. तिला बालकवींची ' फुलराणी ' ही कविता शिकविण्यात येते. रस्त्यावरची ही अडाणी पोर आपल्या संवेदनाक्षम मनाने व कुशाग्र बुध्दिमत्तेने खरोखरच सहा महिन्याच्या आत पार बदलून जाते व राजकन्या म्हणून पार्टीतून मिरवून देखील येते. अशोक आणि डॉ. विश्वनाथ जोशी प्रयोग सफल झाला या आनंदाने बेहोष होतात. अशोकला आपण आपल्या स्वकर्तुत्वावरच पैज जिंकली व या यशात मंजुळेचा कांहीच हिस्सा नाही असे वाटते. मंजुळेला हे तो बोलूनही दाखवतो. आपल्या भावनांची कदर न केल्यामुळे ती प्रक्षुब्ध होऊन अशोकला चप्पल फेकून मारते. तिच्या निष्ठेनं अशोकला आपल्या मनांत दडलेलं प्रेम मान्य करायला लागतं. अखेर हृदयाची भाषा हृदयाला समजते.

भक्ति बर्वे या गुणसंपन्न नटीनं मंजुळेची भूमिका अशा काही ताकदीनं व दिमाखानं उभी केली की कुणीही चकित होऊन जावं. अशुध्द उच्चार शिकण्यासाठी त्यांना खास मेहनत घ्यावी लागली आणि एकाचवेळी शुध्द आणि अशुध्द शब्दोच्चार करण्याची अवघड कसरत करावी लागली. ' तुला शिकवीन चांगला धडा ' या मुक्त छंदातील काव्यात राग, स्वप्नाळू-पणा आणि अनुराग अशा विविध भावछटांचा आविष्कार एकाचवेळी दाखवितांना एक निराळाच अनुभव त्यांना मिळाला.

प्रा. अशोक जहागिरदारची भूमिका श्री. सतीश दुभाषी यांनी केली असून या नाटकाच्या यशात त्यांचा मोठा वाटा आहे. ते म्हणतात, ' यापूर्वी आपण कामे केलेली बहुतेक नाटके समस्याप्रधान होती, त्यामुळे भूमिका करताना मनावर जबरदस्त ताण पडत असे. परंतु ' ती फुलराणी 'तील अशोकची भूमिका करताना हा ताण मुळीच जाणवत नाही.'

नाटककाराने अशोक व मंजुळा या दोघानांही मुक्तछंदातील दीर्घकाव्य

म्हणावयास लावली त्यामुळे सतीष दुभाषी व भक्ति बर्वे यांना श्रेष्ठ अभिनय दाखविण्याची संधी मिळाली.

'ती फुलराणी' हे नाटक म्हणजे पु.लं.च्या लेखन व दिग्दर्शन कौशल्याचा कळस आहे. एरवी 'उच्चारशास्त्र' हा विषय रंगभूमीवर रटाळ वाटला असता तो पु.लं.च्या खुसखुशीत संवादांनी व मार्मिक निरीक्षणानं विलक्षण फुलला.

पु.लं.चे हे नाटक त्यांच्या आतापर्यंतच्या नाटकापेक्षा वेगळे आहे. ते नुसते हसवत नाही तर रडवतेही. विनोद निर्मिती करताना मराठी भाषेचे शेकडो बारकावे पु.लं.नी या नाटकात दाखवले आहेत.

डॉ. विश्वनाथ जोशी अशोकला विचारतात, 'ऱ्हता' हे अशुद्ध आहे मग 'नव्हता' शुद्ध कसे?'

नाटकात भरपूर शिव्या असल्यातरी त्या सहजपणे येतात माणसाची मूळ प्रवृत्ती दाखविण्यासाठी. म्हणूनच प्रेक्षक नाटक संपल्यावर शिव्या विसरतो व काव्यानंदाच्या एका विलक्षण अनुभूतीने भारावून जातो.

एकदा 'ती फुलराणी'चा प्रयोग सातारा भागात साखर कारखान्याने एका ओपन थिएटरमध्ये आयोजित केला होता. त्या भागात हे नाटक कितपत समजेल असे साऱ्यांना वाटले. प्रयोग संपल्यावर काहीजण आत येऊन म्हणाले, 'नाटक एकदम झकास झाले. आता आम्हाला बी पानी म्हनताना लाज वाटनार नाही.'

ही प्रतिक्रिया म्हणजे हे नाटक या लोकांच्यापर्यंत पोहोचल्याची पावती होती.



# ८

# तीन पैशाचा तमाशा

' तीन पैशाचा तमाशा 'चा पहिला प्रयोग रविवार २६ जून १९७८ रोजी थिएटर अॅकॅडमी, पुणे या संस्थेतर्फे बालगंधर्व रंगमंदिर, पुणे येथे करण्यात आला.

जर्मन नाटककार ब्रेश्टच्या ' थ्री पेनी ऑपेरा ' ह्या नाटकावरून पु.लं.नी प्रस्तुत ' तीन पैशाचा तमाशा ' रचला आहे. ' थ्री पेनी ऑपेरा 'चा पहिला प्रयोग १९२८ मध्ये बर्लिन येथे झाला. हा प्रयोग पाहून ब्रेश्ट हा मार्क्सच्या तत्त्वज्ञानाने प्रभावित झाला होता हे सर्वांना उमजले. समाजातल्या उपेक्षित व दुर्दैवी अशा जीवांबद्दल वाटणारी अपरंपरा सहानुभूती, तर उच्चभ्रु जगाबद्दल वाटणारी घृणा आपल्या खास शैलीला अनुसरून हंसवीत, गाणी गात, भेदक थट्टा करीत या ऑपेरातून ब्रेश्टने व्यक्त केली.

पु.लं.कृत ' तीन पैशाचा तमाशा ' हे ब्रेश्टचे मराठी रंगभूमीवर येणारे तिसरे नाटक होय.

पहिले नाटक ' अजब न्याय वर्तुळाचा ' हे ब्रेश्टच्या ' कॉकेशियन चॉक सर्कल ' या मूळ नाटकावर आधारलेले होते. मुंबई मराठी साहित्य संघातर्फे याचे प्रयोग झाले. चिं. त्र्यं. खानोलकरांनी हे रुपांतर केले होते.

ब्रेश्टच्या ' गुडवुमन ऑफ सेट झुआ 'वर आधारलेले दुसरे मराठी नाटक व्यंकटेश माडगूळकरांनी ' देवाजीनी करुणा केली ' या नावानें रचले. या नाटकाचें दिग्दर्शन विजया मेहतांचे होते.

नाटक रंगमंचावर करण्याचा कुठलाही हेतू असो, ते करमणूकीसाठी असो किंवा त्यातून एखाद्या गंभीर समस्येची उकल करायची असो, नाटक म्हणजे ' खेळ 'च आहे असे ब्रेश्टने मानले. याबाबत पु.लं.नी प्रस्तुत नाटकाच्या

प्रस्तावनेत ब्रेश्टचे उद्‌गार उद्‌धृत केले आहेत. ब्रेश्ट म्हणतो, ' No matter how fearful the problems they handle, plays should always be playful.'

ब्रेश्टच्या प्रस्तुत नाटकात असा खेळकरपणा जरूर आहे. त्याच्यासारख्या प्रतिभावान नाटककाराने रंगभूमीला लोकशिक्षणाचे साधन मानून शिक्षण आणि मनोरंजन यातला समतोल राखला व कलावाद आणि बोधवाद याचे खुबीदार मिश्रण त्याने आपल्या नाट्यलेखनातून केले. थोडक्यात म्हणजे संगीत, नृत्य, विनोद या नाटकाच्या रंजकतेस भर घालणाऱ्या घटकांपासून जो आनंद मिळतो त्याला ब्रेश्टने प्राधान्य दिले.

ब्रेश्टच्या काळातील ऑपेरा हे बहुधा उच्च प्रेक्षकांना आवडणारी नाजुकसाजुक करमणूक पुरविणारे असत व त्यांचे स्वरूपही भव्य असे. परंतु ब्रेश्टने ऑपेरामध्ये गँगस्टर्स, भिकारी, वेश्या या सारख्या समाजातील उपेक्षित घटकांना महत्त्वाचे स्थान देऊन, त्यावेळच्या नाट्यकल्पनेची रेवडी उडवली. ' थ्री पेनी ' म्हणजे दीडदमडीचा किंवा ' कवडीमोल ' असा अर्थ ब्रेश्टला अभिप्रेत आहे. या अर्थानेच ' थ्री पेनी ऑपेरा ' हे ब्रेश्टने दिलेले शीर्षक जरी व्यंगात्मक भासले तरी ते आकर्षक व समर्पकही आहे.

' लोकशिक्षण व रंजन ' यांचा बेमालूम मिलाफ साधणारा हा " थ्री पेनी ऑपेरा ' मराठीमध्ये पु.लं.नी आणला. स्वतःच्या लेखनात पु.लं.नी लोकशिक्षण व रंजन यांचा समतोल आवर्जून सांभाळल्यामुळे त्यांना ब्रेश्टच्या नाटकाचे नेमके स्वरूप सहज सापडले. त्यामुळे मूळ नाटकाचे रुपांतर करण्यात पु. ल. कमालीचे यशस्वी झाले.

पु.लं.नी ' थ्री पेनी ऑपेरा 'ला 'तीन पैशाचा तमाशा' हे आगळे व आकर्षक शीर्षक दिले. इथे ' तमाशा ' हा शब्द नेमक्या कोणत्या अर्थाने घ्यायचा ? यातील गद्य सूत्रधार आणि सुरवातीची गणगवळण वगैरे प्रकार पारंपारिक मराठी तमाशातलेच आहेत. ' तसेच ब्रेश्टच्या नाटकांचे रचनेच्या दृष्टीने मराठी तमाशाशी जवळचे नाते आहे, असे रुपांतरकाराने नाटकांच्या प्रस्तावनेत लिहिले आहे. या कारणांमुळे ' तमाशा ' हा शब्द पारंपारिक लोकनाट्य प्रकार या अर्थानेच घ्यावा.

नाटकाच्या प्रारंभी गणगवळण आहे खरी पण ' तमाशा ' या नाट्यप्रकारातले एवढे एकच सूत्र कां स्वीकारले असा टीकाकारांचा सवाल आहे. कारण गण झाल्यावर नाटक कुठेच तमाशाच्या अंगाने वाटचाल करीत नाही. कांही जाणकारांनी हा गण अनावश्यक असल्याचे मत व्यक्त केले आहे.

उच्चभ्रू वर्गाकडून समाजातल्या उपेक्षित वर्गाची, सत्ता व संपत्तीच्या लालसेपोटी होत असलेली भयंकर पिळवणूक व त्यांतून निर्माण होणाऱ्या

दु:खाविषयी वाटणारी कणव ही ब्रेस्टची मूळ प्रवृत्ती आहे. या नाटकाच्या मूळ प्रवृत्तीमधून उभी राहिलेली नाटयकृती व ज्या पध्दतीनं ती रंगमंचावर सादर करण्यात आली यांत बरंच अंतर आहे. याबाबत पु.लं.नी सांगितले ' जब्बार पटेलनं हे नाटक म्युझिकल किंवा ऑपेरा पध्दतीनं बसवायला घेतलं, तेव्हांच माझ्या स्क्रिप्टमधला नाटयबंध (फॉर्म) बदलला गेला आणि मला अभिप्रेत नसलेला एक नवा घाट, नवा फॉर्म त्याला प्राप्त झाला यामुळे नाटकातलं वाङमयमूल्य नगण्य ठरून संगीत मूल्याला प्राध्यान्य मिळालं. जब्बारनं त्याच्या पद्धतीने हे नाटक चांगलं बसवलं आहे खरं, पण मी बसवलं असतं तर ते वेगळ्या पद्धतीनं सादर झालं असतं. मला हे मूळ नाटक आवडलं म्हणून मी ते मराठीत आणलं. ब्रेश्टच्या नाटकावर जरी ते आधारलेलं असलं तरी रुपांतर केल्या, मुळे वेगळे झालेले एक मराठी नाटक या दृष्टीकोनातून त्याच्याकडे बघितले जावे असे मला वाटते.'

' आपण हा म्युझिकल फॉर्म स्वीकारण्याचें कारण काय ?' या प्रश्नाला उत्तर देताना जब्बार पटेल म्हणाले, ' नाटकाचे वाचन होत असताना ते कशा पद्धतीने बसवायचे या संबंधीच्या कल्पना माझ्या मनात येत होत्या, विचाराअंती मला हा म्युझिकल फॉर्म मिळाला. ब्रेश्टचे तत्कालीन तत्त्वज्ञान हे आपल्याकडच्या आजच्या परिस्थितीलाही लागू होते, त्यामुळे प्रस्तुत नाटक आजच्या घटकेलाही ताजे व रसरशीत वाटते. थिएटर अॅकॅडमीन तमाशाद्वारा एक उत्तम संगीतीकाच सादर केली आहे असं माझं मत आहे.

वग नाटयाच्या पद्धतीने सूत्रधार ' तमाशांचे कथन करीत असतानाच रंगमंचावर प्रत्यक्ष प्रसंग व दृश्य रूपांनी हे कथानक प्रेक्षकांपुढे संगीत संवादाच्या माध्यमातून उलगडले जाते.

लेखकाने ' थ्री पेनी ' सुटया केल्या आहेत व त्यातून एक नवे प्रास्ताविक तयार केले आहे ते असे:-

तीन पैशाचा तमाशा । त्यात एक पैशाच होईल गान
एक पैशाचा होईल नाच...
अन् तिसरा पैसा
घेतला लाच !

हे नाटक रुपांतरीत असल्याने रुपांतरकर्त्यांने मूळ संहितेत थोडे बदल करण्याचे स्वातंत्र्य घेतले आहे. मूळ नाटकातील रचना व प्रसंग कांही बदल न करता जर असेच सादर केले तर रुपांतर फसण्याचा संभव अधिक असतो. याचे कारण मूळ नाटकातले प्रसंग इथल्या प्रेक्षकांना रुचतीलच याची

शाश्वती नसते. तेव्हां रुपांतरात थोडा बदल करणे अपरिहार्य असते. प्रस्तुत रुपांतरातही पु.लं.नी थोडे बदल केले आहेत.

ब्रेश्टच्या मूळ नाटकात नायक कॅ. अंकुश नागावकर याची प्रेयसी लालन ही अंकुशचा मित्र व पोलिस ऑफीसर टायगर भंडारे यांची मुलगी आहे. मराठी रुपांतरात हे नाते जरी रुपांतरकाराने विचारात घेतले नसले तरी नाटकाच्या रंजकतेला बाधा येत नाही. त्यामुळे पु.लं.चा हा बदल योग्यच होता असे म्हणायला हरकत नाही. ब्रेश्ट वेश्यावस्तीचे वर्णन करत नाही तर पु. ल. प्रेक्षकांच्या हृदयाला भिडेल असं करतात. तसेच छोटू भटजीचा एक स्वतंत्र प्रवेश येतो तो प्रेक्षकांना मनमुराद हंसवतो व खोटेपणा, ढोंगीपणा, याचे भेदक दर्शन घडवतो. हा प्रसंग मूळ नाटकात नसला तरी तो प्रेक्षकांच्या मनाची पकड घेतो.

या नाटकातील गद्य सूत्रधार तमाशातला आहे. त्याचा रंगमंचावरील अभिनय, उच्चार हे जुन्या तमाशातील पात्रांसारखे आहेत. 'नर्सेस' या शब्दाचा उच्चार 'नरसबाया' करणारा सूत्रधार म्हणतो, 'अरेच्या, बोलता बोलता पहाट झाली, अहाहा ह्या मुंबापुरीत पहाटेच्या मंगलसमयीचा काय हा सुगंध !' यानंतर हाच सूत्रधार पहाटेचे वर्णन करताना कोणकोण मंडळी जागी झाली आणि कोण झोपी गेली याची लांबलचक यादी म्हणून दाखवतो.

'भिकारी जन हो, आता उठा', ही भिकाऱ्यांची भूपाळी, माणूस जगतो कशावरी आणि 'तुझं नांव लालन तर माझं नांव 'मालन' हे द्वंद्व गीत, अशी कांही निवडक गाणी पु.लं.नी चांगली रचली आहेत. झीनत तळेगांवकर एक अस्सल वेश्या व अंकुशदादा नांगावकर यांनी गायलेले 'आमुची प्रीत पुराणी त्याची ऐका आता कहाणी' हे गाणंही प्रेक्षकांच्या पसंतीला उतरते. अंकुशदादाची अनेक गाणी बोली भाषेतली आहेत. उदाः— माझी नवरी कशी नर्वस होऊन गेली.'

प्रस्तुत नाटकात संगीताचा भरपूर वापर केला आहे. वगनाट्याने सुरवात होणारे हे नाटक गणगौळणी नंतर अनपेक्षितरीत्या अनोख संगीतविश्व रंगमंचावर उभे करते. मराठी रंगभूमीवर प्रथमच रॉक म्युझिकचे (पॉपम्युझिक मधील एक प्रकार) दर्शन पहिल्या अंकात अगदी सुरवातीला घडते. दुसऱ्या अंकात तर भावगीत, रागदारी, पॉपम्युझिक, कोरससाँग, कव्वाली, गझल, लावणी इतके संगीत प्रकार येऊन जातात. या साऱ्या संगीताच्या प्रकारांमुळे प्रेक्षागार धुंदफुंद होऊन जाते.

या नाटकात जब्बार पटेलांनी स्लाईडस्‌चा वापर कौशल्याने केला आहे. शब्दातून किंवा अभिनयातून मिळणाऱ्या परिणामापेक्षा प्रेक्षकांवर अधिक




प्रभाव पडावा म्हणून स्लाईडस्‌चा वापर केला असं पटेलांनी एकदा सांगितलं. या स्लाईडस्‌चा वापर नावीन्यपूर्ण वाटतो.

नाटकातले संवाद चुरचुरीत व खमंग असून दर्जेदार शाब्दिक कोटयांवर प्रेक्षक खळखळून हंसतात. ' मला त्यांनी टिपलं नाही, ' पिटलं , ' पर्मिटाची भीक व भिकेचे पर्मिट, ज्ञानाची कास कशाला धरा ?' त्यापेक्षा म्हशीची कास धरा, निरोध व निरपराध ' या शब्दांवरचा विनोद, मलबार हिलच्या बायका सूर्यास्तानंतर पितात ' हा मर्मभेदक उपरोध, अशी कितीतरी गंमतीदार उदाहरणे देता येतील.

दिग्दर्शकाने भिक्षेकरी प्रशिक्षण केंद्रातील प्रसंग नेटकेपणाने उभे केले

आहेत. तसेच वेश्या, गँगस्टर्स यांचे चित्रणही वास्तव वाटते. 'झीनत तळेगांवकर' या वेश्येच्या भूमिकेतील बारकावे आणि तिच्या लावण्या सडसडीत अंगकाठीच्या माधुरी पुरंदरे यांनी अस्सल लावणीबाज संभाळून पेश केल्या आहेत.

थिएटर ॲकॅडमी व जब्बार पटेल या दोन्ही नावांमागे विलक्षण सफाईदार नाटयप्रयोगांची पार्श्वभूमी आहे. अस्सल समूह दृश्ये पेश करावीत तर थिएटर ॲकॅडमीनेच असे समीकरण होऊन बसले आहे. ॲकॅडमीचे गुणी कलावंत एकदिलाने काम करून अतिशय सफाईदारपणे हा प्रयोग करतात.

या नाटकाच्या प्रस्तुतीकरणावर पाश्चात्य रंगभूमीवरील ऑपेरा या नाटयप्रकाराची व आधुनिक पाश्चात्य संगीताची ठळक छाप आहे. पाश्चात्य संगीताच्या योजनेऐवजी लोकसंगीताच्या वाटेने हा प्रयोग फुलवला जाण्यामध्ये जास्त औचित्य होते. तरीसुद्धा या नाटकाचे भरपूर प्रयोग होत आहेत. पु. ल., जब्बार पटेल, थिएटर ॲकॅडमी ही नावे या प्रयोगाशी निगडित असल्यामुळे प्रयोग 'हाऊस फुल' जातात.

● ●

९

# पु.लं.चे प्रकाशक

नावाजलेल्या ललित लेखकांची पुस्तके प्रकाशित करण्यासाठी प्रकाशक कधीच खळखळ करीत नाहीत. किंबहुना प्रकाशकांनाच थोर लेखकांच्या मागे लागून त्यांची पुस्तके मिळविण्याचा खटाटोप करावा लागतो. उलटपक्षी नवोदित ललित लेखकाला मात्र प्रकाशकांच्या मागे धावावे लागते. व प्रसंगी पदरमोड करून आपले पुस्तक प्रकाशकाला द्यावे लागते.

थोडक्यात म्हणजे लेखकाच्या उमेदवारीच्या काळात त्याला ' प्रकाशक ' नामक प्राण्याभोवती असलेल्या अभेद्य तटाला धडका देऊन खिंडार पाडावे लागते. तसेच त्याला प्रकाशकांचे उंबरठेही झिजवावे लागतात. नवोदित लेखकाला या दिव्यातून जावे लागते याचे कारण त्याच्या पुस्तकांना उठाव नसल्यामुळे प्रकाशक त्याचे पुस्तक प्रकाशित करण्यास धजत नाहीत. एकदा का त्याचा उमेदवारीचा काळ संपून त्याच्या पुस्तकांचा बोलबाला झाला की कुठलाही प्रकाशक त्याचे पुस्तक प्रकाशित करण्यास एका पायावर तयार होतो. कमकुवत प्रतिभेच्या लेखकाच्या वाट्याला मात्र हे भाग्य कधीच येत नाही.

पु.लं ना सुध्दा त्यांच्या उमेदवारीच्या काळात लेखक या नात्याने प्रकाशकांकडे जावे लागले. १९४८-४९ च्या सुमारास स्वतः सुनीताबाई, बॉम्बे बुक डेपोत गेल्या होत्या. सोबत त्यांनी पु.लं.च्या ' तुका म्हणे आता ' या नाटकाच्या कांही प्रती- स्वतः नाटककाराने छापलेल्या- बरोबर घेतल्या होत्या. या प्रती बॉम्बे बुक डेपोचे मालक श्री. पांडुरंग कुमठा यांनी विक्रीसाठी ठेवून घेतल्या. कुमठाशेठ म्हणजे सौजन्याचे मूर्तिमंत प्रतिक, सौजन्याच्या सप्ताहात सौजन्य कसे दाखवावे याचे प्रशिक्षण देण्यासाठी यांचीच नेमणूक केली तर ती सार्थ ठरेल. सुनीताबाईंनी कुमठांच्याकडे पुस्तक प्रकाशनाचा

विषय काढला. स्वत: कुमठा प्रकाशक नसले तरी त्यांचे मेव्हणे श्री. रामदास भटकळ हे ‘ पॉप्युलर प्रकाशन ’ ही संस्था चालवतात. तेव्हां कुमठांनी सुनीताबाईंना पॉप्युलर प्रकाशनाकडे जाण्यास सुचवले. सुनीताबाई श्री. भटकळांना भेटून आल्या पण ती भेट सफल होऊ शकली नाही.

असेच दिवस सरले आणि एक दिवस पुण्याला पु.लं.च्या घरी एक प्रकाशक आले. ते होते राम उर्फ रा. ज. देशमुख. त्यावेळी देशमुखांनी खांडेकरांची पुस्तके प्रकाशित करणे सुरू केले होते. आल्या आल्याच देशमुख गरजले, ‘ मला तुमचे पुस्तक काढायचे आहे. काय तुमच्या अटी आहेत ?’

लेखक नवीन होता तरी प्रकाशकच त्याच्याकडे पुस्तक मागायला आला असा चमत्कार सहसा प्रकाशन क्षेत्रात घडत नाही. त्यामुळे लेखक मनोमन सुखावला.

पु.लं नी लगेच अटी सांगायला सुरुवात केली. अमूक टक्के रॉयल्टी, आकर्षक मुखपृष्ठ, दर्जेदार छपाई, इ. इ. या अटींमध्ये मुख्य अट पुस्तक स्वस्त असावे ही होती. पु.लं.ना त्यांचे पुस्तक महाराष्ट्रात मनाच्या श्लोका-सारखे घरोघरी जावे असे मनापासून वाटत होते.

देशमुख स्वस्त पुस्तक काढायला राजी नव्हते. कारण त्या किंमतीत पुस्तक सुमार छापले जाईल अशी भीती त्यांना वाटत होती. पु.लं.च्या सला-मीच्या लेखांचे आम महाराष्ट्रात हार्दिक स्वागत झाले असल्यामुळे ते स्वत: नमते घेण्यास तयार नव्हते. परिणामी हा व्यवहार जमला नाही व ‘ प्रकाशन व्यवसायातले लेखकांना काही कळत नाही ’ असा शेरा मारून देशमुख निघून गेले.

कालांतराने ते पुस्तक कुणी तरी स्वस्त किंमतीत छापले. किंमत स्वस्त असल्यामुळे निर्मितीच्या मूल्यात काटकसर होणे अपरिहार्य होते. पुस्तक सुमार छापले जाऊन ते खपणेही दुरापास्त झाले.

यानंतर पु.लं.च्याकडे दुसरा संग्रह प्रकाशित होण्याइतपत लेख जमले होते. देशमुख भेटल्यावर पु.लं.नी त्यांना अभिमानानं सांगितलं, ‘ मीच स्वत: पुस्तक स्वस्त किंमतीत काढून दाखवतो. मला पुस्तकातून फायदा मिळ-वायचा नाही. कोणालाही पुस्तक विकत घेता आलं पाहिजे.’

पु. ल. व सुनीताबाई मग पुस्तकाच्यामागे लागले व स्वखर्चाने ‘ नस्ती उठाठेव ’ हा संग्रह प्रकाशित केला. या घटनेनंतर पु. ल. व देशमुखांची मैत्री जमली व देशमुख पु.लं.चे प्रकाशक झाले. ‘ गणगोत ’, व्यक्ति आणि वल्ली ’, ‘ अपूर्वाई ’, ‘ गुण गाईन आवडी ’, ‘ एका कोळीयाने ’ आम्ही लटके ना बोलू ’ अशी पु.लं.ची अनेक उत्कृष्ट पुस्तके देशमुखांनी छापून प्रकाशित

केली. ' गणगोत 'मध्ये पु.लं.नी देशमुखांच्या व्यक्तिमत्त्वाचे मार्मिक चित्रण केले आहे, ते जिज्ञासूंनी अवश्य वाचावे.

देशमुखांचा स्वभाव कसाही असला तरी ते एक श्रेष्ठ व धाडसी प्रकाशक आहेत हे मात्र निर्विवाद. त्यांनी प्रकाशित केलेल्या पुस्तकांच्या किंमती भरमसाट असतात अशी त्यांच्याबद्दल तक्रार केली जाते. हे जरी अंशतः खरे असले तरी देशमुखांनी काही गाजलेल्या पुस्तकांच्या स्वस्त आवृत्त्या प्रकाशित केल्या. त्यांनी रणजीत देसाईकृत 'स्वामी ', पु.लं.चे 'व्यक्ति आणि वल्ली' ही साहित्य अकादमीने पांच सहस्र रुपयांचे पारितोषिक देऊन गौरवलेली दोन पुस्तके प्रत्येकी तीन रुपयांत दिली. ' स्वामी 'ची दहा हजाराची तर ' व्यक्ति आणि वल्ली 'ची पंधरा हजार प्रतींची स्वस्त आवृत्ती छापण्यात आली. एवढे प्रचंड धाडस आजपर्यंत मराठीमध्ये कुठल्याही प्रकाशकाने केले नव्हते. देशमुखांच्या या गुणांमुळे पु.लं.ना त्यांच्याबद्दल आकर्षण वाटले व त्यांनी आपली बहुतेक पुस्तके देशमुखांना प्रकाशनासाठी दिली. देशमुखांना सौंदर्यसृष्टी असल्यामुळे त्यांनी कांही निवडक पुस्तकाच्या स्वस्त आवृत्त्या वाचकांना दिल्या, तरी निर्मिती मूल्यांत काटकसर कधीच केली नाही. त्यामुळे त्यांची पुस्तकांची निर्मिती हिणकस न होता दर्जेदार झाली. अशा रीतीने देशमुखांनी पु.लं.ना जिंकल्यामुळे इतर प्रकाशकांच्या वाट्याला पु.लं.ची तशी फार पुस्तके आली नाहीत. याला अपवाद म्हणजे मौज प्रकाशनातर्फे पु.लं.ची एकदोन पुस्तके ' बटाट्याची चाळ ' इ. व ग. पां. परचुरे प्रकाशन मंदिरातर्फे पु.लं.ची कांही नाटके ' तुझे आहे तुजपाशी ', ' सुंदर मी होणार ' प्रकाशित झाली.

कांही मातबर प्रकाशकांनी पु.लं.ची पुस्तके मिळवण्याचा खूप प्रयत्न केला. पु.लं.ना प्रलोभने दाखवण्यात आली पण त्याचा कांही उपयोग झाला नाही. नाट्यक्षेत्रात एखाद्या नामवंत नटाला जास्त नाईट देऊन आपल्या कंपनीत खेचण्याचा प्रयत्न होतो, त्याप्रमाणे प्रकाशन क्षेत्रातही असेच घडले. गुणी व मातबर लेखक फार थोडे असल्यामुळे अशा लेखकांची पुस्तके मिळवणे हे एक अवघड काम आहे. तेव्हां या लेखकांना त्यांच्या नेहमीच्या प्रकाशकांकडून मिळणाऱ्या मोबदल्यापेक्षां जास्त मोबदला त्यांना देऊ करून त्यांचे पुस्तक मिळवण्याचा प्रयत्न प्रकाशक करतात.

याबाबत एक घटना सांगण्यासारखी आहे. पु.ल. त्यावेळी दिल्लीला दूरदर्शनवर होते. त्यांना मुंबईच्या एका प्रकाशकाने पुस्तकासाठी विचारणा केली व त्यांचे प्रकाशक जो मोबदला त्यांना देतात त्याच्यापेक्षा थोडा जास्त मोबदला देण्याची या प्रकाशकाने तयारी दाखवली. या पत्राला सुनीताबाईंचे नकारार्थी उत्तर आले त्याचा थोडक्यात आशय असाः–

' आपण इतरांपेक्षा थोडा जास्त मोबदला देऊ केला आहे हे एक प्रकारे धार टाकण्यासारखेच आहे. आमचे नेहमीचे प्रकाशक ठरलेले असल्यामुळे आपणाला पुस्तक प्रकाशनासाठी देता येत नाही.'

●

देशमुखांच्या घरी कांही लेखक मंडळी लिखाण करीत बसत. आपल्या घरी लेखक लिहित बसला आहे ह्या गोष्टीचा देशमुखांना विलक्षण अभिमान वाटे. लेखकाच्या लिखाणात व्यत्यय येऊ नये म्हणून त्याला भेटायला येणाऱ्या मंडळींना ते परस्पर देवडीवरून परतवण्याचे अप्रिय काम करीत असत. पु.लं.नी. अर्नेस्ट हेमिंग्वे याच्या ' द ओल्ड मॅन अ‍ॅण्ड दी सी ' या कादंबरीचे ' एका कोळीयाने ' या नावाने भाषांतर केले. हे भाषांतराचे काम ३।४ वर्षे चालले होते. पु. ल. या भाषांतराच्या कामासाठी पुण्यामध्ये कांही काल ' अज्ञातवासात ' राहिले होते. ही जागा टिळक रोडला हिराबागे-जवळ होती. भाषांतरात व्यत्यय येऊ नये म्हणून देशमुखांच्या परवानगी शिवाय कुणालाही पु.लं.ना भेटण्यास मज्जाव होता.

खांडेकर, पु. ल. देशपांडे यांच्यासारख्या प्रतिभावान व लोकप्रिय लेख-कांची पुस्तके प्रकाशित केल्यामुळे देशमुख वैभवाच्या शिखरावर जाऊन पोहोचले. नंतर हळुहळु अहंकाराच्या अजगराने त्यांना गिळण्यास सुरवात केली म्हणून म्हणा किंवा अन्य कारणांनी म्हणा, पु.लं.च व देशमुखांच कांही-तरी बिनसलं. परिणामी पु.लं.नी देशमुखांकडची सर्व पुस्तके काढून घेतली व अन्य प्रकाशकांना दिली.

पु.लं.चे पुस्तक प्रकाशनासाठी मिळणे हे ' शिवधनुष्य ' उचलण्याइतकेच अवघड आहे. देशमुख आणि कंपनीचे धनी राम. ज. देशमुख यांच्या नावातच ' राम ' असल्यामुळे त्यांनी हे अवघड काम सहजपणे यशस्वी करून दाखवले.

पु.लं.चे दुसरे एक प्रकाशक सुरेश राऊत यांचा इथे आवर्जून उल्लेख केला पाहिजे. पु. ल. मुंबईला कीर्ति कॉलेजमध्ये प्राध्यापक होते त्या सुमाराची ही घटना आहे. त्यावेळी सुरेश राऊत हे कीर्ति कॉलेजमध्ये शिक्षण घेत होते व पु.लं.चे ते आवडते विद्यार्थी होते. राऊत स्वतः व्यंग चित्रकार म्हणून त्यावेळी प्रसिध्दिस आले होते व विद्यार्थीदशेतच त्यांची व्यंगचित्रे वसंत, हंस, मोहिनी इ. मासिकांतून प्रसिध्द होत असत. बी. ए. झाल्यावर राऊ-तांनी ' काणेकर व्यक्ति आणि वाङमय ' हे पुस्तक प्रकाशित केले व त्यानंतर त्यांनी पु.लं.च्याकडे एका पुस्तकाची मागणी केली. पु.लं.नी ' मोठे मासे आणि छोटे मासे ' ही एकांकिका विल्सन कॉलेजच्या एकशे पंचविसाव्या वाढदिवसासाठी लिहिली होती. मुंबई मराठी साहित्य संघाच्या नाट्य

महोत्सवासाठी पु.लं.नी 'सारं कसं शांत शांत' आणि 'सदू आणि दादू' अशा आणखी दोन एकांकिका लिहिल्या. या तीन्ही एकांकिका सुरेश राऊतांनी 'मोठे मासे आणि छोटे मासे' या नावाने एप्रिल १९५७ मध्ये पुस्तकरुपाने प्रसिद्ध केल्या.

पु.लं.च्या पुस्तकांचा सारा व्यवहार सुनीताबाई पाहातात. प्रकाशन व्यवसायात लेखक–प्रकाशक या उभयतात पुस्तकाबाबत करार होणे ही एक महत्वाची बाब मानली जाते. सुनीताबाईंनी राऊतांशी 'मोठे मासे आणि छोटे मासे' या पुस्तकाबाबत करार व्हावा असे सुचविले. पण पु.लं नी राऊतांशी ते त्यांचे विद्यार्थी असल्यामुळे करार केला नाही. गुरु शिष्य या पवित्र नात्यात त्यांनी व्यवहारी कोरडेपणा आणला नाही. स्वतः सुरेश राऊत चित्रकार असल्यामुळे त्यांनी पुस्तकाची सजावट कलात्मक दृष्टीने केली. श्री. शाम जोशी यांच्याकडून त्यांनी पुस्तकाच्या मलपृष्ठावर पु.ल. गळ टाकून मासे पकडत आहेत असे चित्र काढून घेऊन छापले. वाचकांच्या सोयीसाठी ते पुन्हा येथे छापले आहे.

तसेच या एकांकिका रंगभूमीवर आणताना रंगमंचाची मांडणी कशी असावी हे समजण्यासाठी प्रत्येक एकांकिकेच्या सुरुवातीला पु.लं.चे धाकटे



भाऊ रमाकांत देशपांडे यांनी काढलेली स्केचेस् ‘ मोठे मासे आणि छोटे मासे’ या पुस्तकात देण्यांत आली आहेत. या तीन्ही एकांकिकेचे असंख्य प्रयोग झाले असून या पुस्तकाच्या तीन आवृत्त्या संपल्या आहेत.

१९७० साली बंगाली भाषेचा अभ्यास करण्यासाठी पु. ल. शांतिनिकेतनात गेले. तिथल्या वास्तव्यानंतर पु.लं.नी ‘ वंगचित्रे ’ रेखाटली. १९७१ साली महाराष्ट्र टाईम्सच्या रविवारच्या पुरवणीतून ही ‘ वंगचित्रें ’ क्रमशः प्रसिद्ध झाली. त्यानंतर पुणे विद्यार्थि गृह प्रकाशनातर्फे ती १९७४ साली पुस्तक रुपाने प्रकाशित झाली. या पुस्तकापासून पु.लं.ना मिळणारे मानधन त्यांनी पुणे विद्यार्थी गृहालाच देणगीच्या रुपाने देऊन टाकले. ‘ खोगीर भरती ’ हे पुस्तकसुद्धा पुणे विद्यार्थीगृह प्रकाशनातर्फे प्रकाशित झाले असून त्याचे मानधन सुद्धां पु.लं.नी प्रकाशकांना देणगी म्हणून दिले. ‘ वयम् मोठम् खोटम् ’ हे छोटे प्रहसन व ‘ नवे गोकुळ ’ हे मुलांसाठी लिहिलेल्या नाटकाच्या प्रयोगाचे अधिकार पु.लं.नी पुणे विद्यार्थी गृहाला दिले आहेत.

नाटककाराने आपल्या नवीन नाटकाचे वाचन केले, किंवा अमूक एक कथाकाराने ‘ कथाकथन ’ या कार्यक्रमात आपल्या कथेचे वाचन केले अशा आशयाच्या बातम्या आपण वाचतो, ऐकतो. पण एखाद्या कादंबरीचे वाचन लेखकाने केले असे आपण कधी ऐकले आहे काय ?

अशाच एका समर्थ कादंबरीच्या वाचनाचा एक आगळा कार्यक्रम देशमुख आणि कंपनीचे श्री. रा. ज. देशमुख यांनी १९६५ च्या डिसेंबर महिन्यांत पुण्यात घडवून आणला. ‘एका कोळीयाने ’ या कादंबरीचे पु.लं.नी वाचन केले, त्याची ही कहाणी.

‘ द ओल्ड मॅन ॲण्ड द सी ’ या अर्नेस्ट हेमिंग्वे यांच्या कादंबरीचे मराठी भाषांतराचे व मूळ ग्रंथातील चित्रे प्रसिध्द करण्याचे हक्क श्री. देशमुख यांनी मिळवले व हे पुस्तक सुंदर स्वरूपात वाचकांपुढे यावे म्हणून त्यांनी खूप परिश्रम केले. वि. स. खांडेकर हे देशमुखाचे लेखक. १९५५ साली खांडेकरांनी या पुस्तकाचे भाषांतर करण्याची परवानगी हेमिंग्वे यांचेकडे मागितली- परवानगी लगेच आली. श्री खांडेकरांनी कांही काल या कादंबरीचे भाषांतर करण्याचा प्रयत्न केला. परंतु प्रकृतीच्या कारणास्तव त्यांना हे काम सोडून द्यावे लागले. त्यानंतर देशमुखांनी अनंत काणेकरांना या भाषांतराबद्दल विचारणा केली. काणेकरांनी थोडेसे भाषांतर केले खरे, पण कामाच्या व्यापामुळे त्यानी ते मूळ पुस्तक देशमुखाना परत केले. तथापि देशमुख हताश झाले नाहीत. अखेरचा प्रयत्न म्हणून त्यांनी पु.लं.ना विचारले. पु.लं.नी



होकार दिला व त्यानंतर जवळजवळ चार वर्षांनी भाषांतराचे हस्तलिखित देशमुखांना दिले. अशी ही ' एका कोळीयाने 'ची जन्मकथा.

पुण्यात टिळक रोडवरून न्यू इंग्लिश स्कूलच्या जवळ गेलं की उजव्या बाजूला पंताचा गोट लागतो. या गोटात एक शानदार शामियाना उभारण्यात आला होता. वरचे छत पताकांच्या उभ्या, आडव्या रागांनी सुशोभित केले होते. या पताकांवर चित्र होती, कोळ्यांची, माश्यांची व होड्यांची.

बैठक पेशवाई होती. समोर असलेल्या छोट्याशा व्यासपीठावर एक कोच होता व जवळच असलेल्या लहान स्टुलावर पाण्याचा तांब्या व फुलपात्र ठेवलं होतं. समोर मायक्रोफोन. निरनिराळ्या क्षेत्रांतील निवडक मंडळी वाचनाला उपस्थित होती.

' एका कोळीयाने ' ही एक मत्स्यावताराची मृत्युकथा आहे. एक खस्तावलेला पण निळ्या व हंसऱ्या डोळ्याचा म्हातारा मच्छीमार जिद्दीनं अथांग समुद्रात मासेमारीला जातो. बऱ्याच वेळाने त्याच्या गळाला एक प्रचंड ताडमासा लागतो. कोळ्याचा गळ तोंडात असताना तो ताडमासा आपल्या

सामर्थ्याचा प्रत्यय आणून देतो. परिणामी म्हाताऱ्याचा त्या शिकारीवरच जीव जडतो. ज्याच्यावर प्रेम करायचे त्याचीच हत्या करायची ? पण हीच नियती आहे. मासेमारी जीव जगवीत असते तसा ती जीव घेतही असते. अशी ही थोडक्यात 'एका कोळीयाने 'ची कथा.

पु.लं.चं वाचन तर अत्यंत रंगदार झालं. तीन तासांच्या अवधीत त्यांनी-श्रोत्यांच्या समोर तो समुद्र अक्षरशः उभा केला. तो म्हातारा, त्याचा छोटा दोस्त, तो प्रचंड ताडमासा, हे सारं सारं त्यांनी जिवंत केलं. पु.लं.च्या शब्दोच्चारात, अभिनयात कमालीची समज आहे म्हणूनच लेखनापेक्षा त्यांच हे कादंबरीचं वाचन अधिक रंगलं. पु. ल. आपल्या वाणीने इष्ट तो परिणाम सहजपणे साधत होते. श्रोते मंत्रमुग्ध होऊन ऐकत होते.

'एका कोळीयाने ' ही कादंबरी प्रसिद्ध झाल्यावर पु. ल. फेब्रुवारी १९६६ मध्ये औदुंबर क्षेत्री भरलेल्या साहित्य सोहळ्याला अध्यक्ष या नात्याने हजर राहिले.

सांगली जिल्ह्यामधील औदुंबर हे गांव बारा महिने संथ वाहणाऱ्या कृष्णेच्या काठावर उभे असून दत्ताचे एक जागृत देवस्थान म्हणून प्रसिद्ध आहे. येथील मंडळी केवळ साहित्याच्या प्रेमाने एकत्र येऊन पदरमोड करून वर्षातून हा सोहळा भरवतात. आतापर्यंत श्री. म. माटे, श्री. के. क्षीरसागर, महादेवशास्त्री जोशी, कवि यशवंत, वि. स. खांडेकर, ग. दि. माडगूळकर, काकासाहेब गाडगीळ, ह. रा. महाजनी, यासारख्या अनेक सुप्रसिद्ध साहित्यिकांनी या सोहळ्याचे अध्यक्षपद भूषवले आहे. या संमेलनास आसपासच्या परिसरातून हजारो माणसे उपस्थित राहतात. सुप्रसिद्ध कवि सुधांशु (दत्त दिगंबर दैवत माझे फेम) हे औदुंबरचेच रहिवासी.

सोहळा सुरू होण्याच्या आधी पु.लं.च्या भोवती सारे साहित्यिक जमले. पु.लं.च्या गप्पा रंगात आल्या. तेवढ्यात कोणीतरी पु.लं.ना. म्हणाले, तुमचे 'एका कोळीयाने ' हे भाषांतरित पुस्तक फारच छान वठलं आहे.

यावर पु. ल. हंसत हंसत म्हणाले, 'तुम्हाला खरं सांगू का ? ते समग्र भाषांतर माझ्या बायकोनं केलं आहे. त्या पुस्तकाचं श्रेय तिलाच द्यायला पाहिजे. ती इथे नसल्यामुळे तसे बोलायला हरकत नाही.'

कोणीतरी मध्येच विचारले. 'पण तुमच्या पुस्तकाची किंमत फार ठेवली आहे असे लोक म्हणतात.'

पु. लं. पुढे म्हणाले, 'कागद, शाई, छपाई, ब्लॉक इत्यादी घटकांवर पुस्तकाची किंमत जे ठरवितात त्यांना मी काय सांगणार ? कमी किंमतीची पुस्तकं किती लोक विकत घेतात ?'

पु. ल. पुढे म्हणाले, ' मी तुम्हाला शिल्पकार फडके यांच एक उदाहरण सांगतो. त्यांनी तयार केलेली एक शिल्पकृती पाहण्यास एक धनवान गृहस्थ आले. त्यांनी त्या शिल्पाची बारकाईने पाहाणी केली व त्याची किंमत विचारली.

' रुपये चार हजार ' फडके उत्तरले.

यावर त्या गृहस्थानें त्या कलाकृतीला किती खर्च आला याचा हिशोब करायला सुरवात केली. मातीचा खर्च, रंग, ब्रश इ. चा खर्च धरून त्यांनी दोन हजार फार तर होतील असा अंदाज सांगितला.

यावर फडके म्हणाले, ' आपण या खर्चात एका मातीचा खर्च मिळवायला विसरलात की !'

' हा आणखीन कुठल्या मातीचा खर्च बुवा ?'

'अहो, माझ्या जीवनाच्या मातीचा ! ' फडके शिल्पकार ताडकन् उत्तरले.

' थोडक्यात म्हणजे कुठल्याही कलाकृतीच्या मागे कलावंताच्या जीवनाची किती माती झाली आहे हे पाहाणं महत्त्वाचं आहे.'

हा सोहळा औदुंबर येथे ६ फेब्रुवारी १९६६ रोजी भरला होता. याआधी २६ जानेवारी १९६६ रोजी भारत सरकारने पु.लं.ना ' पद्मश्री ' हा किताब देऊन गौरव केला होता. त्यासुमारास त्यांच्या ' व्यक्ति आणि वल्ली ' या ग्रंथास साहित्य अकादमीचे पांच सहस्त्र रुपयांचे पारितोषिक मिळाले होते.

या वरील दोन घटनांचा मिस्किलपणे उल्लेख करताना पु. ल. आपल्या भाषणात म्हणाले, ' लोक मी पद्मश्री मिळवली म्हणजे कुणी योगी, सत्पुरुष असावा अशा भावनेने इथे आले असतील. भारतात हे अशक्य नाही. तसेच भारत सरकारकडून पांच हजार रुपये उपटणारा हा कोण आहे हे पाहाण्यासाठी कांही लोक आले असण्याची शक्यता आहे.'

'तुम्ही का लिहिता ' या प्रश्नाला पु.लं.नी आपल्या भाषणातून समर्पक उत्तर दिले. ते म्हणाले, ' माणूस त्याला जे झाले, मग ते सुख असो वा दुःख, दुसऱ्याला सांगू इच्छितो. कुत्र्याच्या प्रदर्शनात चांगला हुशार कुत्रा म्हणून बक्षीस मिळालेल्या कुत्र्याचा इतर कुत्र्यांनी सत्कार केल्याचे तुम्ही वाचलंय ? एका बैलाला चाबूक मारला म्हणून इतर बैलांनी संप केला असे कधी घडलय् कां ? माणसात असे घडते हेच माणूस प्राण्याचे वैशिष्टच आहे. जे घडले तेवढेच सांगावयाचे असे माणसाला वाटते असे नव्हे तर जे व्हावेसे वाटते तेहि सांगण्याची माणसाला उत्कंठा असते. कांहींना ते चांगले

अधिक सुंदर सांगता येते. पण ही देणगी त्याला कोठून कशी मिळाली हे सांगणे अवघड आहे. ती देवाची देणगी आहे. सोळाव्या वर्षी ज्ञानेश्वरांनी ज्ञानेश्वरी कशी लिहिली व एकसष्ट वर्षाच्या प्राध्यापकाला ती का शिकविता येत नाही हे सांगणे अवघड आहे.

❋ ❋

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
ग्रंथ. शाखा (स्थळ प्रत)
REFBK-0023078

